

अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले
ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक


# मेहता मराठी ग्रंथजगत

जानेवारी २०११ । किंमत १५ रुपये







# रोटरी क्लब ऑफ पुणे पर्वती, लोकमान्यनगर
# तर्फे दिवाळी अंक स्पर्धा २०१०




## 'रोटरी लोकमान्य पुरस्कार' प्राप्त
## मेहता मराठी ग्रंथजगत दीपावली २०१०



◆ जानेवारी २०११
◆ वर्ष अकरावे
◆ अंक एक

# मेहता मराठी ग्रंथजगत

## — अनुक्रमणिका —

| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **साहित्यवार्ता** | १४ |
| **दखल** | ४४ |
| **पुस्तक परिचय** | |
| **लेट्स किल गांधी!** | |
| : **तुषार गांधी** अनु.अजित ठाकूर | ५६ |
| **द पार्लमेन्टरी सिस्टीम** | |
| : **अरुण शौरी** अनु. अशोक पाथरकर | ७० |
| **जन्मठेप :** गिरिजा कीर | ७६ |
| **पुरस्कार** | ८२ |
| **वाचकांचा प्रतिसाद** | ९६ |
| **श्रद्धांजली** | १०३ |
| **बालनगरी** | १०७ |

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन साहाय्य :
वंदना घाटगे

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
**Email -** info@mehtapublishinghouse.com
**Website - www.mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु. ३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

# संपादकीय

## प्रकाशन व्यवसायातील डिजिटल क्रांती

इ. स. २०११ चे स्वागत करताना ग्रंथव्यवहाराच्या क्षेत्रात यापुढे पारंपरिक छापील पुस्तकांच्या तुलनेत डिजिटल पुस्तकांचे प्रमाण वाढत जाणार आहे, ही खूणगाठ बांधूनच पुढे जायला हवे अशी नि:संदिग्ध लक्षणे दिसत आहेत.

भारतात किंवा महाराष्ट्रात छापील पुस्तकांचाच वरचष्मा आणखी काही काळ राहणार आहे, त्यामुळे आपल्या वाचक-लेखकांनी किंवा प्रकाशक-ग्रंथविक्रेत्यांनी फारशी चिंता करण्याचे कारण नाही; कारण इंटरनेटचा आणि ई-बुक रीडर्सचा, स्मार्टफोन आणि आयपॅड, आयफोन वगैरेंचा भारतात अजूनही मर्यादित प्रमाणातच उपयोग होत आहे; परंतु भारतात मोबाईलची ग्राहकसंख्या पन्नास कोटीच्या घरात गेली आहे हे लक्षात घेता, इंटरनेट-स्मार्टफोनचे दर खाली येऊन ग्राहकसंख्येत वेगाने वाढ होत जाईल असे मानायला हरकत नाही. तसे झाल्यावर छापील पुस्तकांच्या ऐवजी डिजिटल पुस्तकांच्या मागणीत झपाट्याने वाढ होत जाईल हे स्पष्टच आहे.

ऑक्टोबर महिन्यात झालेल्या फ्रँकफर्ट बुक फेअरमध्ये डिजिटल पुस्तकांचीच सर्वदूर चर्चा होती. छापील पुस्तकांच्या हक्कांची देवाणघेवाण करण्यासाठी ही ग्रंथजत्रा आजवर प्रसिद्ध होती; आता डिजिटल हक्कांची देवाणघेवाण सर्रास सुरू झाल्याचे दिसून येत होते. तेथे झालेल्या परिसंवादात आणि चर्चासत्रात 'डिजिटल बुक्स आणि डिजिटल राइट्स' यांच्यावरच सर्वांचे लक्ष एकवटलेले होते आणि सर्वांना त्याबद्दल औत्सुक्य होते. डिजिटल पुस्तकांकडे प्रतिस्पर्धी किंवा शत्रुत्वाच्या भावनेने न पाहता, आपल्या छापील पुस्तकांच्या जोडीने, डिजिटल पुस्तकांद्वारे आपल्या व्यवसायाची प्राप्ती सहजगत्या कशी विस्तारता येईल या स्वागतशील मानसिकतेचे प्रत्यंतर या ग्रंथजत्रेत पदोपदी येत होते.

हार्लेकिन मिल्स अँड बून या प्रकाशन संस्थेचे विक्रीप्रमुख म्हणाले, ''या जत्रेत फेरफटका मारताना लोक डिजिटल पुस्तकांमध्ये रस घेत आहेत आणि डिजिटल पुस्तकांच्या स्टँडवर चर्चा करीत आहेत, हे दृश्य सर्रास दिसत होते. या आधीच्या वर्षात ते कधी दिसले नव्हते. यंदा 'डिजिटल'चे स्टॉल जास्त होते

आणि छोट्या छोट्या नव्या संस्थांचेही प्रमाण जास्त होते. डिजिटल क्षेत्रात नवनवे प्रयोग करणाऱ्या ताज्या दमाच्या तरुणांची गजबज या ग्रंथजत्रेला तरुणाई बहाल करणारी होती. त्या तरुणांचा उत्साह आणि आशावाद बघताना, 'ग्रंथव्यवहारात इतके पावसाळे मी काढले आहेत' किंवा 'आमच्या प्रकाशन संस्थेने गेल्या पन्नास वर्षांत अमुक अमुक बेस्टसेलर लेखकांची पुस्तके काढली आहेत' अशी शेखी मिरवणे व्यर्थ आहे, असेच एकूण वातावरण होते.

या क्षेत्रात नवे एजंटही येत आहेत. नव्या लेखकांना, नव्या कल्पनांना, नव्या वाङ्मयप्रकारांना ते प्रमोट करीत आहेत, प्रकाशनाच्या नव्या शक्यता दाखवून देत आहेत, त्यांनाही फ्रँकफर्टमध्ये नवीन प्रकल्पांचा सूतोवाच करण्याची संधी मिळाली. आधी केवळ विशिष्ट पुस्तकांचे मार्केटिंग करावे लागत होते. आता डिजिटल हक्कांचे मार्केटिंग अधिक भाषांसाठी आणि वेगवेगळ्या प्रदेशांसाठी होत असल्याने आणि पुस्तकांच्या संख्येला सीमा नसल्याने एकूण उलाढाल खूप वाढलेली आहे. प्रकाशन व्यवसायाचे स्वरूपच बदलत आहे. कन्टेन्ट निर्मिती हे मुख्य काम छापील वा डिजिटल दोन्हींसाठी पायाभूत आहे, परंतु मुद्रणाची गरज नसल्याने कागद खरेदी, बांधणी, गोडाऊन, वितरण यांचा व्याप कमी झाला आहे.

गुगलने ४ लाख पुस्तकांचे डिजिटल एडिशनचे हक्क प्रकाशकांकडून मिळवले असून, कॉपीराइटच्या कक्षेत न येणाऱ्या २० लाख पुस्तकांचे डिजिटलायझेशन पूर्ण केले आहे. अमेरिका आणि युरोपमध्ये लौकरच गुगल एडिशन्सचे लाँचिंग केले जाईल असे जाहीर केले आहे. मात्र नक्की तारीख अजून जाहीर केलेली नाही. ही डिजिटल पुस्तके सुविहितपणे, कुठलीही अडचण न येता ग्राहकांना वापरता यावीत यासाठी तांत्रिकदृष्ट्या कुठलीही त्रुटी राहू नये या दृष्टीने गुगल स्वत:ची खातरजमा करून घेत आहे. ई-रीडरची गरज भासू नये, कुठल्याही स्मार्टफोनवर, आयपॅडवर, ई-फोनवर, मोबाईलवर, इंटरनेटवर गुगल वेबरीडर ई-बुक्स डाऊनलोड करता यावीत, एकदा विकत घेतल्यावर ग्राहकाला ती जगात कोठेही या वेगवेगळ्या साधनांद्वारे आपल्या सोयीनुसार वाचता यावीत, अशी गुगलची संकल्पना आहे. अमेरिकेत त्यासाठी एजन्सी मॉडेलच्या धर्तीवर प्रकाशकांशी करार करण्यात येत आहेत.

ॲमेझानच्या किंडल वाचन यंत्रावर गुगल एडिशन्स उपलब्ध होणार नाही असेही जाहीर करण्यात आले आहे.

ॲमेझॉनने लेखकांच्या ऐवजी प्रकाशकांशी डिजिटल हक्कांबाबतचे करार करण्यावर भर दिला आहे. त्यासाठी लेखकांच्या एजन्टांची एक बैठक घेऊन, विचारविमर्श केला. ॲमेझॉन स्वत:च प्रकाशन क्षेत्रात पदार्पण करण्याचाही विचार करीत आहे. स्वयंप्रकाशन करणाऱ्या लेखकांची पुस्तके वितरित करण्याची जबाबदारी

घेऊन ॲमेझान एजंट तसेच पारंपरिक प्रकाशक यांना दूर ठेवण्याचा मार्गही अवलंबणार आहे असे सांगण्यात येते. एजंटांना ॲमेझॉनने पुस्तकांवर सत्तर टक्के रॉयल्टी देण्याचे आमिष दाखवले आहे. फ्रँकफर्टला ॲमेझॉनचे बरेच अधिकारी आलेले होते, आणि ते सर्वांशी संपर्क साधत होते.

ॲमेझॉन ही संस्था जगातील सर्वांत मोठी रिटेल ग्रंथविक्री करणारी संस्था म्हणून गेली १२ वर्षे कार्यरत आहे. ग्राहकांच्या आवडीनिवडीची प्रचंड माहिती या संस्थेकडे आहे. त्यामुळे मार्केटिंगबाबत ॲमेझॉनची व्यूहरचना कमालीची कार्यक्षम असेल असे एजंट आणि लेखक यांच्या मनावर बिंबवण्याचा ॲमेझॉनचा प्रयत्न होता. ई-बुक्स ही छापील पुस्तकापेक्षा तीस ते चाळीस टक्के स्वस्त असायला हवीत, तशी स्वस्त असली तरच ई-बुक्सचे मार्केट खऱ्या अर्थाने उसळी घेईल असे ॲमेझॉन फ्रान्सचे प्रमुख झेव्हियर गॅरम्बोइस यांनी म्हटले आहे. सध्या ॲमेझॉन एका पुस्तकासाठी ९.९९ डॉलर्स घेते. काही पुस्तके मोफत देते. या १० डॉलर्सपैकी निम्मी रक्कम प्रकाशक-लेखकांना देण्यात येते.

फ्युचर बुक या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात ई-बुक्सच्या ग्राहकांपैकी साठ टक्के ग्राहकांनी ॲमेझॉनकडून एक तरी ई-बुक घेतल्याचे आढळून आले.

नोव्हेंबर २०१०मध्ये झालेल्या फ्युचर बुक कॉन्फरन्स मध्ये डिजिटल पुस्तकांची निर्मिती, वितरण यावर जाणकारांनी आपापली मते मांडली. प्रकाशन म्हणजे छापील पुस्तक हे समीकरण गेल्या ५ वर्षात मागे पडले असून कन्टेन्ट (आशय) हा मुद्रणाबरोबरच ऑनलाइन, ई-रीडर, मोबाईल याद्वारेही वाचकग्राहकांना मिळू शकतो हे मान्य झाले आहे. २०१० हे वर्ष त्या दृष्टीने ई-रीडर आणि ई-बुक्सचे ठरले आहे.

ई-बुकमुळे पुस्तक छपाईचा व्याप कमी होऊन, प्रकाशकांना कर्मचाऱ्यांची संख्या कमी करता येईल, किंवा नवनव्या पुस्तकांची निर्मिती करण्याची सवड सापडेल. ई-बुकमुळे लेखक, प्रकाशक, संपादक, एजंट, ग्राहक, वाचक आणि विक्रेते या सर्वांचाच फायदा होईल असाही तर्क केला जातो. काही घटकांना काही बाबतीत फटकाही बसेल, परंतु दीर्घकालीन विचार केला तर या व्यवसायाची द्रुत गतीने वाढ होत राहील असे स्पष्ट दिसते.

गतवर्षाचा आढावा घेताना मराठी किंवा भारतीय प्रकाशन क्षेत्राचा विचारही व्हायला हवा. परंतु जागतिक डिजिटल पुस्तकांकडे आपण वेळीच वळायला हवे, हा विचार नव्या वर्षाचे स्वागत करताना मनात हवा.

*** अनिल मेहता एफ.आय.पी.चे उपाध्यक्ष**



फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स, दिल्ली ही सर्व भारतीय भाषांतील प्रकाशकांची एकमेव सर्वोच्च संघटना आहे. ही संघटना स्थापन होऊन ३८ वर्षे झाली आहेत. या संघटनेच्या नुकत्याच पार पडलेल्या ३७ व्या वार्षिक साधारण सभेमध्ये पदाधिकाऱ्यांची निवडणूक झाली. या मध्ये २०११-१२ या वर्षासाठी प्रसिडेंट म्हणून श्री. आनंद भूषण (पितांबर पब्लिशिंग हाऊस, दिल्ली) यांची निवड झाली व व्हाईस प्रेसिडेंट (पश्चिम विभाग) म्हणून श्री. अनिल मेहता (मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे) यांची निवड झाली. जनरल सेक्रेटरी म्हणून शक्ती मलिक व सुधीर मल्होत्रा यांची निवड झाली. १२ एक्झिक्युटिव्ह मेंबर्सही या वेळी निवडले गेले.

महाराष्ट्र, गोवा, गुजरात, कर्नाटक या राज्यांसाठी या संघटनेतर्फे श्री. अनिल मेहता काम पाहतील.


दरवर्षी या संस्थेतर्फे दिल्ली येथील प्रगती मैदानात ८ दिवसांसाठी पुस्तक प्रदर्शन भरवले जाते. यावर्षी हे प्रदर्शन जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात आहे. यावेळी फेडरेशन तर्फे दरवर्षी भारतीय भाषांतील पुस्तकांच्या सर्वोत्तम निर्मितीबद्दलचा पुरस्कार दिला जातो. एफ.आय.पी. ही संस्था आंतरराष्ट्रीय प्रकाशन संस्थेसाठी कार्यरत आहे.

**सर्व वाचक, सभासद वर्गणी भरण्यासाठी, व पुस्तके मागविण्यासाठी खालील पत्त्यावर संपर्क साधा**

**मेहता बुक सेलर्स**

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९ ते रात्री ८
(शनिवारी बंद)
फोन : (०२३१)२५४२९०१.
टेलिफॅक्स : (०२३१)२५४१८८१.
Email : mehtabooks@eth.net

**आगामी**




## द प्रायव्हेट पेपर्स ऑफ
# ईस्टर्न ज्युवेल

**मॉरीन लिंडले**
अनु. ऋजुता कुलकर्णी

**२८०रु. पोस्टेज २५रु.**

पेकिंग १९१४. प्रिन्स सू यांच्या सगळ्यात लहान रखेलीची आठ वर्षांची मुलगी ईस्टर्न ज्युवेल वडिलांची एका नोकराणीशी चाललेली रतिक्रीडा चोरून बघते.

–आणि ईस्टर्न ज्युवेलच्या वादळी आयुष्याचा प्रवास सुरू होतो...

ईस्टर्न ज्युवेलचा शरीरसंबंधांमधला चौकसपणा लक्षात आल्यामुळे तिला टोकियोला एका दूरच्या नातेवाईकाकडे पाठवून देण्यात येते.

त्यानंतर वैराण मंगोलियातल्या एका राजकुमाराशी तिचा इच्छेविरुद्ध विवाह करून देण्यात येतो. तिला अस्वस्थ करणारे चमत्कारिक भास होऊ लागतात आणि दु:स्वप्ने पडू लागतात.


स्वभावत:च धीट, बंडखोर असणारी ती पुरुषांच्या वर्चस्वाखाली राहण्यास तयार नसते. झगमगत्या शांघाय शहरात राहून जपानसाठी गुप्तहेरगिरी करते. त्यासाठी आपली चिनी वंशपरंपरा आणि आपल्या आवडत्या गोष्टी यांना तिलांजली देते.

'द प्रायव्हेट पेपर्स ऑफ इस्टर्न ज्युवेल' म्हणजे दुसरे महायुद्ध आणि तीन देशांच्या पार्श्वभूमीवर घडलेली अतिशय वादळी, बहुरंगी सत्यकथा आहे.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

**आगामी**

# बिलाँगिंग




**समीम अली । हम्फ्रे प्राईस**

अनु. सिंधु जोशी

**२४०रु. पोस्टेज २५रु.**

आईवडिलांनी अनाथालयात टाकलेली समीम सात वर्षांची होते. अचानक एके दिवशी तिच्या कुटुंबियांनी तिला घरी परत नेण्याचे ठरविले. एका अत्यंत घाणेरड्या घरात तिला डांबून ठेवले आणि वयाला न झेपणारी कामे करणे भाग पाडले. तिची आईच तिचा छळ करू लागली. या सर्वाला आपण स्वत:च जबाबदार आहोत असे समजून ती स्वत:ला शारीरिक इजा करून घेऊ लागली.

तेरा वर्षाच्या समीमचे पाकिस्तानमधील एका अनोळखी पुरुषाबरोबर बळजबरीने लग्न लावले गेले. दिवस गेल्यावर तिला परत ग्लासगोत आणण्यात आले. कुटुंबाकडून होणारा छळ चालूच राहिला.


खरं प्रेम म्हणजे काय याची जाणीव झाल्यावर स्वत:च्या लहान मुलाला घेऊन तिने घरच्या हिंसाचारापासून स्वत:ची सुटका करून घेतली. परंतु तिच्या कुटुंबाच्या झालेल्या बेइज्जतीच्या परिणामांना तिला तोंड द्यावे लागले.

बिलाँगिंग ही कथा आहे एका छोट्या मुलीची, स्वत:च्या भूतकाळापासून तिने करून घेतलेल्या सुटकेची, स्वत:च्या कुटुंबाकडूनच होणाऱ्या छळाविरुद्ध दिलेल्या लढ्याची.

सध्या नवरा आणि स्वत:च्या दोन मुलांबरोबर समीम अली मँचेस्टरला राहते. स्थानिक राजकारणात तिचा सक्रिय सहभाग असतो. मॉस साईड या संस्थेत ती समुपदेशनाचे काम करते.

बळजबरीने लावल्या गेलेल्या लग्नांविरुद्ध ती सतत आवाज उठवत आहे.

आगामी




# फिट फॉर 50+ फॉर विमेन

**शेन गुड** अनु. सुभाष जोशी

**८०रु. पोस्टेज २०रु.**

'पन्नाशीनंतरची तंदुरुस्ती' ह्या पुस्तकात मध्यमवयाकडे झुकत असलेल्या स्त्रियांसाठी तंदुरुस्तीच्या व्यायाम प्रकारांची रूपरेखा दिलेली आहे.

पन्नाशीतल्या स्त्रिया नेहमीच आपल्या स्वास्थ्याविषयी, कमनीयतेविषयी फारच काळजी करताना आढळतात. व्यायामाच्या अभावामुळे ऑस्टिओपोरॉसिस (हाडं ठिसूळ होण्याची व्याधी), मधुमेह, कर्करोग आणि हृदयविकार यांचा त्रास होण्याची शक्यता असते.

मध्यमवयीन स्त्रियांना डोळ्यांसमोर ठेवून या पुस्तकात ॲरोबिक्स, वजन उचलण्याचे, बळकटी वाढविण्याचे आणि कटिभागाला मजबुती देण्याचे व्यायाम प्रकार दिलेले आहेत.

व्यायामाचा वास्तव, चपखल आणि संतुलित असा आराखडा खूपच उपयुक्त अहे..


**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

**आगामी**

# फिट फॉर 50+ फॉर मेन

**ग्रेग चॅपल** अनु. सुभाष जोशी

**८०रु. पोस्टेज २०रु.**




मध्यमवयीन पुरुषांसाठी सोप्या भाषेत तंदुरुस्तीच्या व्यायामांची रूपरेषा या पुस्तकात दिलेली आहे.

पन्नाशीत तब्येतीच्या तक्रारी सुरू होतात. व्यायामाच्या अभावामुळे ऑस्टिओपोरॉसिस (हाडं ठिसूळ होणे), दुसऱ्या क्रमांकाचा मधुमेह, कर्करोग आणि हृदयविकार यांचा त्रास होण्याची शक्यता असते.

मध्यमवयीन पुरुषांना डोळ्यांसमोर ठेवून या पुस्तकात एरोबिक्स, वजन उचलण्याचे आणि बळकटी वाढविण्याचे व्यायाम प्रकार दिलेले आहेत.

आयुष्याच्या वाटचालीत आपल्याला, आपलं आरोग्य आणि ऊर्जा गमावणं परवडणारं नाही.

या पुस्तकात दिल्याप्रमाणे व्यायामाला लागा आणि आयुष्यभर निरोगी रहा.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

## नवेकोरे




# द स्टार प्रिन्सिपल

**तुम्हाला श्रीमंत बनवू शकेल**


**रिचर्ड कोच**

अनुवाद **श्याम भुर्के**

**१८०रु. पोस्टेज २५रु.**

रिचर्ड कोच यांनी स्टार व्यवसाय शोधून १०० दशलक्ष पौंडांपेक्षा जास्त धन कमविले. त्यांच्या नव्या पुस्तकात तुम्हीही स्टार शोधून कसे श्रीमंत होऊ शकता हे ते दाखवून देत आहेत.
वेगाने वाढणाऱ्या व्यवसाय क्षेत्रात 'स्टार' सर्वांत पुढे असतात.
स्टार दुर्मिळ असतात. परंतु या पुस्तकाचे वाचन करून तुम्ही स्टार शोधू शकाल किंवा तुमचा नवा स्टार निर्माण करू शकाल.
उद्योजक होऊ इच्छिणाऱ्यांकरिता किंवा (मोठ्या किंवा मध्यम) गुंतवणूकदारांकरिता आणि महत्त्वाकांक्षी कर्मचाऱ्यांकरिता हे पुस्तक मौल्यवान आहे.
जबाबदारीचा अनुभव, वेगाने होत जाणारी वैयक्तिक प्रगती, चांगला पगार, भरपूर बोनस, असे अनेक लाभ स्टार व्यवसायामुळे तुम्हाला मिळू शकतात.
तुम्ही कोणीही असा. स्टार शोधा, त्यात गुंतवणूक करा. तुमचं जीवन वैभवशाली होईल.
रिचर्ड कोच यांनी फिलोफॅक्स, बेल्गो रेस्टॉरंट, प्लायमाऊथ जीन आणि इंटरनेट गँबलिंग आणि, बेटफेअर हे स्टार व्यवसाय केले. त्यांचं नशीब उजळलं. मूळ गुंतवणुकीच्या कितीतरी पटीने पैसे मिळाले.
८०/२० प्रिन्सिपल या त्यांच्या पुस्तकाचा जगातील २४ भाषांत अनुवाद झाला असून त्याच्या ७ लाख प्रती खपल्या आहेत.

# आमची नवीन प्रकाशने




## वुमन ऑन टॉप

**सीमा गोस्वामी** अनु. शोभना शिकनीस

टॉपला पोचताना विशेषत: स्त्रियांना अनेक अडथळ्यांच्या शर्यती पार कराव्या लागतात, म्हणूनच प्रत्येक स्त्रीकडे हा कानमंत्र असलाच पाहिजे

**१५०रु. पोस्टेज २५रु.**




## आय लॉस्ट माय लव्ह इन बगदाद

**मायकेल हेस्टिंग्ज** अनु. अंजनी नरवणे

पत्रकार मायकेल हेस्टिंग्ज व ॲण्डी यांच्या प्रेमाची अत्यंत दुर्देवी व भयानक शोकांतिका. २००५ सालातील अमेरिका व इराकच्या युद्धकाळातील एक सत्यकथा

**२५०रु. पोस्टेज ३०रु.**




## इनसाइड द गॅस चेंबर

**श्लोमो व्हेनेत्सिया** अनु. सुनीति काणे

गॅस चेंबरमधे मारलेल्या प्रेतांची विल्हेवाट लावायचे काम झाँडर कमांडोंज्ना करावे लागत असे. श्लोमो हे त्यातले एक. आठ महिने गॅस चेंबरमधे निर्दय कत्तलींचा डोळ्याने पाहिलेला इतिहास

**२००रु. पोस्टेज २५रु.**



## अरुणाची गोष्ट

**पिंकी विराणी** अनु. मीना कर्णिक

'आय वॉन्ट ॲन एन्ड टु धिस लाईफ' असं देखील सांगू न शकणाऱ्या अरुणा शानबागची ही जगावेगळी सत्यकहाणी...

**१८०रु. पोस्टेज २५रु.**

# साहित्यवार्ता

*** आनंद यादव - अमृतमहोत्सवी सत्कार**

''भाषा ही केवळ संवाद साधत नसते, तर ती त्या समाजाची ओळख असते. ती एक संस्कृती सांगत असते.'' असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद यादव यांनी केले.

महाराष्ट्र साहित्य परिषद, मेहता पब्लिशिंग हाऊस आणि डॉ. आनंद यादव मित्र परिवार यांच्या हस्ते यादव यांचा अमृतमहोत्सवी सत्कार करण्यात आला. या वेळी अनिल मेहता, अनंत दीक्षित, प्रा. मिलिंद जोशी, डॉ. वि. भा. देशपांडे आणि प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर हे उपस्थित होते.

''स्वातंत्र्यपूर्व काळात शहरातील मध्यमवर्गीय पांढरपेशा समाज हा साहित्याचा केंद्रबिंदू होता. साहित्य, शिक्षण यावर ब्राह्मण समाजाची मक्तेदारी होती. ग्रामीण साहित्य होते, पण त्यातला दृष्टिकोन शहरी होता. त्यात ग्रामीणपणा नव्हता. त्यामुळे सुरुवातीला माझी, माझ्या ग्रामीण साहित्याची हेटाळणी झाली. पण व्यंकटेश माडगुळकर व ना. गो. कालेलकर यांनी माझ्या साहित्याची दखल घेतली. त्याचे कौतुक केले. मला लिहिण्यास प्रवृत्त केले.''



डॉ. बांदिवडेकर म्हणाले, यादव यांच्या साहित्यात ग्रामीण जीवन, तेथील माणसे, त्यांची संस्कृती दिसून येते. त्यांना बदलत्या ग्रामीण जीवनाचे उत्तम ज्ञान व भान आहे. ग्रामीण जीवनातील यातना, आनंद, सुख, दुःख हे त्यांच्या साहित्यातून अनुभवायला मिळते.

दीक्षित यांनी साहित्यातील सामाजिक बाजूंवर, साहित्यातील योगदानावर व यादव यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकला.

जयराम देसाई यांनी सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले.

*** डॉ. प्रमिला जरग यांच्या 'आदिपर्व' कादंबरीचे प्रकाशन**

कथा, कादंबरी, नाटक अशा विविध साहित्य प्रकारांतून वाचकाला इतिहासाकडे वळविण्याचे काम महाराष्ट्रातील साहित्यिकांनी मोठ्या प्रमाणावर केले, असे प्रतिपादन राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष मधू मंगेश कर्णिक यांनी दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेच्या वतीने आयोजित डॉ. प्रमिला जरग लिखित 'आदिपर्व' कादंबरीचे प्रकाशन करताना केली. अध्यक्षस्थानी कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक भगवंतराव मोरे होते.

डॉ. जरग यांनी इतिहासातील एक उपेक्षित कर्तबगार व्यक्तिमत्त्व कादंबरीच्या माध्यमातून सर्वांसमोर आणले आहे. इतिहासातील अशा अनेक दुर्लक्षित, उपेक्षित व्यक्तिमत्त्वांवरील लेखन प्रकाशित करण्यासाठी राज्य साहित्य आणि संस्कृतीमंडळ पुढाकार घेईल, अशी घोषणाही श्री. कर्णिक यांनी केली.

छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा आणि शहाजी महाराजांचे वडील मालोजीराजे भोसले यांच्या जीवनावर आणि मराठ्यांच्या इतिहासातील एका दुर्लक्षित कालखंडावर प्रकाश टाकणारी मराठीतील ही पहिलीच कादंबरी आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसने ही कादंबरी प्रकाशित केली आहे.

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, ''ऐतिहासिक साहित्यकृतीच्या वाटा इतिहासातून जातात. इतिहास संशोधकांपेक्षाही इतिहासाची खरी कीर्ती साहित्यिकांनी लोकांसमोर मांडली आहे. त्यामुळेच इतिहासाशी समाजाला जोडताना साहित्यिकांची जबाबदारी मोठी असून, इतिहासातील सत्याशी त्यांनी प्रामाणिक असले पाहिजे.''

लेखिका डॉ. जरग म्हणाल्या, ''आई कमलाबाई मोरे यांना जिजाऊंवर लेखन करायचे होते. त्यासाठी त्यांची अभ्यास केला होता; मात्र त्यांचे हे काम अपूर्ण राहिले. ते पूर्ण करण्यासाठी माझा अभ्यास सुरू झाला आणि या अभ्यासात मालोजीराजे यांच्यावर कादंबरी लिहावी, असा विचार पुढे आला.''

राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे पुरस्कार मिळाल्याबद्दल धम्मपाल रत्नाकर, सुचिता पडळकर यांचा सत्कार झाला. मेहता पब्लिशिंग हाऊसचे संचालक

अनिल मेहता, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेचे अध्यक्ष विजय चोरमारे यांची भाषणे झाली. भीमराव धुळूबुळू यांनी सूत्रसंचालन केले.

*** गोविंद पानसरे यांचा अमृत महोत्सव**


"देशावरील भांडवलशाहीचे संकट टाळण्यासाठी समाजवादी, कम्युनिस्ट, आंबेडकरवादी पक्ष, संघटनांसह सामान्यांच्या हितासाठी झटणाऱ्या सर्वच घटकांनी आता एकत्र आले पाहिजे," असे मत भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस कॉम्रेड ए. बी. वर्धन यांनी कोल्हापूर येथे व्यक्त केले. मार्क्सवादाबरोबरच महात्मा फुले, राजर्षी शाहू, आंबेडकर यांचे विचार समाजाच्या तळागाळातील माणसांपर्यंत पोचवण्याचे मौलिक कार्य कॉम्रेड गोविंद पानसरे यांनी केले असे उद्गार त्यांनी पानसरे यांच्या अमृतमहोत्सवी सत्कार सोहळ्यात काढले.

१३० कार्यकर्त्यांची चरित्रे आणि पाच ग्रंथांचे प्रकाशन या कार्यक्रमात झाले. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते डॉ. एन. डी. पाटील होते.

महाराष्ट्रातील परिवर्तनवादी चळवळीतील ज्येष्ठ नेत्यांना एकत्रित आणणारा हा सोहळा ठरला. वर्धन म्हणाले, "देशाला अनेक संतांचा आणि महात्म्यांचा वारसा लाभलेला आहे. त्यांच्या विचारांचा वारसा घेऊन आणि कार्याचा आदर्श घेऊन अनेक क्रांतिकारक निर्माण झाले. भांडवलशाही व्यवस्थेमध्ये सामाजिक हित कधीच पाहिले जात नाही. एकीकडे मूठभर लोक अब्जाधीश होत आहेत, तर दुसरीकडे देशातील सत्तर टक्क्यांहून अधिक लोकांना दिवसाला केवळ वीस रुपयांत गुजराण करावी लागते आहे. हे चित्र बदलण्यासाठी संघटितपणे प्रयत्न झाले पाहिजेत."

प्रा. डॉ. एन. डी. पाटील म्हणाले, "खासगी आणि सार्वजनिक चारित्र्य निष्कलंक असणारी मोजकीच माणसे आपल्याला भेटतात. त्यापैकीच पानसरे हे एक व्यक्तिमत्त्व आहे."

कॉम्रेड पानसरे म्हणाले, "जगातील मोठ्या माणसांचा इतिहास पाहिला तर ते केवळ एकटेच मोठे झाले नाहीत. त्यांना मोठे करण्यात कार्यकर्त्यांचे बळ महत्त्वाचे ठरले. मीही असाच घडलो. त्यामुळे हा सत्कार माझा नसून चळवळीचा आणि

मृत्युशय्येवरच्या अंध मातोश्रीने 'माईंड ट्री'या सॉफ्टवेअर कंपनीचे संस्थापक सुब्रतो बागची यांना दिलेला प्रेरणादायी संदेश

**गो किस द वर्ल्ड**

सुब्रतो बागची । अनु. सुनीति काणे

**किंमत १५०रु. पोस्टेज २५रु.**

चळवळीतील कार्यकर्त्यांचा आहे.''

ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य, रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सरचिटणीस अशोक ढवळे, उमा पानसरे, उत्तम कांबळे यांचीही या वेळी भाषणे झाली.

*** कै. वि. श्री. जोगळेकर शोधनिबंध स्पर्धा**

पुणे पत्रकार प्रतिष्ठानतर्फे घेण्यात आलेल्या कै. वि. श्री. जोगळेकर शोधनिबंध स्पर्धेतील विजेत्यांना सुधीर गाडगीळ यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

निबंध स्पर्धेत राजेंद्र येवलेकर, मोहिनी वागेश्वरी (प्रथम), दीपक कांबळे, धनंजय बिजले, ब्रिजमोहन पाटील (द्वितीय), प्रशांत चव्हाण (तृतीय), किशन काळे, सुनीत भावे, ताजेश काळे, उमेश धोंगडे (उत्तेजनार्थ) यांना पारितोषिके मिळाली. अभय दातार, प्रा. संतोष दास्ताने यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

''पत्रकार म्हणून काम करण्याचा अनुभव निवेदन करताना खूप उपयागी पडला. मुलाखती घेताना कितीही थेट प्रश्न विचारला तरी त्याच्या मांडणीची मर्यादा कधी सोडली नाही. निवेदन करताना, मुलाखती घेताना लिहिलेली डायरी, टिपणे यांचे पुस्तक करायचा विचार आहे.'' असे सुधीर गाडगीळ यांनी स्पष्ट केले.

२५ नोव्हेंबर रोजी वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल गाडगीळ यांचा विशेष सत्कार करण्यात आला. अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी गाडगीळ यांची मुलाखत घेतली. प्रतिष्ठानचे अध्यक्ष शशिकांत भागवत, कार्यवाह प्रकाश भोईटे, श्रमिक पत्रकार संघाचे सरचिटणीस संतोष कुलकर्णी या वेळी उपस्थित होते.

गाडगीळ म्हणाले, ''मुलाखती घेण्यासाठी संदर्भ गोळा करण्याची सवय पत्रकारितेमुळे लागली. समोरची व्यक्ती व्यावसायिक जगात कितीही मोठी असली तरी दडपण घ्यायचे नाही, हे पत्रकारितेने शिकवले. लाडंलाडं बोलून अनुक्रमणिका वाचण्यापलीकडे निवेदन नेले पाहिजे, हे ठरवून त्या दृष्टीने प्रयत्न केले. त्यामुळे निवेदनालाही टाळ्या मिळू शकल्या. सदाशिव पेठ, नूमवि शाळा, बीएमसीसी महाविद्यालय यांचाही माझ्या जीवनात महत्त्वाचा वाटा आहे.''

*** प्रा. शंकर वैद्य यांचा अमृतमहोत्सव**

'स्वरानंद प्रतिष्ठान' आणि 'अंतरा नृत्य निकेतन' यांच्या संयुक्त विद्यमाने प्रा. शंकर वैद्य यांचा सत्कार शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, संगीतकार हृदयनाथ मंगेशकर व भावगीत गायक अरुण दाते यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी अनुराधा जोग, सुधीर मोघे, प्रा. प्रकाश भोंडे उपस्थित होते.

शब्द झोपलेले असतात, ते वाचले जातात तेव्हा जागवले जातात व त्यांना ध्वनिमुद्रित केले की ते नादावतात, अशी भावना कविवर्य प्रा. शंकर वैद्य यांनी व्यक्त

केली. ते म्हणाले, पाण्यात बुडविलेल्या गाथा वर काढाव्यात तशा माझ्या आठवणी येथे सांगण्यात आल्या. त्या ऐकून मी भारावून गेलो. एकदा मला पुरंदरे म्हणाले होते की, तू शंकराच्या प्रसादासारखा आहेत. तू आता मोठे लिहायला पाहिजे, असे मला वाटते. त्यामुळे मी लिहीत गेलो.

''प्रेम, जिव्हाळा, ममता या गोष्टी मला चांगल्याप्रकारे प्रा. वैद्य यांच्यामध्ये दिसून आल्या. कारण ते आम्हाला संकटात असतानाही धीर देत होते. त्यामुळे ते आमच्या अव्यक्त नात्यातलेच आहेत, असे समजतो.'' अशी भावना पुरंदरे यांनी व्यक्त केली.

श्री. मंगेशकर म्हणाले, 'स्वरगंगेच्या काठावरती वचन दिले तू मला' हे गाणे ऐकले की वैद्यांची आठवण येते. त्यांची स्मरणशक्ती पाहून आम्ही आश्चर्यचकित होतो. वैद्य हे एक विद्वान, चांगले समीक्षक, कवी, लेखक, निरुपणकार आहेत.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शैला मुकुंद यांनी केले. प्रास्ताविक प्रकाश भोंडे यांनी केले.

### * तीर्थदर्शन पुस्तिकेचे प्रकाशन

युगल धर्म संघातर्फे 'तीर्थदर्शन' पुस्तिकेचे प्रकाशन आमदार माधुरी मिसाळ, रसिकशेठ धारिवाल, विजयकांत कोठारी, विलास सुराणा, सज्जनबाई बोथरा, हरकचंद पारख, विजय भंडारी, ओमकारमल भंडारी यांच्या हस्ते करण्यात आले.

युगल धर्म संघातर्फे २ जानेवारी ते १४ जानेवारी २०११ दरम्यान समेद शिखर यात्रा आयोजित केली आहे. या संदर्भातील आणि जैन तीर्थक्षेत्रांची माहिती पुस्तिकेत देण्यात आली आहे.

### * मुंबई साहित्यसंघाचे पुरस्कार

'येशू पाटील, अरुण फडके, शुभांगी पांगे, शशिकांत सावंत, हे सारेच नव्या साहित्ययुगाचे प्रतीक आहेत. वेगवेगळ्या माध्यमातून ते साहित्याची सेवा करत आहेत आणि ती मोलाची आहे,' असे कौतुकोद्‌गार गिरगावातील साहित्यसंघात झालेल्या कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांनी काढले.

साहित्य संघाचा मानाचा वि. पु. भागवत प्रकाशन पुरस्कार बोरिवलीच्या 'शब्द पब्लिकेशन'ला मिळाला. तर मंगेशराव नारायण कुलकर्णी पुरस्कार, केशव भिकाजी ढवळे पुरस्कार आणि बाळकृष्ण गणेश ढवळे पुरस्कार अनुक्रमे शशिकांत सावंत, अरुण फडके व शुभांगी पांगे यांना प्रदान करण्यात आले. मानपत्र, शाल व रोख पाच हजार रुपये असे या पुरस्कारांचे स्वरूप होते.

'शब्द पब्लिकेशन'चे कौतुक करताना कर्णिक म्हणाले, ''या प्रकाशनाने परंपरा आणि नवतेचे भान राखलेले आहे. तसेच आज जे कुणी नवीन लेखन करत आहेत,

त्यांना ‘शब्द पब्लिकेशन’ हक्काचे व्यासपीठ वाटत आहे.’’

साहित्यावरील प्रेमापोटी गेली बावीस वर्षे ‘मॅजेस्टिक प्रकाशन’मध्ये संपादनाचे काम करणाऱ्या शुभांगी पांगे यांचेही त्यांनी कौतुक केले. इंग्रजी-मराठी दुर्मीळ पुस्तके उपलब्ध करून देणारे शशिकांत सावंत आणि मराठी भाषेच्या शुद्धतेचा ध्यास घेऊन विविध शब्दकोश तयार करणारे अरुण फडके यांचा कर्णिक यांनी गौरव केला.

‘शब्द पब्लिकेशन’चे येशू पाटील यांनी ‘जातीय आणि धार्मिक तेढ उत्पन्न करणारे साहित्य आपण कधीही प्रकाशित करणार नाही,’ या भूमिकेचा पुनरुच्चार केला. तर शशिकांत सावंत यांनी दु:खांवर फुंकर घालण्याची आणि ज्ञानाची कवाडं उघडण्याची ताकद पुस्तकात आहे असे म्हटले.

अरुण फडके यांनी कोश स्वरूपात केलेल्या आपल्या कामाचे श्रेय मोरो केशव दामले, मो. रा. वाळिंबे, श्री. पु. भागवत, सरोजिनी वैद्य, गं. ना. जोगळेकर यांना दिले.

शुभांगी पांगे यांनी सदानंद व रामदास या भटकळबंधूंनी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. मॅजेस्टिकमध्ये अशोक कोठावळे यांनी कायमच आपल्याला सांभाळून घेतल्याचे सांगितले.

### * डॉ नरेंद्र जाधव यांनी अनुवादित केलेल्या कवितासंग्रहाचे प्रकाशन

डॉ. नरेंद्र जाधव यांनी टागोर यांच्या मराठीत अनुवादित केलेल्या १५१ कवितांच्या ‘भयशून्य चित्त जेथे...’ या संग्रहाचे प्रकाशन गुलजार यांच्या हस्ते झाले.


गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांच्या साहित्यामुळे जीवनाला कलाटणी मिळाली असे मत कवी-गीतकार गुलजार यांनी व्यक्त केले. टागोर यांचा साहित्याचा अभ्यासक्रमात समावेश व्हावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

गुलजार म्हणाले, ‘‘शालेय जीवनात पुस्तकवाचनाची गोडी लागली. रहस्यकथा वाचनाकडे अधिक ओढा असायचा. त्या काळी आठवड्याला २५ पैसे देऊन पुस्तके वाचनासाठी घेत होतो. रात्र-रात्र जागून पुस्तके वाचली. पुस्तकवाचनाचा कधी कंटाळा आला नाही; पण पुस्तक देणारा कंटाळला. त्याने एकदा त्रासून मागणी

जगाच्या उज्ज्वल भविष्याची किल्ली उद्याच्या भारतात आहे असा विश्वास बाळगणाऱ्या श्री. नारायण मूर्ती यांनी जगभरात दिलेल्या व्याख्यानांचे संकलन

अ बेटर इंडिया अ बेटर वर्ल्ड

एन. आर. नारायण मूर्ती अनु. चित्रा वाळिंबे

किंमत २५०रु. पोस्टेज ३०रु.


नसलेले पुस्तक हाती टेकवले. गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांचे उर्दूत अनुवादित झालेले ते पुस्तक होते. त्या पुस्तकामुळे आयुष्याला कलाटणी मिळाली. त्यांच्या साहित्याचा माझ्यावर प्रचंड प्रभाव पडला. त्यातूनच बंगाली शिकण्याचा निर्णय घेतला. बंगाली शिकण्यासाठी 'प्रेमपत्रां'चा आधार घेतला.''

''टागोर केवळ बंगालचे नव्हते, तर आंतरराष्ट्रीय ख्याती मिळालेले व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्याविषयी नव्या पिढीला माहिती होण्यासाठी त्यांच्या साहित्याचा शालेय अभ्यासक्रमात समावेश व्हावा.''

*'एक देहाती सर गुढ की भेली बंधा*
*लंबेचौडे मैदान गुजर रहा था'*

ही टागोर यांची हिंदीत अनुवादित झालेली कविता गुलजार यांनी सादर केली.

नरेंद्र जाधव यांनी सांगितले की, रवींद्रनाथ टागोर यांच्या मराठीत अनुवादित झालेल्या कविता वाचनात आल्या. गुरुदेवांच्या 'गीतांजली' या काव्यसंग्रहाचे मराठी भाषेत एकूण ११ अनुवाद झाले आहेत; पण पु. ल. देशपांडे यांच्या आजोबांनी केलेल्या अनुवादाव्यतिरिक्त इतरांच्या अनुवादात फारसा दम नव्हता, त्यामुळे नव्याने अनुवाद करण्याचे ठरवले. त्यांचे लेखन सर्वस्पर्शी होते. ते गीतकार, संगीतकार, लेखक, निबंधकार, तत्त्वचिंतक होते.

डॉ. जाधव याची मुलाखत समीरण वाळवेकर यांनी घेतली. ग्रंथाली प्रकाशनाच्या लतिका भानुशाली यांनी मनोगत व्यक्त केले. सुरेश पिंगळे यांनी आभार मानले.

*** सरसेनापती खंडेराव उमाबाई दाभाडे यांच्या कर्तृत्वाची गाथा**

छत्रपती शाहू महाराजांच्या राज्यात खंडेराव दाभाडे व त्यांच्या पत्नी उमाबाई दाभाडे या दोघांनाही सेनापतिपद मिळाले. इतिहासातील या घटनेची नोंद लिम्का बुक ऑफ रेकॉर्डने घेतली असून, एकाच राजाच्या आधिपत्याखाली, एकाच सेनेचे सेनापतिपद भूषविलेले एकमेव दांपत्य म्हणून त्यांची नोंद केली आहे. पुढील वर्षी प्रसिद्ध होणाऱ्या आवृत्तीत ही नोंद असेल.

सत्यशीलराजे दाभाडे म्हणाले, ''खंडेराव दाभाडे यांना वंशपरंपरेने १२ जानेवारी १७१७ रोजी सेनापतिपद मिळाले. त्यांचे २७ सप्टेंबद १७२९ला निधन झाल्यावर थोरले चिरंजीव त्र्यंकबराव दाभाडे यांच्याकडे सेनापतिपद आले. पण ते दभईच्या युद्धात मारले गेले. या वेळी खंडेराव दाभाडे यांची दुसरी मुले यशवंतराव व सवाई बाबूराव लहान होती. त्यामुळे शाहूमहाराजांनी उमाबाईसाहेब यांच्याकडे सेनापतिपद दिले. त्या अभोणकर देवराव ठोके-देशमुख यांच्या कन्या होत्या. कोल्हापूरच्या महाराणी ताराबाई यांच्याकडून त्या युद्धकला शिकल्या. गुजरातवर दाभाडे यांचे राज्य होते. मुघल सरदार जोरावर खान बाबी यांनी १७३२ मध्ये अहमदाबादवर स्वारी

केली. ही लढाई लढण्याठी शाहू महाराजांनी सेनापतिपद उमाबाईंना दिले. भद्र नावाच्या किल्ल्याबाहेर झालेल्या या लढाईत उमाबाईंनी जोरावर खान बाबीचा पराभव केला. त्यामुळे छत्रपतींनी सोन्याच्या तोड्याचा मान दिला. उमाबाई एकमेव महिला सेनापती होत्या. त्यांची मुले मोठी झाल्यावर हे पद मुलांकडे गेले. पुणे जिल्ह्यातील तळेगाव दाभाडे येथे उमाबाई राहायच्या. अजूनही तिथे त्यांचा राजवाडा आहे. खंडेराव दाभाडे यांची समाधी उमाबाईंनी तेथेच बांधली. तिच्यावर शिल्परूपात महाभारतातील कथा कोरल्या आहेत. अशा या पराक्रमी महिला सेनापतीचे २८ नोव्हेंबर १७५३ ला पुण्यात निधन झाले. दाभाडे घराण्यावर सध्या मी पुस्तक लिहीत आहे. त्या वेळी पती-पत्नी दोघेही सेनापती असल्याचे माझ्या लक्षात आले. याविषयी शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्यासह अनेक इतिहासकारांशी बोललो. त्यानंतर लिम्का बुक ऑफ रेकॉर्डच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. त्यानंतर आता या बुकमध्ये नोंद होत आहे.''

*** भा. रा. भागवत जन्मशताब्दी समारोप**

बालकांची मने संस्कारक्षम व्हावी, हा विचार भा. रा. भागवत यांनी आपल्या साहित्यातून रुजवला. 'फॅण्टसी' केवळ भुताखेतांच्या गोष्टीत नसते, असे सांगतानाच मुलांच्या मानसिक गरजा आणि काळाशी समांतर राहणारे साहित्य त्यांनी निर्माण केले. असेच साहित्य वाचकांशी नाळ जोडते, असे मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. मधु मंगेश कर्णिक यांनी व्यक्त केले.

अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेतर्फे भा. रा. भागवत जन्मशताब्दीच्या समारोपानिमित्त 'बालमित्र भा. रा. भागवत' ग्रंथाचे प्रकाशन मधु मंगेश कर्णिक यांच्या हस्ते झाले. लीलाबाई भागवत, सदा डुंबरे, डॉ. वीणा देव इ. यावेळी उपस्थित होते.

कर्णिक म्हणाले, साहित्य ही निर्मिती आहे. मुलांच्या आकलनशक्तीला रुचेल अशी साहित्यनिर्मिती भागवत यांनी केली, असे लिखाण करणे अवघड आहे. सध्या ते लिखाण होत नाही. बालकांसाठी जे साहित्य लिहिले जाते, त्यात गांभीर्याने विचार केला जात नाही. लहान मुलांचे भावविश्व विकसित करणे हे लेखकाचे काम आहे.

डॉ. न. म. जोशी म्हणाले, बालसाहित्याला आधुनिक काळात प्रतिष्ठा मिळवून देणारा निरागस साहित्यभास्कर म्हणजे भागवत.

वीणा देव म्हणाल्या, दादांचे बालमित्र मासिक मी लहानपणी वाचले. आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोन त्यांच्या लेखनात होता. मुलांना बदलत्या काळाचा संदर्भ देणे हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य होते. त्यांनी बालसाहित्याची साधना केली.

मदन हजेरी यांनी सूत्रसंचालन केले. अनिल कुलकर्णी यांनी आभार मानले.

### * 'जागतिकीकरण' पुस्तकाचे प्रकाशन

अमेरिकेच्या नेतृत्वाखालील भांडवलशाहीने जागतिकीकरण कृत्रिमरीत्या जगावर लादले आहे. त्यातून ठराविक लोकांची संपत्ती वाढत असली, तरी दुसऱ्या बाजूला दारिद्र्य, बेकारी व प्रदूषण यामध्ये प्रचंड प्रमाणात वाढ होत आहे. यामुळे अशा जागतिकीकरणाच्या विरोधात लोकांनी एकत्र आले पाहिजे, असे विचार समाजवादी नेते भाई वैद्य यांनी रावसाहेब कसबे यांच्या 'जागतिकीकरण : स्वरूप आणि भवितव्य' या पुस्तकाचे प्रकाशन करताना व्यक्त केले.

कम्युनिस्ट नेते अजित अभ्यंकर, जयदेव गायकवाड, डॉ अनिल सपकाळ, सुमेध प्रकाशनचे सुशील म्हसदे या वेळी उपस्थित होते.

वैद्य म्हणाले, कसबे यांनी नवे बदल लक्षात घेऊन जागतिकीकरणाबाबत पुस्तकातून नवी मांडणी केली आहे. ऐंशीच्या दशकानंतर झालेले जागतिकीकरण कृत्रिम आहे. हे जागतिकीकरण संस्कृती, आचार व विचारांचे नव्हे, तर गुंतवणुकीचे आहे. त्यातून ठराविक लोकांची, भांडवलशहांची संपत्ती वाढली. पण हे जागतिकीकरण होत असताना बेकारी मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. त्यामुळे त्याची वेगळी मांडणी करावी लागणार आहे. कसबे यांचे पुस्तक त्याचे पहिले पाऊल आहे.

सत्ताधारी व विरोधी पक्षही जागतिकीकरणाला विकले गेले आहेत. त्यांनी अमेरिकेची भांडवलशाही येथे आणायचे ठरविले आहे.त्यामुळे या विरोधात लोकांनी एकत्र आले पाहिजे. त्याचे नेतृत्व विचारवंतांनी करायला हवे.

अभ्यंकर म्हणाले की, कसबे यांनी पुस्तकातून जागतिकीकरणाचे वर्णन नव्हे, तर आर्थिक, राजकीय, ऐतिहासिक विश्लेषण केले आहे. जागतिकीकरणाचा सर्व बाजूंनी विचार झाला पाहिजे. जागतिकीकरणाला शत्रू समजू नये.

### * 'एका पायावर' चे प्रकाशन

माणसातल्या माणुसकीचा प्रत्यय देणारी माणसे या समाजामध्ये आहेत याची प्रचिती 'एका पायावर' या पुस्तकातून येते. आपत्तीतून उभे राहण्याची ताकद हे बलस्थान असलेल्या पुस्तकातून जिद्दीचे अनोखे दर्शन घडते, असे मत सुरेशचंद्र पाध्ये यांनी व्यक्त केले.

'प्रतिमा प्रकाशन'तर्फे आरती शिदीडलिखित 'एका पायावर' या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. के. एच. संचेती यांच्या हस्ते झाले.

पाध्ये म्हणाले, ''अपघातामध्ये पाय गमावलेल्या पतीला बरे करून त्याला जीवनात पुन्हा उभे करण्यासाठी कष्ट घेऊन आरती शिदीड यांनी एका अर्थाने आधुनिक सावित्रीची भूमिका बजावली आहे. या लेखनामध्ये माणुसकीचा झरा आहे.''

डॉ. संचेती म्हणाले, ''जीवनामध्ये सुख आणि दु:ख यांचा समतोल असतो.

दुःखाने वाईट वाटून घ्यायचे नसते आणि सुखाने हुरळून जायचे नसते. आत्मविश्वासाच्या बळावर कोणत्याही कामामध्ये यश मिळते. या लेखनामध्ये हृदयाची भाषा सामावलेली आहे.''

प्रा. मिलिंद जोशी म्हणाले, ''जीवनामध्ये संकटांची मालिका सुरू असताना संघर्षाची तमा न बाळगता शिदीड यांनी केलेली वाटचाल ही प्रचंड आशावाद, दुर्दम्य इच्छाशक्ती, त्याग आणि समर्पण यांचे दर्शन घडवते.''

आरती शिदीड म्हणाल्या, ''दुःखात न डगमगण्याच्या स्वभावामुळे हा अपघात आम्ही किरकोळ स्वरूपात स्वीकारला आणि जगण्याच्या नव्या दिशा शोधल्या.''

शिदीड म्हणाले, ''मन आणि शरीर खंबीर असल्याने अपघात होऊनही मी खचलो नाही. २५ वर्षांपूर्वी अपघातातून वाचलो, तो एक आनंदाचा क्षण आणि आज दुसरा आनंदाचा क्षण आहे. खूप संकल्प सिद्ध करायचे आहेत.''

*** 'उद्योजक व्हा' पुस्तकाचे प्रकाशन**

''मराठी माणूस उद्योजक व्हायचा विचार करत नाही, धोपटमार्ग सोडण्याचे धाडस करत नाही. मात्र, उद्योजक व्हायचे असेल तर धोपटमार्ग सोडून बिकट मार्गाचीच निवड करावी लागते,'' असे मत सुरेशचंद्र पाध्ये यांनी व्यक्त केले.

इंद्रायणी साहित्य, युवा आणि बिझनेस मंत्राच्या वतीने आयोजित कार्यक्रमात डॉ. सुधीर राशिंगकर यांच्या 'उद्योजक व्हा' या पुस्तकाचे प्रकाशन महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे कार्यकारी संचालक किरण कुलकर्णी यांच्या हस्ते झाले.

''उद्योजकता ही एक वृत्ती असून ती स्वत: उद्योजक होण्याचे धाडस दाखविणाऱ्यात दिसून येते. उद्योजकतेचे सर्जनशीलतेशी नाते आहे. एका उद्योजकानेच उद्योजकतेवर लिहिलेले हे पुस्तक अनेकांना प्रेरणादायी ठरेल.'' असे कुलकर्णी म्हणाले.


डॉ. राशिंगकर म्हणाले, ''उद्योजकता ही उपजतच असावी लागते, हा गैरसमज आहे. उद्योजकता जाणीवपूर्वक विकसित करता आणि वाढविता येते. मात्र यासाठी आपण आपला दृष्टिकोन बदलला पाहिजे.''


वादग्रस्त लेखिका तसलिमा नासरिन यांच्या 'आमार मेयेबेला' (माझं कुंवारपण) या आत्मचरित्राचा दुसरा भाग

उधाण वारा

अनु. विलास गीते

किंमत ४००रु. पोस्टेज ३०रु.



*** डॉ. आनंद कर्वे यांचा अमृतमहोत्सव**

''ग्रामीण भागात शेणाचा वापर न करता बायोगॅस करून त्यातून ऊर्जानिर्मिती करण्यासाठी, तसेच रासायनिक खते न वापरता शेती करण्यासाठी काय करता येईल, या दोन विषयांवर सध्या संशोधन चालू आहे. या दोन्ही संशोधनांचे फलित थोड्याच काळात बघण्यास मिळेल. त्यामुळे शेतकऱ्यांचा फायदा होईल,'' असा विश्वास ज्येष्ठ शास्त्रज्ञ व 'आरती' इन्स्टिट्यूटचे प्रमुख डॉ. आनंद कर्वे यांनी व्यक्त केला.

डॉ. कर्वे यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिर्मित डॉ. अनिल अवचट यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

डॉ. कर्वे म्हणाले, ''खेड्यात शेणावर चाललेले बहुसंख्य बायोगॅस प्रकल्प बंद पडले आहेत. बायोगॅससाठी आवश्यक असलेले विषाणू शिल्लक राहिलेल्या अन्नापासूनही तयार होतात. या विषाणूंसाठी सेल्युलोज आवश्यक असतो. त्यामुळे तशा प्रकारच्या वनस्पती वाढवून मोठ्या प्रमाणात बायोगॅस प्रकल्प उभारता येतील. येत्या वर्षभरात हे प्रकल्प सुरू होतील.''

डॉ. अवचट म्हणाले, ''कर्वे यांची संशोधनवृत्ती, विचार, कार्यशीलता पाहून विस्मित झाल्यासारखे होते. प्रत्येक गोष्ट तपासूनच ते पुढे जातात. अनेक संशोधकांना स्वत:चे यशच महत्त्वाचे वाटते. पण, जर्मनीत महत्त्वाचे संशोधन करून कर्वे पुन्हा शेतकऱ्यांसाठी काम करण्यास परत आले. हे खरे माळावरचे संशोधक आहेत. समाजासाठी काही तरी करण्यासाठी महर्षी कर्वे यांचा वारसा ते पुढे चालवत आहेत. शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे असलेले, त्यांचे काम देशाच्या कानाकोपऱ्यात पोचविण्याचे आश्वासन आपण दिले पाहिजे.''

*** जागतिक शांततेसाठी हवी भाकरी आणि समताही**

जगण्यासाठी समतेमुळे आणि भाकरीमुळे जागतिक शांतता प्रस्थापित होईल. मानवाच्या मुलभूत गरजा पूर्ण होतील तेव्हा मनाच्या शांततेबद्दल बोलणे योग्य ठरते, असे प्रतिपादन तुषार गांधी यांनी केले.

विश्वशांती केंद्र (आळंदी) माईर्स एमआयटी आणि श्रीसंत ज्ञानेश्वर तुकाराम व्याख्यानमाला न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने युनेस्को अध्यासनांतर्गत व्याख्यानमालेत डॉ. के. एच. संचेती, द. भि. कुलकर्णी, बाबासाहेब पुरंदरे, डॉ. अनिल अवचट, भरतकुमार राऊत, डॉ. जगदीश हिरेमठ यांची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.

तुषार गांधी म्हणाले, ''महात्मा गांधी, गौतम बुद्ध यांनी दिलेली शांततेची शिकवण पाश्चात्य लोकांनीही स्वीकारली आहे. देशात गरिबी वाढते आहे. ग्रामीण

भागातील मुले अजूनही कुपोषित आहेत. प्रगतीच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या जमिनी लाटल्या जात आहेत. विध्वंसकारी शस्त्रे-अण्वस्त्रे तयार करणे आणि संत ज्ञानेश्वर, महात्मा गांधी, बुद्ध यांची शांततेची शिकवण आचरणात आणणे हा समाजातील विरोधाभास आहे. प्रगती करणाऱ्यांनी मागासलेल्यांना थोडा मदतीचा हात दिला तर ही असमानता कमी होईल. स्वातंत्र्योत्तर शांतीपूर्ण समाजाची जडणघडण हेच महात्मा गांधीजींचे स्वप्न होते.''

डॉ. विश्वनाथ कराड, युनेस्कोचे सहायक संचालक जी. व्ही. राव, डॉ. संजय उपाध्ये, डॉ. ललित क्षीरसागर आणि सुधीर राणे आदी उपस्थित होते.

### * बंच ट्रेकिंग मालिकेचे प्रकाशन

ऐतिहासिक वास्तूंची आणि इतिहासाची जपणूक करण्यासाठी संवेदनशील मन असावे लागते, असे मत शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी व्यक्त केले.

स्नेहल प्रकाशनच्या वतीने महेश तेंडुलकर यांच्या बंच ट्रेकिंग या पुस्तकांच्या मालिकेचे प्रकाशन करण्यात आले. या वेळी स्नेहल प्रकाशनचे संचालक रवींद्र घाटपांडे, डेक्कन कॉलेजचे कुलपती डॉ. गो. बं. देगलूरकर हे उपस्थित होते.

पुरंदरे म्हणाले की, शिवकालीन किल्ले, कागदपत्रे, चित्रे व ग्रंथ हे सर्व आपले वैभव आहे. या गोष्टी आपल्या इतिहासाची साक्ष देतात, पण आपणच करंटे आहोत. या गोष्टी एक एक करून नष्ट होत चालल्या आहेत. इतिहास जपण्यासाठी संवेदनशील मन असावे लागते. हेच मन कधी तो इतिहासचित्र काढून तर कधी पोवाडा रचून जतन करत असते.

पुस्तकाविषयी ते म्हणाले, किल्ले समजावून घेतले तर त्यांची ओढ लागते. हे पुस्तक किल्ले समजावून घेण्यासाठी फार उपयुक्त आहे. या पुस्तकातून किल्ले आपल्यासोबत बोलतात. प्रत्येक किल्ल्याच्या बाबतीत काही प्रसंग, कथा, दंतकथा आहेत. त्याही बऱ्याच गोष्टी उलगडून दाखवतात. इतिहासाचा एक भाग म्हणून त्यांचे संकलन करायला हवे.

देगलूरकर म्हणाले, महाराष्ट्राच्या प्रत्येक भागाला स्वत:चा इतिहास आहे. तो लेखनबद्ध होणे आवश्यक आहे. या पुस्तकातून लेखकाची ट्रेकिंगची दृष्टी दिसते.

तेंडुलकर म्हणाले, या पुस्तकांच्या मालिकेतून किल्ल्यांची ऐतिहासिक आणि भौगोलिक माहिती मिळेल व ती पर्यटकांना किल्ल्यांकडे आकर्षित करेल.

### * अनुवादकांसाठी 'शॉर्टटर्म' डिप्लोमा

विज्ञानापासून ते जनसंपर्कापर्यंत आणि कायद्यापासून ते प्रशासनापर्यंत सर्वच क्षेत्रांमध्ये अनुवादकांना मोठी मागणी आहे. म्हणूनच या काहीशा दुर्लक्षित करियरची ओळख करून देण्याच्या उद्देशाने 'ऐक्यभारती रिसर्च इन्स्टिट्यूट'तर्फे चार डिसेंबरपासून

'अनुवाद पदविका' (इंग्रजी-मराठी) अभ्यासक्रम सुरू झाले आहेत.

अनुवाद पदविका हा चार महिन्यांचा शॉर्ट टर्म अभ्यासक्रम असून यामध्ये अनुवादाचे प्रकार, साहित्यागणिक त्यामध्ये होणारे बदल यांचा आढावा घेण्यात येणार आहे. मराठी-इंग्रजी आणि इंग्रजी-मराठी अशा दोन्ही अनुवाद प्रकारांचा अभ्यासक्रमात समावेश आहे. जनसंपर्क माध्यमे आणि कायदेविषयक अनुवाद यावर अभ्यासक्रमात विशेष भर देण्यात येणार आहे, असे इन्स्टिट्यूटच्या संचालिका डॉ. दुर्गा दीक्षित म्हणाल्या.

मराठी साहित्य ग्लोबल बनवायचे असल्यास त्याचा इंग्रजी आणि इतर भारतीय भाषांमध्ये दर्जेदार अनुवाद व्हायला हवा. इंग्रजीतीलही केवळ 'बेस्टसेलर' साहित्यच आज मराठीत अनुवादित होते. एकूणच अनुवादक्षेत्राची व्याप्ती वाढविण्याच्या उद्देशाने हा अभ्यासक्रम सुरू होत आहे. शासकीय, कायदेशीर व्यवहारांमध्ये आणि प्रसारमाध्यमांमध्येही अनुवादाला महत्त्व असल्याने अभ्यासक्रम पूर्ण, करणाऱ्यांना अनेक क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. या अभ्यासक्रमाला राज्य सरकारची मान्यता मिळाल्यास अन्य शहरांमध्येही हा अभ्यासक्रम सुरू करण्याचा संस्थेचा मनोदय आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क - २५५१२८६८, ९९२३०६४४१०

## * लिटरेचर लाइव्ह फेस्टिव्हल

तरुण पिढीचे वाचन कमी झालेले नाही आणि अनेकजण गृहीत धरतात त्याप्रमाणे हा वर्ग निद्रिस्तही नाही, असे मत प्रसिद्ध लेखक चेतन भगत यांनी व्यक्त केले. युवा पिढी आजूबाजूचे बदल टिपून त्यावर योग्य वेळी भाष्यही करीत असते. ही पिढी संवेदनशील असल्याने भारताची प्रगती घडविण्यास तिचा नक्कीच हातभार लागेल, अशी आशा त्यांनी लवासा सिटीतील इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटरमध्ये आयोजिलेल्या 'लिटरेचर लाइव्ह फेस्टिव्हल'च्या समारोप सत्रामध्ये 'स्पीकिंग फॉर यंग इंडिया' या विषयावर बोलताना प्रकट केली. या फेस्टिव्हलला लेखक, प्रकाशक आणि वाचक यांच्याकडून भरघोस प्रतिसाद मिळाला.

नवोदित लेखकांबाबत भगत म्हणाले, की लेखकांनी आपल्या निर्मितीमध्ये गुणवत्ता ठेवणे आवश्यक आहे. अनेक पुस्तके येतील आणि जातील. पण, त्यातील गुणवत्तापूर्ण लेखनच टिकेल. हे ओळखून इतरांच्या शैलीची नक्कल न करता प्रत्येकाने आपापल्या स्वतंत्र शैलीचा आविष्कार केला पाहिजे. 'लिटरेचर लाइव्ह'सारखे महोत्सव लेखकांना केंद्रस्थानी ठेवण्यास मदत करतात.

## * रवींद्र भट यांचे साहित्य आता ब्रेल लिपीमध्ये

कै. रवींद्र भट यांचे वाङ्मय कुमुद भट यांनी 'नॅशनल असोसिएशन फॉर द

ब्लाइंड' संस्थेचे उमेश जेरे यांच्या सहकार्याने ब्रेलमध्ये आणले आहे. 'दीनांची माऊली', 'जय गंगे भागीरथी', 'कान्हियाने चोरी केली', 'कथा ही भारत रत्नाची' (स्वामी विवेकानंद), 'ओठावरली गाणी', 'शालेय स्फूर्तिगीते', 'सावरकर', 'समर्थ रामदास' या पुस्तकांसह भट यांचा कवितासंग्रहदेखील ब्रेल लिपीमध्ये उपलब्ध झाला आहे. ''काही वर्षांपूर्वी मुलांच्या अंधशाळेत 'इंद्रायणी काठी' या भटांच्या कादंबरीवर आधारित संगीत कार्यक्रम केला होता. ज्ञानेश्वरांचे चरित्र ऐकताना मुले भारावून गेली. कार्यक्रम संपल्यावर 'काका, हे पुस्तक आम्हाला कसे वाचता येणार?' असा प्रश्न काही मुलांनी विचारला; पण त्या वेळी ब्रेल लिपीचे तंत्रज्ञान परवडण्याजोगे नव्हते. आता ते आटोक्यात आल्याने हा प्रकल्प पूर्णत्वास जाऊ शकला.''

*** 'मराठी भौतिकशास्त्र' पुस्तकाचे प्रकाशन**

''विज्ञानाच्या मूलभूत संकल्पना न समजल्याने विद्यार्थी विज्ञानापासून दूर जातात. म्हणून विद्यार्थ्यांसमोर मी 'ओव्यांतून विज्ञान' मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांत विज्ञानाबाबतची आत्मीयता निर्माण होईल असा विश्वास वाटतो,'' असे पुणे विद्यापीठाचे भौतिकशास्त्र विभागप्रमुख पंडित विद्यासागर यांनी सांगितले.

ज्ञानभाषा प्रकाशनतर्फे आयोजित कार्यक्रमात इयत्ता अकरावीच्या 'भौतिकशास्त्र' विषयाच्या मराठी पुस्तकाचे प्रकाशन विद्यासागर यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी पोलिस अधिकारी माधव कर्वे, स. प. महाविद्यालयाचे प्राचार्य दिलीप शेठ, ग्राहक पेठेचे सूर्यकांत पाठक, शिक्षण विभागाचे सहायक संचालक पी. पी. साबळे, मॉडर्न महाविद्यालयाचे उपप्राचार्य जगदीश चिंचोरे, उपस्थित होते.

''विज्ञानाच्या मूलभूत संकल्पना समजायला हव्यात. त्या समजल्या नाहीत, तर विद्यार्थी विज्ञानापासून दूर जातात. याबरोबरच शास्त्रज्ञांची कामगिरी, शोध, सिद्धांत, विज्ञानाचा इतिहास समजावा म्हणून 'ओव्यांतून विज्ञान' सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. सध्या आठशे ओव्या लिहून झालेल्या आहेत. यावरील पुस्तक लवकरच वाचकांसमोर येईल,'' असे विद्यासागर यांनी सांगितले.

शास्त्र विषयांची पुस्तके मराठीतून उपलब्ध व्हायला हवीत, असे कर्वे यांनी

**शांत, सुंदर, जगाचं भान नसलेल्या, कृष्णमय झालेल्या मीरेचे दर्शन ओशोंच्या प्रवचनांमधून**

*मीरेच्या प्रेमतीर्थावर* अनु. स्वाती चांदोरकर *मीरा एक वसंत आहे*

किंमत प्रत्येकी १५०रु.
पोस्टेज प्रत्येकी २५रु.

सांगितले. शेठ म्हणाले, ''अभ्यासक्रमाची बरीचशी पुस्तके मराठीत उपलब्ध होत नाहीत. 'भौतिकशास्त्र' या पुस्तकापासून सुरू झालेली भाषांतराची चळवळ आपण सर्वांनी टिकवून ठेवायला हवी.'' शिक्षणच नव्हे; तर सर्व क्षेत्रांत मराठी भाषेचा अधिकाधिक वापर व्हायला हवा, असे पाठक यांनी सांगितले.

''इंग्रजीतून शिक्षण घेतल्यानेच माणूस मोठा होतो, हा निव्वळ भ्रम आहे. इंग्रजी माध्यम विद्यार्थ्यांवर लादले जाऊ नये,'' असे साबळे यांनी सांगितले.

*** हिंदी चित्रपटसृष्टीकडून सध्या लोकशाहीचा संकोच**

भारताच्या फाळणीनंतर राष्ट्रीय एकात्मता जपण्याचे आणि लोकशाही मजबूत करण्याचे काम करणारी हिंदी चित्रपटसृष्टी सध्या लोकशाहीचा संकोच करत आहे, अशी खंत चित्रपट अभ्यासक, पत्रकार अंबरीश मिश्र यांनी व्यक्त केली.

मायमराठी शब्दोत्सवानिमित्त अक्षरधारा, राजहंस प्रकाशन व मांडके हिअरिंग सर्व्हिसेस यांच्या वतीने 'सुंदर ती दुसरी दुनिया' या पुस्तकावर आधारित व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी सिनेनाट्य अभिनेते व संवादक राहुल सोलापूरकर उपस्थित होते.

मिश्र म्हणाले की, सध्याचे चित्रपट विशिष्ट वयोगटापुरतेच मर्यादित आहेत, सगळ्यांनी मिळून पाहावेत असे त्यांचे स्वरूप राहिले नाही. त्यामुळे लोकशाहीचा संकोच होत आहे. १९४० पासून ते १९७५ पर्यंत हिंदी चित्रपटसृष्टी लोकशाहीची प्रक्रिया बळकट करत होती. मात्र त्यानंतर चित्रपटांच्या दर्जात घसरण सुरू झाली. सध्याच्या चित्रपटातली निरागसता हरवली आहे. त्यामुळे चित्रपटातील सुख-दुःखे आपल्यापर्यंत पोहचतच नाहीत.

लक्ष्मण राठिवडेकर यांनी प्रास्ताविक केले. राहुल सोलापूरकर यांनी आभार मानले.

*** 'मुलांवरील ताण-तणाव' पुस्तकाचे प्रकाशन**

''सध्याची शिक्षणपद्धती, माध्यमे व विशेषतः टीव्ही, गुणावगुणांची पालकांकडून केली जाणारी तुलना या सर्वांचा परिणाम मुलांवरील ताण वाढण्यात होत असतो. पालकांनी मुलांशी अधिकाधिक संवाद साधणे दिवसेंदिवस आत्यंतिक गरजेचे होत चाललेले आहे,'' असे मत प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ. पी. व्ही. वैद्यनाथन यांनी व्यक्त केले.

अमेय प्रकाशनतर्फे प्रकाशित झालेल्या 'मुलांवरील ताणतणाव कमी कसा करावा?' या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन डॉ. वैद्यनाथन यांच्या हस्ते झाले. या वेळी अमेय प्रकाशनचे उल्हास लाटकर व अनुवादिका अश्विनी लाटकर उपस्थित होत्या.

हल्लीच्या धावपळीच्या जगात मुलांवरील वाढत चाललेला ताण आणि तो दूर करण्याबाबत पालक आदी घटकांची जबाबदारी याबाबत डॉ. वैद्यनाथन म्हणाले, मुलांच्या वाढीचे काही टप्पे असतात. आपण अलीकडे त्यांच्या वाढीची फार घाई करतो. हे टाळले पाहिजे. प्रत्येक मुलाची वेगळी असणारी ग्रहणक्षमता लक्षात घेऊन पालकांनी त्यांना त्यांच्या मातृभाषेतच शिकू द्यावे, असे अश्विनी लाटकर म्हणाल्या.

### * 'द इंडियन नेव्ही : ग्लोरिअस पास्ट-व्हायब्रन्ट फ्युचर'चे प्रकाशन

नौदलाने साठ वर्षे पूर्ण केल्याचे औचित्य साधत 'इ इंडियन नेव्ही : ग्लोरिअस पास्ट-व्हायब्रन्ट फ्युचर' या पुस्तकाचे नेव्ही हाऊस येथे राज्यपाल के. शंकरनारायण यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. या वेळी नौदलाच्या पश्चिम विभागाचे कमांडर इन चीफ फ्लॅग ऑफिसर व्हाइस ॲडमिरल संजीव भसीन म्हणाले की, स्वातंत्र्यपूर्व काळापासून आतापर्यंत नौदलाचा झालेला प्रवास आणि या कालावधीत नौदलाचा झालेला विकास, यावर हे पुस्तक प्रकाश टाकते. भारतीय नौदलाची सुरुवात कशी झाली आणि ईस्ट इंडिया कंपनीच्या युद्धात नौदलाने कशा प्रकारे निर्णायक भूमिका बजावली, याबाबत एका स्वतंत्र प्रकरणात दृष्टिक्षेप टाकण्यात आला आहे. त्याचप्रमाणे भविष्यकाळात नौदलासमोर कोणती आव्हाने आहेत आणि सक्षम यंत्रणा तयार व्हावी यासाठी युद्धनौका आणि तंत्रज्ञानाचा वापर नौदलातर्फे कशा प्रकारे करण्यात येत आहे, हेही या पुस्तकात नमूद करण्यात आले आहे.

लहान स्वरूपात सुरुवात होऊन आज एक महत्त्वपूर्ण यंत्रणा म्हणून प्रस्थापित झालेल्या भारतीय नौदलाच्या प्रवासाविषयी या पुस्तकात प्रकाश टाकण्यात आला आहे, असे 'लोकसत्ता' चे कार्यकारी संपादक गिरीश कुबेर म्हणाले.

### * 'गावोगावचं पाणी'चे प्रकाशन

लेखकाने लिहिलेले वर्णन वाचताना वाचकांच्या डोळ्यासमोर चित्रस्वरूप उभे राहणे, हे लेखकाचे यश असते. चित्रदर्शी शैलीत पुस्तके लिहिण्याचे प्रमाण खूपच कमी आहे. ही शैली रवींद्र जोशी यांच्या 'गावोगावचं पाणी' या पुस्तकात दिसते, असे मत चित्रकार रविमुकुल यांनी व्यक्त केले.

'गावोगावचं पाणी' या पुस्तकाचे प्रकाशन मंगला गोडबोले यांच्या हस्ते तर 'फक्कड गोष्टी' या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन द. मा. मिरासदार यांच्या हस्ते झाले. या वेळी द. भि. कुलकर्णी, अनुबंध प्रकाशनचे अनिल कुलकर्णी उपस्थित होते.

''सहज आणि सूक्ष्म विनोद त्यांच्या पुस्तकात दिसतो. लेखनातून जो दर्शन घडवितो तो खरा साहित्यिक,'' असे गोडबोले यांनी सांगितले.

'गावोगावचं पाणी' या पुस्तकात सर्व वाङ्मयाचा संगम दिसून येतो. कादंबरीला

एक कथाबंध असतो; पण जीवन आणि त्याचे वर्णन करणाऱ्या आत्मपर लेखनाला शेवट नसतो हे या पुस्तकात पूर्ण स्वरूपात दिसते आहे, असे डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी सांगितले.

*** ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांची मुलाखत**

''विश्वात २० अब्ज वर्षे इतके वयस्क तारे असावेत, असे अनुमान काढले आहे. सध्या या विषयावर अधिक संशोधन चालू आहे. तसेच, पृथ्वीच्या वातावरणात ४१ किलोमीटर उंचीवर सापडलेल्या सूक्ष्मजीवांचा अभ्यास चालू आहे...'' असे ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर म्हणाले.

नेचर वॉक या संस्थेतर्फे आयोजिलेल्या कार्यक्रमात डॉ. प्रकाश तुपे यांनी डॉ. नारळीकर यांची मुलाखत घेतली. डॉ. नारळीकर म्हणाले, ''जीवसृष्टी पृथ्वीवर उदयास आली की जीव बाहेरून आला, या विषयावर संशोधन करत आहोत. पृथ्वीवर सूक्ष्म जीवसृष्टीचा बाहेरून वर्षाव होत असावा, असा एक सिद्धांत आहे. त्याचा अभ्यास चालू असताना वातावरणात ४१ किलोमीटरवर १२ सूक्ष्मजीव आढळले. त्यापैकी ३ सूक्ष्मजीव सर्वस्वी नवे आहेत. अल्ट्राव्हायोलेटमध्येही हे जगतात असे आढळून आले आहे. या विषयावर अधिक संशोधन चालू आहे.''

ते म्हणाले, ''विश्वात किती वयस्क तारे आहेत, यावरही संशोधन चालू आहे. विश्वाचे वय आतापर्यंत १३.७ अब्ज वर्षे मानले गेले आहे. त्यामुळे आमचा सिद्धांत अनेकांना मान्य होणे अवघड आहे. पण, यावर अधिक सखोल संशोधन चालू आहे. रोगाला कारणीभूत असलेले काही विषाणूही बाहेरून येत असण्याची शक्यता आहे. प्लेग, एड्स किंवा इतर रोगांचे विषाणू बाहेरून आले असावे, असा अंदाज आहे. हे विषाणू धुमकेतूबरोबर येत असावेत.''

*** 'श्रीकृष्णदयार्णवामृत' ग्रंथाचे प्रकाशन**

''साहित्याने समाजाभिमुख झाले पाहिजे, अशी अपेक्षा राजकारणी व्यक्त करतात. खरे तर समाजाने साहित्याभिमुख झाले पाहिजे,'' असे मत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी व्यक्त केले. समाजाचे प्रश्न सोडविण्याचे सामर्थ्य साहित्यामध्ये असते, असेही ते म्हणाले.

'इंद्रायणी साहित्य'तर्फे जुन्या पिढीतील प्रकाशक दयार्णव कोपर्डेकर जन्मशताब्दीनिमित्त संतकवी कृष्णदयार्णव यांचा समीक्षात्मक अभ्यास करणाऱ्या लेखांचा समावेश असलेल्या 'श्रीकृष्णदयार्णवामृत' या ग्रंथाचे प्रकाशन डॉ. कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. या ग्रंथाचे संपादक डॉ. हेमचंद्र कोपर्डेकर आणि प्रकाशक श्याम कोपर्डेकर या वेळी उपस्थित होते.

डॉ. कुलकर्णी म्हणाले, ''केवळ भावनेतून वाङ्मयनिर्मिती होणार नाही. त्यामध्ये वैचारिकता, चिंतनशीलता आणि ज्ञानात्मकता असावी लागते. समाज वेगळ्या पद्धतीने धीर शोधत असतो. संतसाहित्यामध्ये केवळ भक्ती नाही आणि या साहित्याने समाजाला दुबळे केले नाही. उलट हा क्रांतीचा आणि विद्रोहाचा मार्ग होता. भक्तीला नीतीची जोड दिल्यामुळे समाजाची प्रगती झाली. प्रतिभावंत साहित्यिकांना जागवत ठेवणे महत्त्वाचे असते. त्यांच्या साहित्याचे पुनर्मूल्यांकन होणे आणि ग्रंथाने नव्या पिढीच्या संवेदनांशी संवाद साधणे या माध्यमातून समाजाची वाङ्मयीन अभिरुची संपन्न होईल.''

डॉ. हेमचंद्र कोपर्डेकर यांनी प्रास्ताविक केले. प्रल्हाद अवचट यांनी आभार मानले, गौरी कोपर्डेकर यांनी सूत्रसंचालन केले.

### * मराठी प्रकाशकांची परंपरा

प्रत्येक वाचकाला चांगले वाटते तेच दिले जावे ही मराठी प्रकाशकांची परंपरा आहे. मराठी भाषेच्या बाहेर इतर भाषांमध्ये काय चालले आहे. याकडे लक्ष देऊन ते साहित्य अनुवादाच्या माध्यमातून प्रकाशित होणे आवश्यक आहे. त्यासाठी अधिक व्यापक दृष्टीने संस्कृतीकडे पहायला शिकले पाहिजे, असे मत ज्येष्ठ प्रकाशक रामदास भटकळ यांनी व्यक्त केले.

ग्रंथ प्रकाशक व ग्रंथ प्रसारक दयार्णव कोपर्डेकर यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने इंद्रायणी साहित्यच्या वतीने आयोजित मराठी ग्रंथ प्रकाशन व विक्री विषयावरील चर्चासत्राच्या अध्यक्षपदावरून ते बोलत होते.

'आत्मनिवेदन दयार्णवांचे' या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे व 'आदरांजली' या संकलन पुस्तिकेचे प्रकाशनही भटकळ यांच्या हस्ते यावेळी करण्यात आले.


शरद गोगटे म्हणाले की, डीटीपी तंत्रज्ञानामुळे प्रकाशन व्यवसायात बदल झाला आहे. नुकतेच प्रसिद्ध झालेले ई-बुक्स डोळ्यांना सुख देणारे असून त्यामधून वाचकांना आपण प्रत्यक्ष पुस्तक वाचत असल्याचे जाणवते.

सुधाकर जोशी म्हणाले, रस्त्यावर पुस्तके विकून मी व्यवसायाचा प्रारंभ केला.

ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या लेखिका महाश्वेतादेवी यांच्या प्रभावी लेखनशैलीतले... 'महाभारत' समजावून घेताना त्याकडे नव्या दृष्टिकोनाने पहायला लावणारे...

अनु. वर्षा काळे **कुरुक्षेत्रानंतर...**

**६०रु. पोस्टेज २०रु.**



परंतु आज पुस्तक विक्रीमध्ये चढाओढ चालली आहे. विविध प्रकाशक सवलतरूपी मध वाचकांना दाखवत आहे. तरीही वाचक मधाजवळ यायला तयार नाही. मनोहर जोशी यांनी आपण समाजाचे पालक आहोत अशी भूमिका प्रकाशकांनी ठेवणे आवश्यक आहे. युवकांसमोर चांगले साहित्य ठेवले, त्यांना संस्कारक्षम वाचन दिले तर नक्कीच त्याचे स्वागत होते असे मत व्यक्त केले.

*** 'पुणेरी पाणी'चे प्रकाशन**

पुण्यात आडवळणी व्यक्तींच्या अनेकदा फिरक्या घेतल्या जातात. आजवर अनेक साहित्यिक लेखक, कलावंत यांचा पुणेकर हे खास संशोधनाचा आणि कुतूहलाचा विषय आहे, असे मत प्रसिद्ध व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर यांनी व्यक्त केले.

प्रसिद्ध भावगीत गायक अरुण दाते यांच्या हस्ते पुणेरी पाणी या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या प्रसंगी पुण्यातील पंचवीस मान्यवरांचा सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

दूरदर्शवरील वृत्तनिवेदिका स्वाती पाटणकर यांनी त्यांना आलेल्या साध्या सरळ अनुभवांचे कथन ललित रूपात मांडण्याचा प्रयत्न केला आहे, असे तेंडुलकर यांनी सांगितले.

या सोहळ्यास मुंबई दूरदर्शन वृत्तविभागाच्या संचालिका मोनीदीपा मुखर्जी व विश्राम वैद्य, सुहास धारणे, दीपाली केळकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे निवेदन नंदा सुर्वे व आभार प्रदर्शन स्नेहवर्धन प्रकाशनच्या स्नेहल तावरे यांनी केले.

*** अनुवाद करा आणि कमवा**

हिंदी आणि मराठी भाषेतील महत्त्वपूर्ण वाङ्मयाची देवाणघेवाण करून वाचकांना अधिकाधिक साहित्य उपलब्ध करून द्यावे, यासाठी महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेने 'अनुवाद' हा नवीन अभ्यासक्रम सुरू केला आहे.

अलीकडे विविध भाषांतील साहित्याचा अनुवाद करण्याचा ट्रेंड वाढत असताना भाषेचे सखोल ज्ञान असलेले अनुवादक मात्र मिळत नाहीत. त्यामुळे तरुणांना अनुवाद ही नवीन संधी उपलब्ध करून देण्याचा सभेचा उद्देश आहे

हिंदी भाषेचा प्रसार करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेतर्फे वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येतात. बदलत्या काळानुसार हिंदी भाषा प्रसारासाठी संस्थेने हाती घेतला. अनुवाद अभ्यासक्रम हा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे.

गेल्या काही वर्षात मराठी वाचकांमध्ये अनुवादित साहित्याविषयी कुतूहल निर्माण झाले आहे. मराठीतील साहित्य हिंदीच्या वाचकांपर्यंत पोहोचते आहे. त्यामुळे बाजारपेठेत अनुवादकांना खूप मागणी आहे. कारण बोलीभाषा आणि पुस्तकाचे

भाषांतर यात खूप फरक पडतो. साहित्याचे भाषांतर करताना त्यातील गाभ्याला धक्का न लावता अनुवादकाने लेखकाचे विचार वाचकांपर्यंत पोचवणे आवश्यक आहे.

भाषांतराची शैली अवगत व्हावी यासाठी विद्यार्थ्यांकडून लेखन, वाचन, प्रबंध अशी तयारी करून घेण्यात येते. सहा महिने आणि एक वर्ष मुदतीचे दोन अभ्यासक्रम तयार केले आहेत, असे सभेचे शिक्षण प्रमुख गो. म. दाभोलकर म्हणाले.

### * ऑक्सफर्ड म्हणजे पश्चिमेकडील पुणे

''माहितीतंत्रज्ञानाचे शहर अशी ओळख आणि परदेशी विद्यार्थ्यांकडून शहराला मिळणारी पसंती यामुळे ऑक्सफर्डलाच पश्चिमेकडील पुणे असे म्हणण्याची वेळ आली आहे.'' असे मत वास्तुविशारद ख्रिस्तोफर चार्ल्स बेनिंजर यांनी व्यक्त केले.

परदेशातील ७५ हजारांपेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षणासाठी पुण्यात येतात. मात्र, इथल्या बहुतांश लोकांना रोजगार नाही. त्यामुळे नवा विकास आराखडा तयार करण्याची गरज आहे असेही ते म्हणाले.

'वर्ल्ड सोसायटी ऑफ एकीस्टीक्स'तर्फे शहराचा वेगाने होणारा विकास, इतिहास व सामाजिक परिस्थिती या बाबींवर पुणे विद्यापीठात भाष्य करताना बेनिंजर म्हणाले, ''ब्रिटिशांच्या साम्राज्यात पुणे हे लंडननंतरचे सर्वांत मोठे शहर होते. इतिहासकाळात पुण्याच्या उत्तरेला पोर्तुगीजांचे, पूर्वेला हैद्राबादच्या निजामाचे, तर सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये शिवाजी महाराजांचे वास्तव्य होते. राज्यकर्त्यांनी बांधलेल्या किल्ल्यांमुळेच पेशवाई आणि मराठेशाही टिकली. मुंबईला रेल्वेने जोडले गेलेले पुणे हे पहिले महानगर आहे. जगप्रसिद्ध बॅडमिंटन या खेळाचा शोध १८३० मध्ये येथेच लागला. पण, सतराव्या व अठराव्या शतकातील देशाची एकमेव राजधानी पुणे हीच होती. १९४७ मध्ये पुण्यातील महाविद्यालयांमुळे पुण्यास पूर्वेकडील ऑक्सफर्ड म्हणून संबोधले जात असे. १९६०च्या सुरुवातीला महाराष्ट्र सरकारच्या धोरणामुळे येथे औद्योगीकरणाला सुरुवात झाली. अल्पावधीत प्रसिद्ध झालेल्या नॅनोचे डिझाईनही पुण्यातच तयार झाले आहे.''

### * माहिती अधिकाराबाबत प्रमाणपत्र अभ्यासक्रम

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) मार्फत 'माहिती अधिकार अधिनियम २००५' या कायद्याचे प्रशिक्षण देणारा दूरशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. जम्मू-काश्मीर वगळता देशभरात हा केंद्रीय कायदा २००५ मध्ये लागू करण्यात आला. ज्यांना संस्थेमध्ये जाऊन प्रशिक्षण घेणे शक्य नाही, अशांसाठी दूरशिक्षणाच्या माध्यमातून हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात आला

आहे. मराठी व इंग्रजी अशा दोन्ही माध्यमांमध्ये उपलब्ध असलेल्या या अभ्यासक्रमाचा कालावधी तीन महिन्यांचा आहे. यासाठी अर्ज व अभ्यासक्रमाचा तपशील www.yashada.org या संकेत स्थळावर education मध्ये पहावा. अधिक माहितीसाठी ०२०-२५६०८१३०, २५६०८२१६ क्रमांकावर संपर्क साधावा.

### * 'ब्रह्मसाधना'चे प्रकाशन

ब्रह्मसाधनेचे आव्हान पेलण्यासाठी स्वत:च्या मनावर ताबा मिळविणे आवश्यक आहे. त्यामुळे सगुण ब्रह्माची अनुभूती सुकर होते. सगुण ब्रह्माच्या अनुभूतीनंतर निर्गुण ब्रह्माची अनुभूती होऊ शकते, असे मत डॉ. शंकर अभ्यंकर यांनी व्यक्त केले.

योगाचार्य श्रीकृष्ण व्यवहारे आणि वेद-उपनिषदांचे अभ्यासक डॉ. श्रीराम भातखंडे या लेखकद्वयींच्या 'ब्रह्मसाधना - सूक्ष्मयोग, प्रबोधन व प्रात्यक्षिके' या पुस्तकाचे प्रकाशन अभ्यंकर यांच्या हस्ते करण्यात आले. ठाण्याच्या घंटाळी मित्र अध्यक्ष मंडळाचे सुरेश दिघे, कार्याध्यक्ष व प्रकाशन विभागाचे प्रमुख श्री. आठले या वेळी उपस्थित होते. अभ्यंकर म्हणाले, ''ब्रह्मसिद्धीविषयी कोणतीच शंका मनात न ठेवता त्यासाठी केलेली आध्यात्मिक साधना आपल्याला आत्मज्ञान मिळवून देते. अध्यात्माचे ज्ञान केवळ अनुभूतीद्वारेच मिळते.''

श्रीकृष्ण म्हसकर यांनी सूत्रसंचालन केले.

### * 'सोशल नेटवर्किंग'मुळे घटस्फोटाचे प्रमाण वाढले

सोशल नेटवर्किंगमुळे मित्र जोडण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. जगभरातील लाखो लोक सोशल नेटवर्किंगच्या माध्यमातून एकमेकांच्या 'व्हर्च्युअल' सान्निध्यात असतात. मात्र, 'जेवढे फायदे तेवढेच तोटे' हे सूत्र सोशल नेटवर्किंगच्या बाबतीतही खरे आहे. अमेरिकेमध्ये करण्यात आलेल्या एका सर्वेक्षणात दर पाच घटस्फोटांमधील एक घटस्फोट हा सोशल नेटवर्किंगमुळे होत असल्याचे दिसून आले आहे.

'अमेरिकन ॲकॅडमी ऑफ मेट्रोमोनियल लॉयर्स'ने सर्वेक्षण केले. ८० टक्के वकिलांनी घटस्फोटांमागे सोशल नेटवर्किंग हे कारण असल्याचे सांगितले.

'डेल मेल'ने प्रकाशित केलेल्या माहितीनुसार, सोशल नेटवर्किंगमुळे घटस्फोटांच्या संख्येमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. फेसबुकवर अनेक जोडप्यांमध्ये शेरेबाजी, मतभेद होत आहेत. शेवटी हे भांडण घटस्फोटापर्यंत जाते असे दिसून येत आहे.

सोशल नेटवर्किंगच्या अतिवापरामुळे किंवा त्याच्या गैरवापरामुळे घटस्फोट झालेल्यांपैकी ६६ टक्के घटस्फोट हे फेसबुकच्या वापरामुळे, १५ टक्के मायस्पेसमुळे, ट्विटरमुळे ५ टक्के आणि १४ टक्के घटस्फोट इतर सोशल नेटवर्किंगच्या साईटमुळे झाल्याचे दिसून आले आहे.

''आपल्या खासगी आयुष्याबद्दल किंवा लैंगिकतेबद्दल चॅटिंग करणे हे

घटस्फोटासाठी अर्ज करण्याचे प्रमुख कारण असल्याचे आढळून आले आहे,'' असे डायव्होर्स ऑनलाईनचे व्यवस्थापकीय संचालक मार्क किनम यांनी सांगितले.

फेसबुकवर मैत्रिणींशी भरपूर वेळ चॅटिंग करत असल्याने प्रसिद्ध अमेरिकी अभिनेत्री इव्हा लोंगोरिया हिने पती व प्रसिद्ध बॉस्केटबॉलपटू टोनी पार्कर याच्यापासून घटस्फोट घेतला आहे.

*** ज्ञानेश्वरी साधना केंद्र**

विज्ञानाला अध्यात्माची जोड मिळावी तसेच विद्यार्थ्यांच्या मनात संस्काराची बीजे रुजावीत, हा मुख्य उद्देश उंबरे (ता. भोर) येथे ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी आध्यात्मिक साधना केंद्राची उभारणी करण्यात येत आहे. श्री संत सेवा संघातर्फे हा भव्य प्रकल्प राबविण्यात येत असून, यासाठी एकूण साडेसात कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. आतापर्यंत चाळीस टक्के काम पूर्ण झाले आहे. विशेष म्हणजे संस्थेच्या तीन हजार उच्चशिक्षित जीवनव्रती कार्यकर्त्यांच्या श्रमदानातून हे काम पूर्णत्वास जात आहे.

या प्रकल्पात ग्रंथराज ज्ञानेश्वरी, संत ज्ञानेश्वर महाराज व तुकाराम महाराज यांची मंदिरे असतील. सुमारे पाचशे विद्यार्थी एकाच वेळी अध्ययन करू शकतील असा सभामंडप, विद्यार्थ्यांचा निवासकक्ष, ध्यानमंडप, ग्रंथालय अभ्यासिका, विस्तृत भोजनकक्ष, गोशाळा, पवनचक्की, ज्ञानग्रहण करण्यास पोषक वातावरण असलेली उद्याने आदी सुविधा या ठिकाणी असतील. ज्ञानेश्वरीतील ओव्या व तुकाराम महाराजांच्या अभंगावर आधारित चित्रकार आत्मजा यांनी काढलेल्या आत्मज्ञान चित्रमालिकेसाठी एका हॉलची निर्मिती करण्यात आली आहे. पुणे-सातारा महामार्गापासून अवघ्या दोन किलोमीटरवर कामथडी-उंबरे या मुख्य रस्त्यालगत २००४ पासून टप्प्याटप्प्याने हा प्रकल्प कार्यान्वित होत आहे. अध्यात्माला पोषक वातावरणाची निर्मिती येथे करण्यात आली आहे.

समितीचे सचिव विजय संजय खुटवड यांनी या प्रकल्पासाठी दोन एकर जमीन दान केली आहे.

हा प्रकल्प पूर्ण होण्यासाठी संस्थेच्या संस्थापक विश्वस्त ज्ञानेश्वरी गोडबोले,


जग जवळ आलं म्हणता म्हणता माणूस माणसापासून दूर जातो आहे. या बदलाला विशेषत्वे सामोरे जाणाऱ्या, कुटुंबव्यवस्था ढवळून गेलेल्या नव्या पिढीचे चित्रण करणारी कादंबरी

रेखा बैजल

प्रस्थान

१५०रु. पोस्टेज २०रु.

कार्याध्यक्ष तुषार साकोरे, विश्वस्त चेतन भोसले, नाशिक विभागप्रमुख गीताताई केळकर, सचिव डॉ. योगेश खरे, तसेच साधना केंद्र समितीचे अध्यक्ष हृषिकेश बडवे, उपाध्यक्ष देवयानी दीक्षित आदींचे योगदान आहे. संपर्क : पूर्णिमा ९९२२९१५८०८, विजय ९८८१८९३८५९

*** सातवे मराठा साहित्य संमेलन**

जगद्गुरू तुकोबा साहित्य परिषदेच्या वतीने सांगली येथे सातवे अखिल भारतीय मराठा साहित्य संमेलन संपन्न झाले. संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. प्रतिमा इंगोले, मराठा सेवा संघाचे संस्थापक पुरुषोत्तम खेडेकर, माजी खासदार ब्रिगेडियर सुधीर सावंत माजी मंत्री शिवाजीराव नाईक, अजितराव घोरपडे, ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. पी. बी. पाटील, स्वागताध्यक्ष श्यामराव पाटील उपस्थित होते. या संमेलनात आठ ठराव मांडण्यात आले.

पुण्यातील लाल महालातील दादोजी कोंडदेव यांचा पुतळा हटवावा, भारतीय राज्यघटनेच्या निर्देशानुसार मराठा समाज हा आरक्षण जाहीर करून त्याची अंमलबजावणी करावी, कर्नाटक व अन्य राज्यांशी असलेला सीमावाद सोडवून मराठी भाषिकांचा महाराष्ट्रात समावेश करावा. साहित्यिकांचा सन्मान करताना समाज पायाभूत धरून सर्व समाजाला प्रतिनिधीत्व देण्यात यावे, वा. सी. बेंद्रे व त्यांच्या सहकाऱ्यांनी ४० वर्षे संशोधन करून तयार केलेला पाच खंडातील इतिहास प्रकाशित करावा, शासकीय आज्ञापत्रके मराठी भाषेतून प्रकाशित करावी. राज्यघटनेतील जाती-धर्मनिरपेक्षता, समाजवाद या मूळ उद्दिष्टांना छेद देणाऱ्या सर्व गोष्टींचे निर्मूलन करण्यासाठी योग्य ती पावले उचलावीत, असे ठराव मंजूर करण्यात आले.

संमेलन अध्यक्षा डॉ. प्रतिमा इंगोले यांनी म्हटले. स्वामित्वाची कल्पना आल्यावर माणसात भ्रष्टाचार बोकाळला आहे. त्याचे भ्रष्टाचारात परिवर्तन झाले आहे. त्यामुळे निसर्गाधिष्ठित समाजनिर्मितीला चालना देणाऱ्या साहित्याची निर्मिती झाली पाहिजे. समाजाची त्यातून उन्नती व्हावी.

*** सर्वोदय विचार कालातीत**

सर्वोदय विचार कालातीत आहे. त्यात युवा शक्तीला सामावून घेणारे कार्यक्रम कालानुरूप तयार करून ते राबविले गेले तर देशात गांधी विचाराचे ग्रामस्वराज्य निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही, असे मत राज्य नियोजन आयोगाचे माजी उपाध्यक्ष डॉ. रत्नाकर महाजन यांनी धुळे येथील कमलाबाई कन्या विद्यालयात आयोजित प्रदेश सर्वोदय संमेलनाच्या समारोप प्रसंगी व्यक्त केले. स्वातंत्र्योत्तर काळात नियोजनासाठी शासनाने अवलंबलेली पद्धतच चुकीची होती. कारण त्यात दिलेली आकडेवारी ही फसवी आणि वेगवेगळ्या शासकीय योजनांवर झालेल्या

खर्चाच्या निकषावर आधारित होती. म्हणजे स्वातंत्र्यानंतर विकास झालाच नाही, असे नाही. तर विकास झाला पण तो कासव गतीने झाला. नियोजन करतानाच विकासाचे मूळ शोधण्यात आपण कमी पडलो. विकासाचे मूळ हे गांधी विचारात आहे. गावातील तळागाळातील व्यक्तीचा विकास, प्रत्येक व्यक्तीचा सर्वांगीण विकास, ग्रामस्वराज्य ही संकल्पना राबविल्यास गाव बदलेल आणि तसे झाले तर देश बदलल्याशिवाय राहणार नाही, असे डॉ. महाजन म्हणाले.

*** नाण्यांचे संग्रहालय**

छांदिष्टांकडूनच नवनिर्मिती घडू शकते. विविध प्रकारचे छंद हा प्रत्येकाच्याच जिव्हाळ्याचा विषय असतो. म्हणूनच छंदातून परंपराजतनाचे मोलाचे कार्य करणाऱ्या नरेंद्र टोळे यांनी अनोख्या नाणे संग्रहालयाद्वारे पुण्याचे नाव कीर्तिमान केले असे प्रतिपादन शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी केले.

पंचवीस हजार दुर्मिळ नाण्यांचा संग्रह असलेल्या 'यशलक्ष्मी न्यूमिस्मॅटिक' संग्रहालयाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले.

नरेंद्र टोळे यांनी गेल्या अनेक वर्षांत जमविलेली देश-विदेशातील दुर्मिळ नाणी व नोटा या संग्रहात आहेत. ''गेल्या चाळीस वर्षांच्या परिश्रमांतून निर्माण झालेली ही मयसभा आभासी नसून तिच्यात टोळे यांचे श्रम प्रत्येक ठिकाणी दृग्गोचर होतात. युवा पिढीने आवर्जून या संग्रहालयाचा लाभ घ्यावा. लहान मुलांचे इतिहासप्रेम अशा उपक्रमांतून वाढीला लागेल.'' असे ते म्हणले.

विकास मठकरी म्हणाले, ''हौसेला मोल नसते. काळाच्या कसोटीवर अशी कार्ये अमूल्य ठरतात. म्हणूनच हे नाणेसंग्रहालय आपल्या उपनगरात असणे भूषणास्पद आहे.'' नगरसेवक शिवराम मेंगडे म्हणाले, या संग्रहालयामुळे कर्वेनगरला एक वेगळीच ओळख मिळाली आहे.

*** ई-बुक्स आणि छापील पुस्तके**

पुस्तके वाचणे हा छंद असलेल्या भारतीयांना ई-बुक्स संस्कृती पचनी पडायला वेळ लागेल, असे मत ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ व प्रसिद्ध लेखक डॉ. अच्युत गोडबोले यांनी व्यक्त केले.

अक्षरधारा आयोजित ३८० वा माय मराठी शब्दोत्सवांतर्गत 'ई-बुक्स आणि वाचनसंस्कृती' या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. यात डॉ. गोडबोले यांच्यासह डॉ. दीपक शिकारपूर, धनंजय दातार सहभागी झाले होते. डॉ. गोडबोले म्हणाले, ''ई-बुक्स'च्या व्यवसायात मोठी वाढ होत असली तरी पुस्तकांच्या एकूण व्यवसायात 'ई-बुक'चा वाटा आजतरी तीन टक्केच आहे. प्रौढ वाचकापैकी फक्त सात टक्के वाचकच ई-बुक वाचतात.''

डॉ. शिकारपूर म्हणाले, ''छापील पुस्तके आणि ई-बुक हे एकमेकांचे स्पर्धक नाहीत. ई-बुकमध्ये आवश्यक ते बदल लगेच करता येतात. मात्र, छापील पुस्तकात बदल करायला बराच काळ लागतो.''

दातार म्हणाले, ''अलीकडे नवी पिढी ही ई-बुकच्या संस्कृतीत वाढलेली असल्याने ही पिढीच भविष्यात ई-बुकची वाचक असेल. ई-रीडरमध्ये एकावेळी हजारो पुस्तके साठविण्याची क्षमता असते. वाचकांच्या दृष्टीने ती अधिक सोयीची आहेत.'' रसिका राठिवडेकर यांनी प्रास्ताविक केले. लक्ष्मण राठिवडेकर यांनी आभार मानले.

*** एसएमएस कादंबरी...**

मोबाईलवर कादंबरी... ही कल्पना आता प्रत्यक्षात उतरलीय.

सध्याच्या धकाधकीच्या जीवनात वाचन ही संकल्पना नवे रूप धारण करीत आहे. एसएमएस कादंबरी हा प्रकार अस्तित्वात येत आहे. विख्यात लेखिका पिंकी इराणी यांनी केईएममधील कर्मचारी अरुणा शानबाग यांची दुर्दैवी जीवनगाथा एसएमएस कादंबरीच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचण्याचा निर्णय घेतला आहे. ९० एसएमएसची ही कादंबरी वाचता येईल अथवा ऑडिओ फाईलमध्ये कन्व्हर्जन करून ऐकता येईल. वाचनवृद्धीसाठी तंत्रज्ञानाचे हे नवीन 'कलम' लोकप्रिय ठरेल असे वाटते.

*** शिक्षण आणि संस्कृतीमुळे देश महासत्ता होईल**

भारतीय शिक्षण पद्धती आणि संस्कृतीच्या जोरावर भारत महासत्ता होण्याच्या मार्गावर आहे. संस्कृत येत असेल तर कोणतीही भाषा शिकणे कठीण नाही. असे विषय शाळेतून शिकविले जावेत, असे मत ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांनी १६ नोव्हेंबर रोजी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ महामंडळ, अखिल महाराष्ट्र माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त मंडळ यांच्यातर्फे आयोजित ५०व्या मुख्याध्यापक अधिवेशनाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले.

'एमआयटी'चे अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड, शिक्षण संचालक (माध्यमिक) दिगंबर देशमुख, शिक्षण संचालक (प्राथमिक) एम. आर. कदम, राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाचे अध्यक्ष सर्जेराव जाधव, शिक्षक आमदार विक्रम काळे, अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष शिवाजीराव किलकिले. अध्यक्ष सुभाष माने, सचिव अरुण थोरात, मुख्याध्यापक संघ महामंडळाचे अध्यक्ष वसंत पाटील, सचिव दीपक दोंदल, संस्थापक अध्यक्ष रावसाहेब आवारे, संस्थापक सचिव प्रकाश

देगावकर उपस्थित होते.

डॉ. भटकर म्हणाले, ''आपली पारंपरिक शिक्षण व्यवस्थाच आपल्या संपन्नतेचे कारण होती, हे लक्षात येते. ब्रिटिशांनी ती पद्धत बदलून त्यांची शिक्षण पद्धती आपल्यावर लादली.''

श्री. निनाईदेवी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक अमृत पांढरे हे अधिवेशनाचे अध्यक्ष होते.

### * 'परिवर्तनाची जनगर्जना' पुस्तकाचे प्रकाशन

''सध्याचे युग हे 'स्पेशलायझेशन'चे युग असल्यामुळे एका विशिष्ट विषयाच्या कोशात व्यक्ती अडकत आहेत. त्यामुळे व्यापक दृष्टिकोन कमी होत आहे. समाजव्यवस्था ही अखंड बघावी लागते. सामाजिक प्रश्न वेगवेगळ्या विषयांच्या टप्प्यामध्ये घालणे योग्य नाही,'' असे मत ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य यांनी व्यक्त केले.

राष्ट्रीय आरोग्य सेनेचे प्रमुख डॉ. अभिजित वैद्य यांनी लिहिलेल्या 'परिवर्तनाची जनगर्जना' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्याला आमदार उल्हास पवार, सुगावा प्रकाशनचे संपादक विलास वाघ आदी उपस्थित होते. 'परिवर्तनाची जनगर्जना' या पुस्तकामध्ये ३६ लेखांचा समावेश आहे. भाई वैद्य म्हणाले, ''कोणत्याही एका विषयाचे बंधन न ठेवता या पुस्तकातून समाजातील सर्व प्रश्न ज्वलंतपणे मांडण्यात आले आहेत. आरोग्य सेनेने घेतलेली व्यापक भूमिका समजावून घेतली पाहिजे. सार्वजनिक माध्यमांमध्ये एक प्रकारची अफाट ऊर्जा असते, ती या पुस्तकातून अनुभवायला मिळते.''

डॉ. अभिजित वैद्य म्हणाले, ''सुरुवातीला वेब साप्ताहिकाच्या माध्यमातून आरोग्य सेनेचे विचार मी मांडत होतो. परंतु, लोकांपर्यंत पोचण्यासाठी छापील स्वरूपात विचार हवेत असे वाटले आणि त्या विचारातून या पुस्तकाची निर्मिती झाली. याच्या माध्यमातून मूलतत्त्ववाद, जातीयवाद, राजकारण्यांची गुंडगिरी, भ्रष्टाचार यांसारख्या सर्व प्रश्नांवर हल्ला केला आहे.''

ऑस्ट्रेलियातून तुरुंग फोडून फरार झालेला, मुंबईच्या कुशीत आश्रयाला आलेला एक कलंदर... इथल्या माणसांनी पायदळी तुडवलेल्या आणि इथल्याच माणसांच्या प्रेमाने उभ्या राहिलेल्या ऑस्ट्रेलियन 'शांताराम'ची सुन्न करणारी सत्य कहाणी...

ग्रेगरी डेव्हिड रॉबर्ट्स
अनु. अपर्णा वेलणकर

शांताराम

१९०रु. पोस्टेज ४०रु.

*** 'रागदर्शन - भाग १' पुस्तकाचे प्रकाशन**

''पं. माणिकबुवा ठाकूरदास यांच्याकडे बंदिशींचा प्रचंड खजिना आहे. त्यांची लक्षणगीते ही तर बंदिशींसारखीच आहेत. त्या वेळी 'मार्केटिंग'चा जमाना नव्हता. त्यामुळे त्या झाकल्या 'माणका'कडे कुणाचे लक्ष गेले नाही,'' अशी खंत ज्येष्ठ गायक पं. यशवंतबुवा जोशी यांनी व्यक्त केली.

पं. माणिकबुवा ठाकूरदास जन्मशताब्दी समितीतर्फे पं. ठाकूरदास लिखित 'रागदर्शन भाग-१' या पुस्तकाचे प्रकाशन पं. जोशी यांच्या हस्ते, तर 'स्वरयात्री' या पुस्तिकेचे प्रकाशन ज्येष्ठ सराफी व्यावसायिक दाजीकाका गाडगीळ यांच्या हस्ते झाले.

या वेळी गाडगीळ, श्रीखंडे, पं. माणिकबुवांचे शिष्य विवेक खाडिलकर यांनी मनोगत व्यक्त केले. मंगला खाडिलकर यांनी सूत्रसंचालन केले. अवतार चाँद आणि अलका देव-मारुलकर यांचे गायन झाले.

*** 'मन धुंद पायवाट' सीडीचे प्रकाशन**

''काळाच्या गरजेनुसार बदलणारे संगीत हे परिवर्तनशील असते. काल जसे गाणे ऐकले तसेच आज ऐकायला मिळण्याची शक्यता कमी असते. म्हणूनच जुनी आणि नवी गाणी अशी तुलना न करता संगीतकाराने श्रोत्यांच्या हृदयाचा ठाव घेण्यासाठी नवनवीन प्रयोगांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे,'' असे मत प्रसिद्ध गायिका आरती अंकलीकर-टिकेकर यांनी व्यक्त केले. अर्थ म्युझिक प्रस्तुत आणि सुयश निर्मित 'मन धुंद पायवाट' या सीडीचे प्रकाशन आरती अंकलीकर-टिकेकर यांच्या हस्ते झाले. या सीडीचे संगीतकार स्वप्नील दिगडे, निर्माता सुयश पाटील, ध्वनिमुद्रक सत्यजित केळकर व कवी संतोष बडगुजर उपस्थित होते.

*** विद्यापीठांमध्ये मराठीचा वापर करण्याचा कुलगुरूंना आदेश**

राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कामकाजात मराठीचा वापर करण्यात यावा, असा आदेश उच्च व तंत्रशिक्षण विभागाने सर्व कुलगुरूंना दिला आहे. विद्यापीठांमध्ये मराठीचा वापर फारसा केला जात नाही व अनेकदा इंग्रजीतून कामकाज केले जाते. याबाबत विधान परिषदेत मुद्दा उपस्थित करण्यात आल्यावर विद्यापीठातील कामकाजात मराठीचा वापर करण्यात येईल, असे आश्वासन सरकारच्या वतीने देण्यात आले होते. त्यानुसार विद्यापीठांमधील कामकाज शक्यतो मराठीतूनच करावे, असा निर्देश देण्यात आला आहे. जे अधिकारी व कर्मचारी सयुक्तिक कारण नसताना मराठी वापर करण्यास टाळाटाळ करतील त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी विद्यापीठ नियमांमध्ये बदल करावा असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## * ख्रिस्तपुराण ग्रंथ म्हणजे भारतीय संस्कृतीला प्रतिसाद

ख्रिस्तपुराण हा ग्रंथ म्हणजे भारतीय समाजातील संस्कृती, सहिष्णुता व समंजस परंपरेला मिळालेला प्रतिसाद आहे, असे मत ज्येष्ठ समीक्षक डॉ. रा. ग. जाधव यांनी व्यक्त केले.

पुणे विद्यापीठातील मराठी विभागातर्फे आयोजित 'ख्रिस्तपुराण : एक पुनरवलोकन' या विषयावरील दोन दिवसांच्या चर्चासत्राचे उद्‌घाटन डॉ. थॉमस डाबरे यांच्या हस्ते झाले. फादर नेल्सन फलकाव यांचे बीजभाषण झाले.

डॉ. जाधव म्हणाले, ''मराठी समाज, भाषा व मराठी यांना समोर ठेवून ख्रिस्तपुराण लिहिण्यात आले. वास्तविक मराठी भाषेचा हा मोठा सन्मान आहे. स्टिफन्स यांनी केलेल्या मराठी भाषेच्या वर्णनापेक्षाही हा मोठा गौरव आहे. ख्रिस्ती धर्मदर्शन आणि येशूचे जीवन यांची वैशिष्ट्यपूर्ण ओळख ख्रिस्तपुराणात आहे.''

डॉ. डाबरे म्हणाले, ''मूलतत्त्ववाद व धार्मिक दहशतवाद यामुळे धर्मा-धर्मातील संबंधात अनिश्चितता निर्माण झाली आहे. ही चिंतेची बाब आहे. जागतिकीकरणात युरोपीय व भारतीय संस्कृती यांचा मेळ साधण्याचे मोठे आव्हान आहे. या सर्वच आव्हानांना तोंड देण्यासाठी ख्रिस्तपुराण हा ग्रंथ प्रेरणादायी आहे.''

फादर फलकाव म्हणाले, ''फादर स्टिफन्स अभिजात विचारवंत होते. त्यामुळे ख्रिस्तपुराण लिहिताना संस्कृतीचा समन्वय करून व्यापक समतोल साधला आहे. आजच्या काळात कित्येक देशांचे व संस्कृतीचे सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ बदलत आहेत. परिणामी, पूर्वीच्या चांगल्या गमावलेल्या गोष्टी पुन्हा मिळविण्यासाठी सर्वजण धावताना दिसत आहेत.''

## * 'पानिपत'ची ३०वी आवृत्ती

पानिपत युद्धाला जानेवारी महिन्यात २५० वर्षे पूर्ण होत असल्याने विश्वास पाटील यांच्या 'पानिपत' या कादंबरीची ३०वी आवृत्ती प्रकाशित झाली आहे. तिच्यात पहिल्यांदाच प्रसंगचित्रांचा व व्यक्तिचित्रांचा समावेश केला आहे.

मराठी साहित्यविश्वात प्रचंड खपलेल्या कादंबऱ्यांमध्ये 'पानिपत'चा समावेश होतो. मराठ्यांच्या इतिहासावर खोलवर परिणाम करणाऱ्या या युद्धाचे आणि त्याच्याशी संबंधित अनेक पैलूंचे अतिशय भेदक चित्रण विश्वास पाटील यांनी या कादंबरीत केले आहे. या कादंबरीने एक लाखाचा आकडा पार केला आहे. हिंदीसह इतर भाषांमध्ये तिचे भाषांतर झाले आहे. मुंबई आकाशवाणीने केलेल्या सर्वेक्षणानुसार, मराठीतील गेल्या ५० वर्षांतील सर्वोत्कृष्ट १० पुस्तकांमध्ये या कादंबरीचा समावेश आहे. याशिवाय तिला ३५हून अधिक पुरस्कार मिळाले आहेत.

*** जगभरातील बोलींच्या संरक्षणासाठी केंब्रिज विद्यापीठाचा प्रकल्प**

भारतात तसेच जगात विविध ठिकाणी अस्तंगत होत चाललेल्या बोली भाषांचे रक्षण व्हावे यासाठी केंब्रिज विद्यापीठाने एक महत्त्वपूर्ण प्रकल्प हाती घेतला आहे. लोकांना या बोली भाषा कळाव्यात, म्हणून विद्यापीठात संशोधकांनी खास वेबसाईटवर आता लोकांना त्या भाषांसंबंधात मुक्त प्रवेश दिला आहे.

www.oralliterature.org अशी ही वेबसाइट असून त्यात केरळमधील पल्लकड जिल्ह्यात कुरुंबर समाजाची बोली आदी विविध बाबींचा समावेश आहे. बुंदी जिल्ह्यातील थिकराडा गावातील माळी समाजातील लोकांची जीवनशैली, संस्कृती कळावी असाही एक प्रकल्प आहे. तसेच राजस्थानातील हडोतीमधील तेजाजी परंपरा, रीतिरिवाज याची माहिती असलेले ध्वनिमुद्रण हिंदी व इंग्रजीत भाषांतरित करण्यात आले आहे. जगातील ३५२४ बोलींचे ध्वनिमुद्रण असलेल्या फाइल्स उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

*** पुस्तक प्रकाशन कार्यशाळा**

मराठी भाषेच्या संवर्धनासाठी, भाषेच्या प्रचारासाठी पारंपरिक विद्यापीठे नक्की काय करतात, या प्रश्नाला पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाने उत्तर दिले आहे. प्रकाशन व्यवसायाशी संबंधित शास्त्रशुद्ध माहिती, वितरण व्यवस्था, संपादन, नवीन तंत्रज्ञान यावर आयोजित कार्यशाळेत विद्यार्थ्यांसह विविध क्षेत्रातील ४५ व्यक्ती सहभागी झाल्या आहेत.

गेल्या काही वर्षांत अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या प्रादेशिक भाषांमधील पुस्तके प्रकाशित करत आहेत. त्याचप्रमाणे अनुवादित पुस्तकांची मागणीही वाढत असल्याने, प्रकाशन व्यवसायाशी निगडीत असलेल्या सर्व घटकांची इत्थंभूत माहिती व्हावी, यासाठी ही कार्यशाळा आहे.

राज्य सरकारच्या मराठी भाषा सल्लागार समितीचे अध्यक्ष माजी न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्‌घाटन झाले. प्रकाशक हा बहुश्रुत असेल, तर तो चांगला उद्योजक होऊ शकतो, संस्कृती आणि समाज यांची योग्य ओळख त्याला हवी. ज्ञानसाधनेतील महत्त्वाचा घटक असणाऱ्या प्रकाशकाला वाङ्मयाबाहेरील दबावांना नकार देता आला पाहिजे. त्यामुळे चांगली पुस्तके वाचकांपर्यंत पोचू शकतील, असे मत चपळगावकर यांनी व्यक्त केले.

नॅशनल बुक ट्रस्टचे सहाय्यक संचालक सुमीत भट्टाचार्य, प्रकाशन परिषदेचे अध्यक्ष रमेश कोन्नूर, कार्याध्यक्ष अरुण जाखडे उपस्थित होते.

*** भास्करराव दुर्वे यांच्या चरित्रग्रंथाचे प्रकाशन**

स्वातंत्र्यलढ्यात योगदान दिलेले नगर जिल्ह्यातील नेते दिवंगत भास्करराव दुर्वे यांच्यावरील 'नायक' या चरित्रग्रंथाचे प्रकाशन एस. एम. जोशी फाऊंडेशन येथे मेधा पाटकर आणि पोपटराव पवार यांच्या हस्ते झाले.

भास्करराव दुर्वे यांनी स्वातंत्र्यलढ्याबरोबरच संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन, समाजवादी चळवळ, शेतकरी, आदिवासी आणि बिडी कामगारांच्या लढ्यात मोठे योगदान दिले त्यांच्या चरित्रग्रंथाची निर्मिती संगमनेर येथील भास्करराव दुर्वे स्मारक प्रतिष्ठानने केली आहे. राजा कांदळकर हे या ग्रंथाचे लेखक आहेत. या प्रसंगी विजय मोरे, प्रमोद भालेराव यांचा सत्कार केला गेला.

*** 'न्यूयॉर्क टाइम्स'च्या टॉप टेन यादीत भारतीय डॉक्टराचे पुस्तक**

भारतीय वंशाचे अमेरिकी डॉक्टर सिद्धार्थ मुखर्जी यांच्या कर्करोगावरील पुस्तकाचा समावेश 'न्यूयॉर्क टाइम्स'च्या या वर्षीच्या सर्वोत्कृष्ट पुस्तकामध्ये झाला आहे. नोव्हेंबर महिन्यात प्रकाशित झालेल्या मुखर्जी यांच्या 'द एम्परर ऑफ ऑल मॅलडिज : अ बायोग्राफी ऑफ कॅन्सर' या पुस्तकाला ललितेतर पुस्तकांमध्ये तिसरा क्रमांकाला लागले आहे. कर्करोगाशी लढा देणाऱ्या वैद्यकशास्त्राचा सखोल इतिहास मुखर्जी यांनी मांडला आहे. बोस्टनमधील डाना-फार्बर इन्स्टिट्यूटमध्ये २००९ साली कर्करोगावरील औषधावर संशोधन करीत असताना मुखर्जी यांनी या पुस्तकाचे लेखन केले. एखादा धर्मगुरू ज्या पद्धतीने सैतानाचे चरित्र मांडील, त्या पद्धतीने मुखर्जी यांनी आपल्या पुस्तकातून कर्करोगाचा विषय विशद केला आहे.

*** राज्यस्तरीय ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन**

सिल्लोड (जि. औरंगाबाद) कै. सौ. लीलादेवी सीताराम अग्रवाल स्मृतिप्रित्यर्थ सार्वजनिक ग्रंथालय क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यास राज्यस्तरीय ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे.

पाच हजार रुपये रोख, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप असून सार्वजनिक ग्रंथालयाच्या प्रगतीसाठी कार्य करणारा, सार्वजनिक वा खाजगी ग्रंथालयात नोकरी न करणारा कोणीही कार्यकर्ता त्यासाठी अर्ज करु शकतो. या क्षेत्रात कार्यरत कार्यकर्ते, अभ्यासक अथवा त्यांच्या मित्रमंडळींनी ग्रंथालयाच्या कार्यासंबंधी वर्तमानपत्रातील बातम्यांची कात्रणे, प्रमाणपत्रे, लेखन आदींच्या झेरॉक्स प्रतीसह सीताराम अग्रवाल, द्वारा - विजय बीज ॲन्ड मशिनरी स्टोअर्स सिल्लोड, जि. औरंगाबाद या पत्त्यावर १५ जानेवारी २०११ पर्यंत पोहोचतील या बेताने प्रस्ताव पाठवावेत. असे संयोजकांतर्फे आवाहन करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी ९४२२२०४०६५ या क्रमांकावर संपर्क साधावा. ❒

# दखल



*** भरपूर पुण्याई लाभलेला दिलदार साहित्यकार**

इ. स. २००३ मध्ये कराड येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. सुभाष वासुदेव भेंडे यांच्या देहावसानाची बातमी अगदी अनपेक्षित म्हणावी लागेल. रविवारच्या (१८ डिसेंबर) 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये त्यांच्या 'मयसभा' या सदरातला त्यांचा 'पुण्याई' हा लेख वाचनात आला होता. त्या लेखात अडचणीच्या किंवा आपत्तींच्या प्रसंगी अनाहूतपणे मिळालेल्या मदतीचे काही विलक्षण अनुभव त्यांनी दिलेले होते. माउंट अबूला त्यांनी बुकिंग केलेले गेस्ट हाऊस त्यांना काही केल्या सापडेना. त्यांनी आपली टॅक्सी थांबवून चार-पाच जणांकडे चौकशी केली, परंतु कोणालाच त्या गेस्ट हाऊसचा पत्ता सांगता येईना. ते चकवा लागल्याप्रमाणे गोल गोल फिरून पुन्हा त्याच जागी येऊ लागले. अशा वेळी एका केस पिंजारलेल्या, मळक्या कपड्यातल्या फाटक्या तरुणाने त्यांना गाडीत बसून गाइड केले. ते गेस्ट हाऊस दाखवले. गेस्ट हाऊसमध्ये सामान उतरवल्यावर त्या तरुणाचे आभार मानण्यासाठी त्यांनी मागे बघितले. तर तो दिसला नाही. कुठे अदृश्य झाला ते कळलेच नाही. इस्तंबुल, हाँगकाँग, जयपूर एअरपोर्ट, मॉरिशस येथेही त्यांना असेच अनुभव आले. ते सांगून, अडचणीच्या वेळी मदतीला कोण येतो, असा प्रश्न त्यांना पडला. गोव्यातला एका नातलग म्हणाला, ''आपल्या घराण्याचा मूळ पुरुष असेल तो.'' त्यावर भेंड्यांची पत्नी म्हणाली, ''आयुष्यात काही थोडंफार तुमच्या हातून झालं असेल. ती पुण्याई मनुष्यरूपात उभी राहत असेल.'' ह्या लेखाखालीच हे सदर पूर्ण झाले म्हणून समाप्त असे कंसात टाकलेले आहे.

सदराची सांगता आणि जीवनाची सांगता बरोबरच व्हावी हा देखील त्यांच्या पुण्याईचाच भाग म्हणायला हवा. कारण त्यांना आपल्या आयुष्यात सर्वच क्षेत्रात चांगले यश मिळाले. चौऱ्याहत्तर वर्षाचे आयुष्य - तेही निरोगी, निरामय.

गोमंतकात बोरी गावी जन्म. पाचव्या वर्षी सांगलीला आगमन. सांगली आणि पुणे येथे शिक्षण. शालेय वयातच 'स्वराज्य'च्या कथा स्पर्धेत बक्षीस, 'सकाळ'मध्ये नोकरी करत एम. ए. (अर्थशास्त्र) पदवी पूर्ण. गोखले इन्स्टिट्यूटमध्ये डॉक्टरेटचा

अभ्यास. १९६२ मध्ये महाराष्ट्र टाइम्स या दैनिकात उपसंपादक म्हणून निवड झाली. (माझीही त्यावेळीच निवड झाली.) पण दैनिकाचे प्रकाशन लांबले. त्यामुळे भेंडे यांनी गोव्यातल्या चौगुले महाविद्यालयात लेक्चररशिप मिळाली, ती पत्करली. मटा दैनिक जूनमध्ये सुरू झाले. मी मटाच्या रविवार पुरवणीचे काम पाहू लागलो. भेंडे मटा मध्ये राहिले असते तर पत्रकार म्हणून गाजले असते, पण तो योग हुकला. ते प्राध्यापक, प्राचार्य म्हणून गाजायचे होते.

आपल्या जन्मभूमीत, गोमंतकात प्राध्यापक म्हणून रमले. कथाकादंबऱ्या लिहू लागले. १९६९ साली मुंबईच्या कीर्ती कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून आले. १९९३ मध्ये निवृत्त झाले. गोमंतकात असताना विनोदी लेखनावर भर देणारे भेंडे मुंबईत आल्यावर कादंबऱ्यांकडे वळले. वीणा मासिकाच्या संपादकांनी, उमाकांत ठोमरे यांनी दिवाळी अंकासाठी कादंबरी लिहा असे सांगितले. त्यामुळे 'आमचें गोंय आमकां जाय' ही कादंबरी लिहून झाली. ती वाचकांना आवडली. मॅजेस्टिकने पुस्तक रूपात प्रसिद्ध केली. पुढच्या काळात अदेशी, जोगीण, अंधारवाटा, चकवा, पैलतीर, उद्ध्वस्त, बॉनसॉय या कादंबऱ्या वीस वर्षात प्रसिद्ध झाल्या. त्यापैकी बऱ्याच पुरस्कार पात्र ठरल्या. विनोदी लेखांचेही वीसावर संग्रह निघाले. मुंबईत 'ललित'च्या परिवारात ते सामील झाले. त्यांच्या वाङ्मयीन प्रतिभेला व्यापक क्षेत्र लाभले.

डॉ. सुभाष भेंडे यांच्या बहुतेक कादंबऱ्या दीडशे पानांच्या आतबाहेर म्हणजे विस्ताराने आटोपशीर आहेत. तरीही त्या मर्यादेत त्यांनी आपली कथावस्तू नेमकेपणाने उभी केलेली असते. व्यक्तिरेखा व्यवस्थितपणे फुलवलेल्या असतात. संघर्ष अटीतटीने चितारलेला असतो. काहीशा खांडेकरी शैलीतले आदर्शवादी व्यक्तिमत्त्वांचे आणि मूल्यांचे संस्कार त्यांच्या आरंभीच्या कादंबऱ्यांमध्ये दिसतात. 'माझ्या सर्वच कादंबऱ्या गंभीर आशयाच्या आहेत' असे ते स्पष्टपणे म्हणत.

'आमचें गोंय आमकां जाय' या पहिल्याच कादंबरीत त्यांनी गोवा मुक्तीनंतरच्या काळातले सामाजिक, राजकीय, वैचारिक बदल रेखाटलेले आहेत. ख्रिश्चन समाजातील अंधश्रद्धेला बळी पडलेल्या 'बर्नी' या तरुणीला कॉनव्हेंटमध्ये जाऊन नन होताना आलेले चमत्कृतिपूर्ण, उद्वेगकारक अनुभव 'जोगीण'मध्ये वाचायला मिळतात. गोव्यातील प्रतिष्ठित सारस्वत कुटुंबातील स्त्रियांचा होणारा कोंडमारा, पुरुषी अहंकार, प्रतिष्ठेच्या भ्रामक कल्पना, अंतर्विरोध यांचे दर्शन 'चकवा'मध्ये घडते. परदेशातील उत्तम नोकरी आणि सुखसमृद्धी सोडून गोव्यात परतणारा महेश येथील दारिद्र्य, भ्रष्टाचार, सामाजिक दांभिकपणा बघून वैतागतो. येथे मनासारखी नोकरी मिळण्याची शक्यता नाही हे लक्षात आल्यावर येथील वातावरणात घुसमटू लागतो. 'अदेशी'मध्ये ब्रेनड्रेनच्या समस्येची दुसरी बाजू समोर येते.

'अंधारवाटा'मधील जयूला ऐहिक सुखासाठी भयंकर तडजोडी कराव्या लागतात. पैशापाठोपाठ येणाऱ्या विकृती टाळणे अशक्य ठरते. अस्तित्वाची स्पर्धा अधोगतीकडे नेते. मध्यमवर्गीयांच्या सांस्कृतिक भ्रष्टतेचे व लैंगिकतेचे अंत:प्रवाह असूनही जबरदस्त सामाजिक जाणिवांनी ही कादंबरी नैतिक आशयसूक्त मांडते असे प्रा. भालचंद्र नेमाडे यांनी म्हटले आहे. शिक्षणक्षेत्रातील भ्रष्टाचार, खुज्या मनोवृत्तीची माणसे आणि कुलगुरूसारख्या उच्चपदस्थ व्यक्तीच्या संधिसाधूपणाच्या मूल्यहीन वर्तनाचे बोन्सायमध्ये चित्रण मर्मभेदक आहे. संस्थाचालक, प्राध्यापक संघटना, विद्यार्थी संघटना, कॅपिटेशन फी, अपात्र व्यक्तींच्या नेमणुका वगैरे विषयही या कथावस्तूशी एकजीव झालेले आहेत.

औद्योगिक क्षेत्रातील मूल्यांचा ऱ्हास (किनारा), खाणमालकांच्या विरोधात संघर्ष करून खाणमालकांना नामोहरम करण्यात यशस्वी झालेला नेता (उद्ध्वस्त), ध्येयवादी पत्रकारितेवरील बाह्य दडपणे (पैलतीर), दलित नेतृत्वातील अध:पतन व बेबनाव (काजळल्या दिशा) यासारखे समकालीन विषय हाताळण्यात सुभाष भेंडे यांनी नेहमीच जागरुकपणा दाखवला. कथानकातील पात्रे, घटना आणि संघर्ष यांची गुंफण चिरेबंदी असल्यामुळे त्यांच्या कादंबऱ्या वाचकांना गुंतवून ठेवत.

मुंबईत भेंडे यांच्या भेटीगाठी वरचेवर होत. त्यांचे दिलखुलास पण सौहार्दशील व्यक्तिमत्त्व, स्वभावातले मार्दव आणि मोकळेपण सर्वांना आकृष्ट करी. कुठलाही अभिनिवेश नसे. 'ललित'मध्ये जयवंत दळवींचा ठणठणपाळ गाजत होता. दळवींच्या नंतर त्यासारखेच पितळी दरवाजा हे सदर गोमागणेश या नावाने सुभाष भेंडे लिहू लागले. ठणठणपाळची निर्व्याज, निर्विष विनोदाची परंपरा त्यांनी पुढे चालवली. तब्बल आठ वर्षे त्यांनी हे सदर चालवले. साहित्य क्षेत्रातील घडामोडींवर आणि बऱ्यावाईट प्रवृत्तींवर मल्लीनाथी करणारे, प्रसंगी उपरोध-उपहासाने खिल्ली उडवणारे हे लेखन तसे तात्कालिक; परंतु आजही ते वाचायला घेतले तर वाचत राहावेसे वाटते. शिळे किंवा कालविसंगत वाटत नाही. कारण त्यांनी हल्ला चढवलेल्या प्रवृत्ती अजून कायमच आहेत. काळाबरोबर चालत राहणाऱ्या लेखकाला विनोदातला ताजेपणा टिकवता येतो. भेंडे सतत काळाबरोबर राहिलेले दिसतात. कादंबऱ्यांतही आणि विनोदातही.

डॉ. भेंडे यांच्या पुण्याईचा प्रत्यय त्यांच्या एकूण आयुष्यात येतो.

अध्यापनक्षेत्रात ते लोकप्रिय ठरले. अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून त्यांनी काही पाठ्यपुस्तके लिहिली. ती विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरली. कीर्ती कॉलेजचे प्राचार्य मे. पुं. रेगे यांनी त्यांना गोव्यातून मुंबईला येण्यासाठी तयार केले. अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून त्यांची नेमणूक केली. २५ वर्षे भेंडे या कॉलेजात राहिले. निवृत्तीनंतर ते

दुसऱ्या एका कॉलेजचे प्राचार्य बनले. शिक्षणक्षेत्रात त्यांनी शिखर गाठले.

लेखनक्षेत्रातही त्यांनी सातत्य ठेवले. दहा कादंबऱ्या, वीस विनोदी लेखसंग्रह, प्रवासकथा, व्यक्तिचित्रे, समीक्षात्मक लेखन, नाटक, संपादन अशी चौफेर मुलुखगिरी केली. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. अ. भा. साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद हा मराठीतला सर्वोच्च सन्मान. तोही त्यांनी फारशी धावपळ न करता मिळाला. पहिल्याच झटक्यात ते निवडून आले. ''साहित्य विश्वात मी मनापासून रमतो. लेखन-वाचन हा माझा श्वास आहे. लेखनवाचनातल्या आनंदासाठी मी आसुसलेला असतो. साहित्य हा माझ्या आयुष्यातला फार मोठा विसावा आहे.'' असे ते मानत. त्यांचे अध्यक्षीय भाषण सर्वस्पर्शी होते. त्या संमेलनाचे उद्‌घाटन माजी पंतप्रधान नरसिंहराव यांनी केले होते. ते संमेलनही कृष्णाकोयना संगमावर दिमाखदार झाले. कुठलेही वाद निर्माण न होता, विघ्न न होता पार पडले. सुभाष भेंडे यांच्या पुण्याईला निश्चितच त्याचे थोडे श्रेय द्यायला हवे. ही पुण्याई नसेल तर यादवी कशी घात करते हे आपल्याला ठाऊक आहेच.

त्यांच्या दूरदर्शनवरच्या पैलतीर या मालिकेलाही चांगला प्रतिसाद मिळाला.

बांद्रा येथील साहित्य सहवास मध्ये त्यांना फ्लॅट मिळाला. मराठीतील दिग्गज लेखकांचा सहवास मिळाला. त्यांच्याशी ऋणानुबंध जडले. त्यांच्या ऋजू स्वभावामुळे सर्वांशी घरोब्याचे संबंध राहिले. 'ललित'मुळेही त्यांचे मैत्रीचे वर्तुळ मोठे झाले. विश्वकोशाच्या कामासाठी वाई येथे वरचेवर जाणे झाल्यामुळे लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्याशी जवळीक निर्माण झाली. माधव गडकरी, हातकणंगलेकर वगैरेंशी घरच्यासारखे संबंध जडले. त्यापैकी काही जणांची व्यक्तिचित्रेही त्यांनी रेखाटली. पतीच्या प्रतिभेला खुलवणारी समाधानी पत्नी, आपल्या कर्तृत्वाने उच्च स्थान मिळवणारी मुले-कौटुंबिक सौख्य त्यांना उत्तम लाभले. संगीताचे, चित्रपटाचे, क्रिकेटचे छंद मनसोक्त जपता आले. साहित्याने आपले आयुष्य सुफळ संपन्न केले, अशा सार्थकतेच्या तृप्तभावनेने त्यांना मरण आले. आजारपणात खितपत न पडता देहावसान हेही त्यांच्या पुण्याईचेच लक्षण होय.

एक दिलदार स्नेही म्हणून त्याचे स्मरण नित्य होत राहील.

**शंकर सारडा**

ई १० पाटील रिजन्सी, १५ एरंडवणे, पुणे ४११००४.

मोबा.९८२३२६१०२३



# भरारीची स्वप्ने पाहणारा निषाद देशमुख

निषाद (देशमुख) आणि माझी पहिली भेट नवी दिल्लीतील जागतिक ग्रंथप्रदर्शनामध्ये २००६ साली झाली. त्याच्या आसपासच तो अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघाच्या व्यवहारामध्ये रस घेऊ लागला. खरं सांगायचं तर प्रकाशनविषयक कार्यशाळा, परिषदा यामध्ये नाशिकसारख्या गावामधून खास येऊन भाग घेणारा तरुण अशीच माझी त्याच्याबद्दलची प्रतिमा त्याच्या पहिल्या भेटीमध्ये तयार झाली. फार्मसीचा विद्यार्थी आणि त्याच्याशी संलग्न विषयांवर पुस्तके प्रकाशित करणारा यापलीकडे विशेष ओळख झाली नाही.

पण त्याच वर्षी ऑक्टोबरमध्ये आम्ही फ्रँकफर्ट ग्रंथ प्रदर्शनाला एकत्र गेलो, राहिलो आणि मग निषादची खरी ओळख होऊ लागली. हा कोमल नसून शुद्ध निषाद असल्याचे प्रतीत होऊ लागले.

इंग्रजीत सांगायचे तर he dined and wined with publishing. प्रकाशनाचे चांगले प्रस्ताव मिळवणे; त्यावर योग्य विचार करणे; संपादन, निर्मिती, विक्री, मार्केटिंगच्या सर्व कामांकरता योग्य त्या व्यक्ती मिळवणे, अशा सर्व अंगांचा सतत पद्धतशीर विचार करून त्याने आपली प्रकाशन संस्था नावारूपाला आणली. आज या संस्थेचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचले आहे.

उच्च विचार, दूरदृष्टी, ध्यास, कष्ट उपसण्याची प्रचंड तयारी, अभ्यास, माणसाला माणूस म्हणून बघण्याचा विचार यामुळेच निषाद मोठा झाला.

ब्रिटिश कौन्सिलने तीन वर्षांपूर्वी तरुण उद्योजक म्हणून गौरव केला. तो लंडनला गेला. तेथील गाठीभेटीत निषादच्या कक्षा विस्तारल्या. निषादच्या प्रकाशन संस्थेमध्ये ४० पेक्षा अधिक व्यक्ती काम करत आहेत. आपण मालक नाही, त्या सर्व कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाचे प्रमुख आहोत अशी त्याची भावना होती. मला वाटते की कार्यालय व्यवस्थापनाचा गाभा त्याने बरोबर आत्मसात केला होता. कर्मचाऱ्यांवरील लोभापोटी निषाद त्यांना प्रशिक्षण कार्यक्रमांना पाठवत असे. तो स्वत:ही प्रशिक्षणाच्या विविध वाटा चोखाळत असे. नाशिकमध्ये श्री. राजेंद्र बागवे यांच्या Teaching Learning Community चा तो सभासद होता. आपला दिनक्रम भरगच्च असूनसुद्धा त्या उपक्रमाचे नाट्यरूप त्याने सादर केले.

आम्ही बाहेरगावी एकत्र असलो तर शक्यतो निवासस्थान एकच असावे असा आमचा दोघांचा प्रयत्न असे. दिवसभर काम करून तेथे परतल्यावर ज्या गप्पा होत त्यामधून निषादचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व उलगडत गेले. निषाद पूर्णपणे व्यावसायिक होता पण त्याला माणसांची पारख होती. कुठे काय चालले आहे याचे भान होते.

कदाचित यामुळेच लेखकांचा स्वत:चा आपल्या जीवावर नसेल त्यापेक्षा अधिक जीव निषादचा त्यांच्यावर होता. लेखकांना 'प्रमोट' करण्याचे त्याचे प्रयत्न पहावेत. मग ते पं. दिनकर कैकिणी असोत की डॉ. आनंद नाडकर्णी, डॉ. विनोद रंगारी असोत की डॉ. आत्माराम पवार. पं. दिनकर कैकिणींच्या पुस्तकाच्या अनुषंगाने ठाणे व पुणे अशा दोन ठिकाणी मुलाखत झाली. फार्मोकॉग्नॉसी या दोन खंडांच्या ग्रंथाची लोकप्रियता आशयाइतकीच निषादमुळे वाढली म्हणायला काहीच हरकत नाही.

प्रकाशन व्यवसायात गेल्या पाच-सहा वर्षांमध्ये निषाद स्थिरावला आणि मग त्याने मोठी झेप घेण्याचा विचार करण्यास सुरुवात केली. फार्मसीवरील एक मौल्यवान संदर्भग्रंथ प्रकाशित करण्याचा प्रयत्न यशस्वी झाला नाही हे खरं तर आपले दुर्दैव होय. पण याची त्रुटी त्याने भाषाशास्त्र, नर्मदा परिक्रमा, मानसिक स्वास्थ्य, संगीत या विविध विषयांवरील पुस्तके प्रकाशित करून भरून काढली.

पुस्तक विक्रीबाबतही निषाद जागरुक होता. क्रॉसवर्डसारख्या दुकानांमधून आपली प्रकाशने कशी उपलब्ध होतील हे पाहण्याबरोबर आपल्या पुस्तकांची पायरसी रोखण्याकरता त्याने कडक मोहीम उभारली. २००८ मध्ये फ्रँकफर्ट प्रदर्शनाच्या लगीनघाईत असतानाच पुण्याला येऊन त्याने काहींना बिनभाड्याच्या घरात (जेवणखाण फुकट) काही दिवस पाहुणचाराला पाठवले. नंतर स्वत:ही पुढाकार घेऊन त्याने कॉपीराईट आणि पायरसी यावर कार्यशाळा घेतली.

'तुम्ही चुकला आहात' असे थेट (आणि कटुपणे) निषाद कधीही एखाद्याला सांगत नसे. अप्रत्यक्षपणे 'असं करून बघा' म्हणायचा. 'त्याचे काय आहे' अशी सुरुवात करून सबबी सांगितल्या नाहीत किंवा आपण कोणाला काय मदत केली याची वाच्यता केली नाही. त्याबाबत तो पडद्यामागचा कलाकार होता.

त्याच्यात मला वाटते थोडे वैगुण्य असेल तर ते त्याच्या रात्री प्रवास करण्याच्या, वेळप्रसंगी एकट्याने मोटार हाकत रात्री-अपरात्री पोहोचण्याच्या साहसाचे.

ई-बुक्सच्या जगात लवकरच धमाल (निषादच्या शब्दात दंगल) करण्याचा त्याचा संकल्प होता. आमच्या शेवटच्या भेटीत ज्या काही अनेक गोष्टींवर आम्ही दिल्लीमध्ये चर्चा केली त्यामध्ये या नव्या दालनात कसे शिरायचे यावर बोललो होतो. निषाद भरारीची स्वप्ने पाहात होता.

मला मात्र अजून एक प्रश्न छेडतो आहे. निषादची शेवटची भेट, त्याच्या पहिल्या भेटीसारखी, दिल्लीतच व्हावी यात काही परमेश्वरी संकेत तर नव्हता?

**सुनील मेहता** (मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.)

## * निषादची स्मृती चिरंतन राहो

३० नोव्हेंबर २०१०ला पहाटे निषाद देशमुखचा अपघाती मृत्यू झाला. या घटनेला काही आठवडे उलटून गेले असले तरीही त्याच्या अनपेक्षित जाण्याचा धक्का आणि त्यामुळे वाटणारी हळहळ तीव्र आहे. ही परिस्थिती जे त्याच्याशी चांगले परिचित होते त्यांचीच आहे असं नाही तर ज्यांच्या ज्यांच्या थोड्याफार संपर्कात तो आला होता त्या सर्वांची आहे. यात काही भाग हा त्या घटनेच्या अनपेक्षिततेचा आहे, काही भाग तो इतक्या तरुणपणी गेला याचा आहे, परंतु फार मोठा भाग हा ज्या प्रकारचं व्यक्तिमत्त्व आपण गमावलं त्यामुळे आहे.

सदतीस वर्षांचं आयुष्य हे खरंतर किती अल्प आयुष्य! त्यापैकीही पहिली वीस-पचंवीस वर्षं ही बहुतेकांप्रमाणे शिक्षण व जीवननिर्वाहाची दिशा ठरविण्यातच गेलेली. पुढच्या दहा-बारा वर्षांचा काय तो निषादचा व्यावसायिक कार्यकाल. दीर्घ विकसनकाल लागणाऱ्या ग्रंथप्रकाशन व्यवसायाच्या दृष्टीने पहिली आठ-दहा वर्षे म्हणजे केवळ उमेदवारीची वर्षे. ही उमेदवारीची वर्षे चांगल्याप्रकारे कारणी लावून उंच भरारी घेण्याच्या टप्प्यावर नेमकी निषादच्या आयुष्याची दोरी तुटली.

ग्रंथप्रकाशन हा जीवननिर्वाहाचा मार्ग म्हणून निषादने निश्चित करण्याच्या सुमारासच माझा त्याचा परिचय झाला. निमित्त झालं नॅशनल बुक ट्रस्ट व यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठानं १९९९ साली योजलेली प्रकाशन व्यवसाय कार्यशाळा. त्या कार्यशाळेला एक व्याख्याता म्हणून मी गेलो होतो आणि निषाद त्या कार्यशाळेत एक प्रशिक्षणार्थी होता. औषध निर्माणशास्त्रासारखा व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण करून तो ग्रंथ प्रकाशनाचा व्यवसाय म्हणून विचार करतो आहे याचं मला आश्चर्य वाटलं होतं. विद्याभ्यास आणि शिक्षणक्षेत्राशी संबंधित कुटुंबातला, व्यापार उदिमाची पार्श्वभूमी नसलेला एक तरुण, नोकरी व्यवसायाच्या उत्तम संधी असलेला औषधनिर्माण शास्त्रासारखा अभ्यासक्रम चांगल्याप्रकारे पूर्ण करूनही ग्रंथप्रकाशन व्यवसाय करण्याचा विचार करतो यातच त्या तरुणाचं आगळंवेगळंपण आहे हे त्यावेळी नीटसं लक्षातच आलं नाही.

आपण अभ्यासलेल्या औषध निर्माणशास्त्राच्या अभ्यासक्रमासाठी उपयुक्त अशी पाठ्यपुस्तकं 'करिअर पब्लिकेशन्स' या नावानं विचारपूर्वक निषादनं प्रकाशित करायला प्रारंभ केला. जाणत्या प्राध्यापकांकडून त्यानं पुस्तकं लिहून घेतली. परंतु त्याचबरोबर, लेखकांचं लिखाण जसच्या तसं स्वीकारण्याचा पाठ्यपुस्तक प्रकाशकांचा शिरस्ता मोडला. त्यानं पुस्तकं भाषेच्या व शास्त्रीय मांडणीच्या दृष्टीनं, ओरिएन्ट लाँगमन्ससारख्या प्रकाशन संस्थेत ग्रंथसंपादनाचा अनुभव असलेल्या अविनाश पंडितांकडून संपादन करून घेतली. व्यवसायाच्या प्रारंभीच अशी दृष्टी ठेवून काम

करण्यात त्याचं आगळंपण दिसून आलं. या पुस्तकांच्या विक्री वितरणासाठी, जिथे जिथे अभ्यासक्रम होते तिथे तिथे जाऊन प्रथमपासून प्रयत्न केले. ही पुस्तकं बऱ्यापैकी स्वीकारली जाऊन प्रकाशन व्यवहाराला थोडेफार स्थैर्य आल्यानंतर तो गौतमी प्रकाशन नावानं मराठीत पुस्तकं प्रकाशित करू लागला. संगीतकार कैकिणी, भारती ठाकूरांचं नर्मदा परिक्रमा, पवारांचं 'औषध घेताना' ही पुस्तकं वाचकांपर्यंत पोचवण्यासाठी त्यानं केलेले प्रयत्न म्हणजे ग्रंथनिर्मिती आणि ग्रंथप्रसाराचा वस्तुपाठच होता.

ग्रंथप्रकाशनाच्या व्यवहारातील नव्या सुधारणा, नवे प्रवाह, यांच्याशी परिचित राहण्यासाठी, व्यवहाराकडे दुर्लक्ष न करता, तो जमेल त्या चर्चासत्रांना, कार्यशाळांना हजेरी लावत असे. ऐकलेलं, वाचलेलं असेल त्यावर स्वतंत्रपणे विचार करत असे. जमेल ते प्रत्यक्षात आणत असे, बाकीच्या कल्पना टाकाऊ म्हणून सोडून न देता त्यांची नोंद ठेवत असे. हे सगळं करायला तो वेळ आणि ताकद आणतो कोठून असा प्रश्न पडत असे. त्यानं वेळ व्यवस्थापनाची व्यवस्थित घडी बसवली होती.

त्याच्या कार्यतत्पर व कार्यकुशल व्यवस्थापनाचा परिपाक म्हणजे त्याची 'लंडन बुक फेअर'च्या यंग आन्त्रप्रनर स्पर्धेसाठी भारताचा प्रतिनिधी म्हणून २००८ साली झालेली निवड. मराठी प्रकाशकांनी अभिमानानं सांगावी व नवोदित प्रकाशकांनी अनुकरण करावे अशी ही घटना. गेली चार-पाच वर्षं तो नियमितपणे फ्रँकफर्ट बुक फेअरला हजेरी लावत होता. लंडन बुक फेअरलाही जात होता. भारतातल्या बुक फेअर्सही चुकवत नव्हता. डोळे उघडे ठेवून प्रकाशन व्यवसायात होणारी परिवर्तनं बघत होता. प्रकाशन व्यवहाराच्या विस्तारणाऱ्या आणि बदलणाऱ्या क्षितिजांशी मेळ घालायचा विचार करत होता. फक्त परदेशी पुस्तकांच्या पुनर्मुद्रणाचे आणि भाषांतराचे हक्क आणण्याच्या एकतर्फी व्यवहाराच्या जोडीला आपली पुस्तकं, आपली संस्कृती, आपले लेखक यांचं प्रभाव क्षेत्र विस्तारायचा विचार करत होता. मराठीतील काही पुस्तकांची इंग्रजी, हिंदी भाषांतरे प्रकाशित करण्याच्या योजना त्यानं कार्यान्वितही केल्या होत्या. ई-बुक्स माध्यम प्रभावीपणे वापरण्याची त्याची जिद्द होती.

हे सारं एका अर्थानं मी जवळून बघत होतो, अनुभवत होतो. पहिल्या भेटीपासून त्यानं माझ्याशी सतत संपर्क ठेवलेला होता. अधूनमधून चर्चा करायला, सल्ला घ्यायला भेटत होता. त्याची क्षितिजं विस्तारत होती. परंतु संपर्क आणि संबंध सांभाळण्याचं सौजन्य त्यानं शेवटपर्यंत सांभाळलं होतं. त्याच्या अपघाताच्या आदल्या दिवशीच त्यानं दिल्लीहून एसेमेसनं डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात भेटायला येणार असल्याचं कळवलं होतं. दुर्दैवानं ती भेट व्हायची नव्हती. आता कायमची चुटपूट लागून राहील.

व्यवसायातून मैत्र साधल्या गेलेल्या माझ्यासारख्याचीही निषादच्या आठवणीनं

अशी हळवी मन:स्थिती होते तर त्याचे आईवडील, पत्नी, दोघे लहान मुलगे व इतर कुटुंबीय यांना त्याच्या वियोगाचे दु:ख सहन करणे किती कठीण होत असेल याची कल्पनाही करणे कठीण.

याही परिस्थितीत तोंड देण्याचे धैर्य त्यांना लाभो आणि निषादने मोठ्या हिमतीनं, उमेदीनं, पद्धतशीरपणे सुरू केलेला ग्रंथ प्रकाशनाचा प्रपंच पुढेही चालू राहो, गौतमी प्रकाशनच्या स्वरूपात निषादची स्मृती चिरंतन राहो अशी प्रार्थना आपण करूया.

**शरद गोगटे**

१२०२/बी सदाशिव पेठ, लिमये वाडी, पुणे ४११ ०३०.

दूरध्वनी ०२०-२४४८९१९०

## सभासदांना सूचना

सध्या पोस्टातून अंक न मिळाल्याच्या किंवा उशिरा मिळत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. आमचे पोस्टिंग दर महिन्याच्या ११ तारखेला नियमित होत असते. वाचकांनी कृपया गैरसमज करून घेऊ नये. तरीही अंक न मिळाल्यास फोन किंवा पत्र आल्याबरोबर आम्ही लगेच दुसरा अंक पाठवतो. कृपया वाचकांनी ही वस्तुस्थिती समजून घेऊन सहकार्य करावे ही विनंती. गैरसमज नसावा.

**संपादक**

भारतीय टपाल खात्याच्या नवीन अधिनियमानुसार मासिकाचे वितरण करताना पिनकोड सहित संपूर्ण पत्ता टाकणे अनिवार्य झाले आहे. आपला अंक वितरित होण्यासाठी कृपया पिनकोडसह आपला संपूर्ण पत्ता लिहून पोस्टकार्डद्वारे मासिकाच्या पत्त्यावर पाठवावा. ही विनंती.

**'मेहता पब्लिशिंग हाऊस'**च्या नवीन पुस्तकांची माहिती, नवनवीन योजना आणि ताज्या घडामोडी कळविण्यासाठी आपला E-mail ID आमच्याकडे हवाच!

**Email : info@mehtapublishinghouse.com**

## * ‘अतिरिक्त’चे स्वागत

साहित्यक्षेत्रात काहीतरी करावे अशी ऊर्मी अनेक ग्रंथप्रेमी व्यक्तींना प्रेरित करीत असते आणि पदरमोड करून अशा व्यक्ती विविध उपक्रम राबवत असतात. कोणी एखादे नियतकालिक वा अनियतकालिक काढतो; कोणी दिवाळी अंकाचा घाट घालतो, कोणी प्रातिनिधिक काव्यसंग्रह काढतो, कोणी ग्रंथालय चालवतो, कोणी एखादी व्याख्यानमाला सुरू करतो, कोणी संमेलन घेतो, कोणी प्रकाशन काढतो, कोणी पुरस्कार देण्याची योजना राबवतो. अशा उपक्रमांद्वारे सांस्कृतिक, वाङ्मयीन, सामाजिक प्रबोधनपर वातावरण समृद्ध होत असते.

शेगाव-बुलडाण्याहून ‘शब्दवेध’ या त्रैमासिकाचे अंक अधूनमधून माझ्याकडे येत असत. दा. गो. काळे हे त्याचे संपादक. उत्तम मुद्रण आणि मांडणी. नव्वदोत्तरी मराठी कवितेचा, प्रयोगाशील कवींचा परिचय त्यातून होई. त्या कवितेचे वेगवेगळ्या समीक्षात्मक शैलीतून गुणदोष स्पष्ट केले जात. गेली जवळजवळ वीस वर्षे हे त्रैमासिक कार्यरत होते. नव्वदोत्तर काळातील बहुतांश प्रयोगशील कवी ‘शब्दवेध’च्या माध्यमातून स्वत:चे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व घडवत राहिले. या काव्याला आणि कवींना स्वत:ची ओळख ‘शब्दवेध’द्वारे मिळवता आली, देता आली.

‘शब्दवेध’ला वर्गणीदार-जाहिरातदार यांच्याकडून फारसा आर्थिक लाभ झाला असेल असे वाटत नाही. परंतु त्याच्याभोवती उत्साही, विद्रोही, आत्मनिष्ठ कविलेखक समीक्षकांची वर्दळ कायम राहिली. प्रसिद्धीचा सोस किंवा सभासंमेलनांतून गाजावाजा याची अपेक्षा किंवा हौस ‘शब्दवेध’च्या गोटाने कधी बाळगली नाही.

या ‘शब्दवेध’चे प्रकाशन थांबवण्याचा निर्णय संपादक-प्रकाशकांनी घेतला, त्याची कारणे दिलेली नाहीत, परंतु ‘व्यवस्था अशा प्रयत्नांना खीळ घालते, त्यातून शब्दवेधचे थांबणे अपरिहार्य झाले आहे’ असे त्यांनी म्हटले आहे. ‘ही अगतिकता नाही. स्वीकारशील भावनेने दिलेला तो विराम आहे’ असाही खुलासा केला आहे.

परंतु ‘शब्दवेध’च्या विरामामुळे निर्माण झालेली रिक्तता भरून काढण्यासाठी दा. गो. काळे आणि दिनकर मनवर यांच्या संपादकत्वाखाली ‘अतिरिक्त’ या नव्या त्रैमासिकाचा शुभारंभ केला गेला आहे, ही गोष्ट समकालीन रसिकांना दिलासा देणारी वाटेल.

‘शब्दवेध’च्या धाटणीचाच ‘अतिरिक्त’चा अंकही दिसतो आहे. पहिला अंक मंगेश नारायणराव काळे यांच्या कवितेचे समालोचन करणारा आहे. तृतीय पुरुषाचे आगमन’ या दीर्घकवितेचा एक अंश, या कवितेतून मिळणारी युगान्त प्रलयाची चाहूल (सचिन केतकर), ‘नाळ तुटल्या प्रथम पुरुषाचे दृष्टान्त’ या संग्रहावरचा लेख (दा. गो. काळे), काळे यांच्या कविता (एकनाथ पगार), कवीला नेहमीच स्वत:ला नाकारता आले पाहिजे (दा. गो. काळे, दिनकर मनवर, मंगेश काळे यांच्यातील

चर्चा) या लेखांद्वारे मंगेश काळे यांच्या पृथगात्मकतेचे दर्शन घडते.

'अतिरिक्त'चे स्वागत मराठी रसिकांनी करायला हवे. नव्या जाणिवा, नवी प्रतीके, नवी मूल्ये घेऊन लेखन करणाऱ्यांना एक अगत्यशील लाँचिंग पॅड म्हणून 'अतिरिक्त'चे अप्रूप वाटत राहील. नव्या प्रतिभेचा डोळस शोध अतिरिक्त घेत राहील. (दा. गो. काळे, रोकडिया नगर, शेगाव. जि. बुलडाणा, ४४४२०३ फोन ०९४२१४६७६४० या अंकाचे देणगी मूल्य ५० रुपये.)

*** पुस्तक विक्रीतील टॉप फाइव्ह - इंग्लंड**

१९९८ पासून नील्सन बुकस्कॅनने पुस्तकांच्या विक्रीची नोंद ठेवण्यास इंग्लंड मध्ये आरंभ केला. त्या वेळेपासून जास्त खपाच्या लेखकांच्या उत्पन्नाची आकडेवारी प्रसिद्ध करण्यात येऊ लागली.

या आकडेवारीनुसार १९९८ पासून सर्वांत जास्त उत्पन्न मिळवणारे पाच लेखक पुढीलप्रमाणे आहेत.

१. जे. के. रोलिंग - २३.०२ कोटी पौंड - हॅरी पॉटर - फँटसी
२. जेमी ऑलिव्हर - १०.०४ कोटी पौंड - पाकशास्त्रावरील पुस्तके, जेमीज् ३० मिनिट्स मील्स
३. टेरी प्रँचेट - ८.६ कोटी पौंड - दि बेस्ट ऑफ मॅट
४. जेम्स पॅटरसन - ८.३८ कोटी पौंड - थ्रिलर्स
५. डॅन ब्राऊन - ८.०५ कोटी पौंड - द दि विंची कोड, दि लॉस्ट सिम्बॉल

यापैकी जेमी ऑलिव्हर हा पाकशास्त्रावर लिहिणारा लोकप्रिय लेखक आहे. जेमीज् ३० मिनिट्स मील्स (३० मिनिटात जेवण) या पुस्तकाने १० सप्टेंबर ते ६ नोव्हेंबर २०१० या अवधीत ९० हजार प्रतींच्या विक्रीने प्रथम क्रमांक मिळवला. या पुस्तकाच्या आतापर्यंत ३ लाख ६१ हजार प्रती विकल्या गेल्या आहेत. जेमीज् अमेरिका या पुस्तकाने गतवर्षी २ लाख ६९ लाख प्रतींचा टप्पा गाठला होता. चॅनेल ४वर आपल्या पाककृतींचे प्रात्यक्षिक दाखवत असतो.

**ई-बुक्स**

अमेरिकेतील ई-बुक्सची विक्री २०१० सालामध्ये १ बिलियन डॉलर्सपेक्षा जास्त झाली असा प्राथमिक अंदाज आहे. पुढील तीनचार वर्षात हा आकडा तिप्पट व्हावा अशी जाणकारांची अपेक्षा आहे. फॉरेस्टर या संशोधन संस्थेने ४००० लोकांचे सर्वेक्षण करून प्रकाशन व्यवसाचा यात येत्या दशकात आमूलाग्र कायापालट होईल असा इशारा दिला आहे. डिजिटल पुस्तकांकडे गंभीरपणे बघा, नाहीतर प्रकाशन व्यवसाय गुंडाळावा लागेल, डिजिटल प्रकाशनाला पूरक

म्हणून छापील पुस्तकांचे प्रकाशन होऊ लागेल, असाही अंदाज वर्तवला आहे.

मरणोत्तर गाजलेला लेखक स्टिग लार्सन या स्वीडिश लेखकाच्या अकाली निधनानंतर त्याने लिहिलेल्या दि गर्ल वुइथ ए ड्रगन टॅटू, द गर्ल हू किक्ड् दि हॉर्नेट्स नेट आणि द गर्ल हू प्लेड् वुइथ फायर या तीन रहस्यकथांचे प्रकाशन झाले. दि गर्ल वुइथ ए ड्रॅगन टॅटूच्या १२ लाख २८ हजार प्रती विकल्या गेल्या. दि गर्ल हू प्लेड वुइथ फायरच्या १० लाख ४८ हजार प्रती द गर्ल हू किक्ड द हॉर्नेट्स नेस्टच्या ८ लाख ८८ हजार प्रती विकल्या गेल्या. अनेक भाषांमध्ये या पुस्तकांचे अनुवाद झाले. त्यांच्या लॅपटॉपवर आणखी एका थरारकथेची संहिता आहे, असे त्याची प्रेयसी म्हणते आहे, परंतु त्याचे कुटुंबीय त्याबद्दल साशंक आहेत.

ॲमेझॉन को.युके.च्या ग्राहकांच्या पसंतीत 'द गर्ल हू किक्ड दि हॉर्नेट्स नेस्ट'ला अग्रक्रम मिळाला आहे. (जानेवारी ते ऑक्टोबर २०१० या काळातील मागणी तर वन डे डेव्हिड निकोल्स, हॉडर आणि दि हेल्प (कॅथरिन, स्टॉकेट, पेंग्विन), यांचा दुसरा आणि तिसरा क्रम आला.

इंग्लंडमधील ई-बुक विक्रीक्षेत्रात ग्राहकांच्या सर्वाधिक पसंतीचे स्थळ म्हणून ॲमेझान या ऑनलाइन ग्रंथविक्री करणाऱ्या संस्थेने आपले वर्चस्व कायम राखले आहे. फ्युचर बुकने केलेल्या ग्रंथव्यवहाराच्या सर्वेक्षणात सुमारे साठ टक्के ग्राहकांनी ॲमेझॉनकडून एक तरी ई-बुक खरेदी केल्याचे आढळून आले. इ. स. २००९च्या तुलनेत ई-बुक ग्राहकांच्या संख्येत दुपटीने वाढ झाली आणि ८० टक्के ग्राहकांनी ई-बुकच्या स्वरूपातील पुस्तके वाचणे सोयीस्कर असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली. ❒


**वाचकमित्रहो,**

**आपल्या** अखंड प्रेमामुळे **'मेहता मराठी ग्रंथजगत'** हे वाङ्मयीन मासिक चांगलेच लोकप्रिय झाले आहे. या अंकातील 'वाचकांचा प्रतिसाद' या सदरासाठी आपण 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या वाचलेल्या पुस्तकांविषयी प्रतिक्रिया जरुर कळवाव्या.

पत्ता : मेहता पब्लिशिंग हाऊस, द्वारा-मेहता मराठी ग्रंथजगत, १९४१, सदाशिव पेठ, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३०.


**www.mehtapublishinghouse.com**

**आजच भेट द्या. व आपली मागणी नोंदवा.**

# पुस्तक परिचय

## गांधीजींच्या आयुष्यातील अखेरची दोन वर्षे

# लेट्स किल गांधी




**तुषार अ. गांधी** **अनु. अजित ठाकूर**

''जर महात्मा गांधी झाले नसते तर आज मी भारताच्या या संसदेत अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष म्हणून तुमच्यापुढे येऊ शकलो नसतो'' असे उद्‌गार ओबामा यांनी काढले तेव्हा महात्माजींच्या कार्याची व प्रभावाची आंतरराष्ट्रीय प्रचीती आपल्याला परत एकदा आली असेल.

महात्मा गांधी यांच्या हत्येला साठावर वर्षे झाली. तरीही त्यांचे स्मरण आजही ताजे आहे, गांधीजींच्या संदेशाची उपयुक्तता आजही सरलेली नाही याची खात्री पटते.

गांधीजींच्या विषयी आजही जगभर आदरभाव दिसून येतो. त्यांच्यावर देशोदेशी संशोधन, लेखन चालू आहे.

गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगवेगळे पैलू अजूनही आपल्याला आश्चर्यचकित करतात आणि त्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रात विविध व्यक्तींना कार्यप्रवण ठेवण्यासाठी कुठले संमोहन तंत्र वापरले याचे गूढ गडद होत जाते.

गांधीजींच्या सत्यअहिंसेच्या आग्रहाचे, सत्याग्रहाचे, असहकाराचे, आत्मक्लेशाचे, राजकारणातील आध्यात्मिकतेचे मूल्यमापन करणे आजही अवघड वाटते.

'लेट्स किल गांधी' या पुस्तकाचे एक वेगळेपण म्हणजे तुषार अरुण गांधी या महात्मा गांधीजींच्या पणतूने ते लिहिलेले आहे.

आपल्या पणजोबांना त्याने पाहिलेले नव्हते; पण त्यांचे नाव सर्वांच्या तोंडी असते, त्यामुळे त्याला आपले पणजोबा होते तरी कसे याबद्दल कायम कुतूहल वाटत असे.

गांधीजींची हत्या झाली, त्याबद्दलही त्याला अनेक प्रश्न पडत. ही हत्या का झाली? कोणी केली? कशी केली? हत्येचा कट करणाऱ्यांचे पुढे काय झाले? कोणाकोणाला शिक्षा झाली? कोण निर्दोष सुटले?

त्याच अनुषंगाने गांधींच्या हत्येचे याआधी झालेले सात प्रयत्न कसे फसले हेही जाणून घ्यावेसे वाटले.

हिंदुस्थानच्या फाळणीबद्दलही गांधीजींना दोष देण्याचा एका विशिष्ट वर्गाचा प्रयत्न असतो. त्याबाबतही वस्तुस्थिती काय आहे हे तुषार गांधींना समजावून घेण्याची गरज वाटते.

या सर्व बाबींबाबत उपलब्ध कादगपत्रे आणि पुरावे यांच्या आधारे सत्यशोधन करण्याच्या प्रयत्नातून 'लेट्स किल गांधी' या पुस्तकाची निर्मिती झाली आहे.

** गांधींमुळे फाळणी झाली. गांधींनी पाकिस्तानला ५५ कोटी रुपये देणे भारताला भाग पाडले.*

** भारतमातेला वाचवण्यासाठी गांधींना मारणे हाच एक उपाय होता.*

** हिंदूंचे नुकसान होईल अशा गांधींच्या पाकिस्तानधार्जिण्या वृत्तीमुळे चिडून*

*नथूराम गोडसेनी हे कृत्य केले.*

** मुसलमानांना गांधीजी पाठीशी घालत होते.*

** गांधींनी हिंदू निर्वासितांच्या हलाखीकडे डोळेझाक करून फाळणीच्या वेळी भारतात राहिलेल्या मुसलमानांचे लाड केले.*

अशी कारणे गोडसे समर्थकांनी आणि उजव्या विचारसरणीच्या हिंदुत्ववाद्यांनी देऊन गांधींच्या हत्येचे समर्थन करण्याचा प्रकार गेली साठ वर्षे चालू आहे. महाराष्ट्रातील हिंदुत्ववाद्यांमध्ये या मताला पुष्टी देणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे.

पाकिस्तानची जेव्हा कल्पनाही अस्तित्वात नव्हती आणि पाकिस्तानला ५५ कोटी रुपये देण्याचा प्रश्नच उद्भवलेला नव्हता तेव्हा पुण्यात गांधींच्या दिशेने एक बॉंब फेकण्यात आला होता (१९३४). तो चुकून भोपटकरांच्या गाडीवर पडला. गांधींना काही झाले नाही. बॉंब फेकणारा हिंदुत्ववादी अतिरेकी पोलिसांच्या हाती लागला नाही. या घटनेची माहिती श्रीपाद जोशी आणि आचार्य जावडेकर यांच्या पुस्तकात आली आहे. गांधींना या घटनेची माहिती नंतर देण्यात आली. ते म्हणाले, "अशा वेडेपणाच्या कृत्याला सनातनी हिंदू समर्थन देत असतील यावर माझा विश्वासच नाही... लक्षावधी हिंदूंप्रमाणेच माझ्याही धर्मश्रद्धांचे रक्षण करता करता मला हौतात्म्य मिळाले तर तो माझा सन्मानच ठरेल." प्यारेलाल आणि बी. जी. तेंडुलकर यांनीही हिंदू अतिरेक्यांनीच हा बॉंब फेकला होता असे नमूद केलेले आहे.

जुलै १९४४ मध्ये पाचगणीत गांधींविरुद्ध नथुराम गोडसेंनी निदर्शने केली आणि हातात कट्यार घेऊन गांधींकडे धाव घेतली. त्याला भिलारे गुरुजींनी वाटेतच आवरले. मणिभाई पुरोहितांनी त्याच्या हातातून कट्यार काढून त्याला नि:शस्त्र केले.

९ सप्टेंबर १९४४ रोजी सेवाग्राममध्येही नथुराम गोडसे गांधींकडे चालला असताना त्याला आश्रमवासीयांनी अडवले. त्याच्याजवळचा जांबिया काढून घेतला.

२९ जून १९४६ रोजी पुण्याला जाणाऱ्या गांधी स्पेशल गाडीला नेरळ-कर्जत दरम्यान अपघात झाला. रुळावर मोठमोठे दगड ठेवले होते. ३० जूनच्या प्रार्थना सभेत पुण्यात गांधींनी या घटनेचा उल्लेख केला.

तात्पर्य, गांधींना ठार मारण्याची हिंदू अतिरेक्यांची योजना फाळणीच्या खूप आधीपासून शिजत होती.

तुषार गांधी यांनी या ८०० पृष्ठांच्या पुस्तकात गांधीजींच्या जीवनातील अखेरच्या दोन वर्षातील घटनांचा विस्तारपूर्वक मागोवा घेतला आहे.

पहिल्या १६० पृष्ठात गांधींची हत्या, ही हत्या करणाऱ्या व्यक्तींची टोळी, हत्येचा कट, तपासातील गोंधळ, गांधींना पूर्वकल्पना न देता पंडित नेहरू-सरदार पटेल - मौलाना आझाद - आचार्य कृपलानी प्रभृतींनी फाळणीला दिलेला होकार याबद्दलचे तपशील दिलेले आहेत.

भाग २ मध्ये गांधींच्या आयुष्यातील अखेरच्या दोन वर्षातील घटनांचा परामर्श घेतला आहे.

६ मे १९४४ रोजी गांधीजींना कारावासापासून मुक्त करण्यात आले.

९ सप्टेंबर १९४४ रोजी गांधी आणि बॅ. जीना यांची बोलणी सुरू झाली. ती १८ दिवस चालली.

त्यात अनेक बाबींची चर्चा झाली पण कशावरही निर्णायक प्रगती झाली नाही.

१९४५ मध्ये दुसरे महायुद्ध संपले.

२५ जून १९४५ रोजी सिमला परिषद व्हॉइसरॉयच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

ही परिषद राजकीय पक्ष आणि अन्य जातीजमातींच्या प्रतिनिधींची असल्याने, एक सभासद म्हणून गांधींनी तिला हजर राहण्यास नकार दिला. ''मी प्रतिनिधी नाही. त्यामुळे मी परिषदेच्या कामकाजात सहभागी होणार नाही.'' असे म्हटले. मात्र सिमल्यात राहून वेळप्रसंगी सल्ला देण्याचे मान्य केले.

कार्यकारी मंत्रीमंडळाची यादी व्हाइसरॉयनी तयार केली. पण मुस्लीम लीगने आपली यादी दिली नाही. सिमला परिषद अयशस्वी ठरली. जीनांचे वर्तन दुटप्पी होते.

या परिषदेमुळे सवर्ण हिंदू-मुस्लीम समता तत्त्व प्रत्यक्ष राजकारणात मान्य झाले आणि धर्मावर आधारित विभाजनाचे तत्त्व साकारले गेले.

ब्रिटिश सरकारचा इरादा प्रामाणिक नव्हता हेही स्पष्ट झाले.

ब्रिटिश कॅबिनेट मिशनचे सदस्य मार्च १९४६ मध्ये दिल्लीत आले. १८२ बैठकांमध्ये त्यांनी ४७२ नेत्यांची गाठ घेतली.

दुसरी सिमला परिषद ५ मे ते १२ मे या दरम्यान झाली. काँग्रेस व लीग यांच्यात समझोता होऊ शकला नाही. देशाचे विभाजन स्वीकारणे हाच मार्ग उरतो असे स्पष्ट झाले. ''स्वातंत्र्य मिळवण्याची घाई झालेले काँग्रेसचे नेते हे मुस्लीम लीग आणि वसाहतवादी सरकारमधील त्यांचे मित्र यांनी अत्यंत कौशल्याने रचलेल्या सापळ्यात अडकत गेले.'' (१९६)

कॅबिनेट मिशनबरोबरची बोलणी आणि वसाहतवादी प्रशासनाची कारस्थाने यामुळे गांधीजी अस्वस्थ झाले. जे चालले आहे ते ठीक नाही असे त्यांचे अंतर्मन सांगत होते.

वेगवेगळे प्रस्ताव येत राहिले. वाद होत राहिले.

मुस्लीम लीगने पाकिस्तानच्या निर्मितीसाठी धडक कृती दिन म्हणून १६ ऑगस्ट १९४६ हा दिवस साजरा केला.

कोलकाता येथे मुसलमानांचा मोठा मोर्चा निघाला. मुसलमानांचे घोळके रस्त्यावर

येऊन 'लडके लेंगे पाकिस्तान' 'अल्लाहो अकबर' अशा घोषणा देऊ लागले. लुटालूट सुरू झाली. दंगली, मारामाऱ्या... हिंदूंनी दोन दिवसांनी प्रतिकार सुरू केला. कोलकात्याला कत्तलखान्याचे रूप आले. पाच हजार लोक मृत्युमुखी पडले. १५ हजार जखमी झाले. लाखो लोक बेघर झाले. काँग्रेस व ब्रिटिश सरकारवर दडपण आणण्याचा जीनांचा हेतू सफल झाला. जीना म्हणाले, ''मुस्लीम लीग आणि बंगालमधील लीगचे सरकार यांना बदनाम करण्याचे हे हिंदू कारस्थान आहे.'' (२२५). तीन महिने कोलकाता धुमसत होते.

२ सप्टेंबरला काँग्रेसने अंतरिम सरकार बनवले. लीगने बहिष्कार टाकला तरी काँग्रेसच्या मंत्र्यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली.

बंगालमधील नौखालीला १० ऑक्टोबर १९४६ रोजी दंगल सुरू झाली. लुटालूट, जाळपोळ, हत्या, जबरदस्तीने धर्मांतर, स्त्रियांचे अपहरण, पवित्र स्थळांची विटंबना - कायद्याचे राज्य संपुष्टात आले.

६ नोव्हेंबरला महात्मा गांधी आणि त्यांचे शांतता सैनिक नौखालीला गेले. ७७ वर्षांच्या गांधीजींनी अंशत: उपोषण सुरू केले. त्यांना कमालीचा अशक्तपणा आला.

श्रीरामपूर या छोट्या खेड्यात ते गेले. तेथे महिनाभर राहिले. शांतता प्रस्थापित केली.

इकडे दिल्लीत अंतरिम मंत्रीमंडळात सरदार पटेल आणि जवाहरलाल नेहरू यांच्यातील मतभेद वाढत होते.

२ जानेवारी १९४७ रोजी गांधींनी श्रीरामपूरहून मुक्काम हलवला. नंतरच्या २ महिन्यात ४८ गावांना भेटी देऊन एकशे ऐंशी किलोमीटर अनवाणी तुडवले.

व्हाइसरॉय म्हणून लॉर्ड माउंटबॅटन यांना पाठवण्यात आले.

जून १९४८ पूर्वी भारतीय लोकांच्या हातात सत्ता देण्याचा इरादा ब्रिटनचे पंतप्रधान ॲटली यांनी जाहीर केला.

बिहारमध्ये दंगली सुरू झाल्याचे कळल्यावर गांधींनी बिहारमध्ये जाण्याचा निर्णय घेतला.

'बिहारचे हत्याकांड' या प्रकरणात बिहारमधील शांतीयात्रेचा तपशील देण्यात आला आहे.

साडेतीन लाख मुस्लीम बिहारमधून घरेदारे सोडून पळून गेले असे डॉ. महमद यांनी आपल्या अहवालात नमूद केले.

३० मार्च १९४७ रोजी लॉर्ड माउंटबॅटन यांच्या आग्रहावरून गांधी दिल्लीला गेले.

गांधी आणि माउंटबॅटन यांच्यात चर्चेच्या अनेक फैरी झडल्या.

१२ एप्रिलला गांधी पुन्हा बिहारमध्ये परतले. त्यांनी सरदार पटेलांना लिहिले, ''आपल्या दोघांच्या दृष्टिकोनात बराच फरक पडला आहे. देशाचं कल्याण कशात आहे, याबाबत माझं कर्तव्य काय याचाच विचार मी करतो आहे.'' एकूण परिस्थितीत

काही क्रांतिकारक बदल घडल्याशिवाय भारताचे विभाजन अटळ आहे हे त्यांना स्पष्ट दिसत होते.

२९ एप्रिल १९४७ रोजी गांधींजी पुन्हा दिल्लीला गेले.

फाळणी म्हणजे डोके दुखते म्हणून डोकेच उडवण्याची तयारी दर्शवणे असे त्यांना वाटले. देशातील परिस्थिती जास्तच बिघडत चालली होती.

काँग्रेसने फाळणीचा ठराव मंजूर केला. गांधी केवळ एक मूक प्रेक्षक म्हणून बघत राहिले. (३२७) पण तरीही फाळणी टाळायचे त्यांचे प्रयत्न चालू राहिले. ''ब्रिटिशांनी देश सोडून जावे, हिंदुस्थानला संपूर्ण स्वातंत्र्य द्यावे. ब्रिटिश गेल्यावर आम्ही आमचे प्रश्न सुसंवादाने सोडवू. शांततेसाठी फाळणीची किंमत देणे योग्य नाही.'' हा त्यांचा युक्तिवाद काँग्रेसपक्ष, व्हाइसरॉय व ब्रिटिश सरकारला रुचला नाही. गांधीजी एकाकी पडले.

माउंटबॅटनला ८ मे रोजी पत्र पाठवून त्यांनी ९ मुद्दे मांडले.

१. भारताच्या विभाजनाच्या निर्णयाला सहभागी होणे ही ब्रिटिशांची चूक ठरेल.
२. काँग्रेस वा मुस्लीम लीग यांनी निवडलेल्या लोकांतून अंतरिम सरकार स्थापन व्हावे.
३. या क्षणी वायव्य सरहद्द प्रांतात मतदान घेणे धोक्याचे ठरेल.
४. पंजाब आणि बंगालचे विभाजन करणे त्रासदायक ठरेल. ब्रिटिश गेल्यावर ते जरूर तर करता येईल. आधी नाही.
५. नौदल प्रमुख म्हणून असणारा माउंटबॅटन यांचा अनुभव या ठिकाणी पुरेसा नाही. एकनिष्ठता व विचारांची स्पष्टता आज हवी आहे.
६. संस्थानांसह संपूर्ण भारताचा कारभार एका पक्षाकडे दिला तरच भारतातले अराजक आणि अशांतता टळू शकेल. मुस्लीम लीग प्रतिनिधित्व करीत नसलेल्या भागांचे व काही संस्थांचे प्रशासन घटना समितीने पहावे.
७. पंजाब-बंगालचे विभाजन करू नये याचा अर्थ अल्पसंख्याकांकडे दुर्लक्ष करणे असा नाही.
८. संस्थानिक विश्वस्त आहेत. सार्वभौम नाहीत. भारतीय प्रजासत्ताकाचेच ते अविभाज्य घटक असतील.
९. प्रशासकीय सेवांनी पक्षपात करता कामा नये. जातीयता जोपासता कामा नये. जनसेवेची वृत्ती स्वीकारायला हवी.

बंगालच्या सार्वभौमत्वाची कल्पना गांधींना आश्वासक वाटली. परंतु डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांना फाळणीच पसंत होती. बंगाल सार्वभौम म्हणजे स्वतंत्र झाला तर आसाम भारतापासून तुटून पडेल, त्याचे अस्तित्व धोक्यात येईल अशी भीती आसामचे मुख्यमंत्री गोपीनाथ बोर्डोलोई यांनी व्यक्त केली.

दि. २४ मे १९४७ रोजी गांधींनी म्हटले, ''काँग्रेसने फाळणीला जवळजवळ हो म्हटलेच आहे. आयुष्यभर मी लढवय्या म्हणून वावरलो. आता मात्र एक हरलेली लढाई लढण्यासाठी मी दिल्लीला जात आहे.'' (३४६)

दि. २६ मे रोजी प्रार्थना सभेत ते म्हणाले, ''जोपर्यंत ब्रिटिश लोक भारतात आहेत तोपर्यंत आपण सुसंगत विचार करू शकत नाही. भारताचा आकार बदलणे हे ब्रिटिशांचे काम नाही. आश्वासन दिल्याप्रमाणे त्यांनी येथून निघून जावे. ब्रिटिश गेल्यावर भारत एकसंध राखू किंवा दोन वा अधिक भागात आपल्या इच्छेने विभाजन करू.''(३४८)

दि. २ जून रोजी व्हाइसरॉयनी लंडनहून आणलेली भारताच्या विभाजनाची योजना जाहीर केली.

या प्रस्तावात जीना व मुस्लीम लीग बदल करणार नाहीत या अटींवर त्याला काँग्रेसने मान्यता दिली.

१२ जुलै रोजी ब्रिटिश लोकसभेने भारतीय स्वातंत्र्याचा ठराव संमत केला.

१५ ऑगस्ट ही भारतीय स्वातंत्र्याची तारीख ठरली.

गांधीजी त्या दिवशी कोलकाता येथे होते. प्रार्थनेसाठी ३० हजार लोक जमले होते. १६ ऑगस्टला ५० हजार तर १७ ऑगस्टला १ लाख लोक होते. पण गांधींच्या अंतर्मनाला कुठेतरी गडबड आहे असे जाणवत होते. ''लोकांच्या गर्दीत आनंद दिसत होता. अजून समाधान वाटत नाही. माझ्यातच काही कमी आहे का? हिंदू-मुस्लीम एकी अशी अचानक व्हावी हे खरंच वाटत नाही. काळच काय ते सांगेल.'' (३९०) असे गांधींनी मीराबेनला लिहिले.

बंगाल, पंजाबमध्ये हिंसाचाराला ऊत आला होता. हल्लेखोरांचा धुमाकूळ चालू होता. निर्वासितांचे लोंढे इकडून-तिकडे येत-जात होते.

दिल्लीत १८ सप्टेंबरला गांधींनी म्हटले, ''जर मुस्लीमांनी आपलं अंत:करण शुद्ध केलं नाही तर माझ्या येथे राहण्याचा काही उपयोग नाही. हृदयपरिवर्तनाचे नाटक करून स्वत:चीच फसवणूक करू नका.'' (४२७)

या काळातले गांधी एकाकी पडलेले दिसतात. मृत्यूचा उल्लेख ते वरचेवर करतात.

फाळणी झाली. दोन देश झाले. पण हिंदू आणि मुस्लीम हे दोन देश नाहीत. ते मित्र व बंधू म्हणून एकत्र राहायला हवेत असे गांधींचे प्रतिपादन सुरूच होते. (४३५)

जुनागड, काश्मीर प्रश्न या काळात ज्वलंत होता.

काश्मीर प्रश्न यूनोकडे जाणे गांधींना अनर्थसूचक वाटत होते. यूनो पाकला आक्रमक म्हणायला तयार नव्हते.

मंत्रीमंडळातही ताणतणाव होते. नेहरू-सरदार पटेल यांचे दृष्टिकोन भिन्न भिन्न होते. ते प्रत्येक प्रश्नाबाबत ताण निर्माण करीत. या दोघांमधील मतभेदांचे पाकिस्तान भांडवल करील अशी भीती गांधींना वाटे.

फाळणीच्या वेळी झालेल्या द्विपक्षीय कराराप्रमाणे भारताने पाकिस्तानला एकूण ७५ कोटी रुपये द्यायचे होते. वीस कोटी दिले होते. उरलेल्या ५५ कोटींची मागणी पाक करीत होते. दोन देशातील सर्व प्रश्न सुटल्याशिवाय ही रक्कम देणार नाही असे नेहरूंनी म्हटले तेव्हा पाकने आक्रमक भूमिका घेऊन हे विधान म्हणजे पाकवर हल्ला आहे असे जाहीर केले. (४६०)

६ जानेवारीला गांधींनी म्हटले, फाळणीला मान्यता देऊन एक पाप आधीच झाले आहे. नैतिक जबाबदारी असताना करार अमान्य केल्याने या पापाचे ओझे अधिकच वाढेल. ''कायद्याप्रमाणे जे करणे आवश्यक आहे आणि कायदा सांगेल त्या पलीकडे जाऊन भारताने काही करावे असा माझा आग्रह नाही.''

माउंटबॅटननी गांधींना सांगितले, पाकने मागितलेली रक्कम थांबवून ठेवली तर ते चुकीने पाऊल ठरेल.''

अखेरच्या दोन वर्षातील गांधींच्या आयुष्यातील घटनांचे, वक्तव्यांचे, घालमेलीचे थोडक्यात पण साक्षेपी संकलन तुषार गांधी यांनी या पुस्तकात केले आहे. ते फारच मर्मभेदक आणि अंतर्मुख करणारे आहे.

पुस्तकाच्या तिसऱ्या भागात गांधींच्या हत्येच्या खटल्याची विस्तृत हकीकत देण्यात आली आहे. निकालावरचे अपील आणि शिक्षेची अंमलबजावणी याची माहिती दिली आहे.

१२ ऑक्टोबर १९६४ रोजी गोपाळ गोडसे, विष्णू करकरे, मदनलाल पाहवा यांची तुरुंगातून मुक्तता झाली. या सुटकेचा आनंद व्यक्त करण्यासाठी पुण्यात उद्यान मंगल कार्यालयात सत्यविनायक पूजा आयोजित केली गेली. सुमारे २०० लोक तिला उपस्थित होते. तेथे केसरीचे माजी संपादक ग. वि. केतकर हिंदू महासभेचे प्रचारक या नात्याने अध्यक्षपदावरून बोलताना म्हणाले, ''गांधींचा वध करण्याच्या कटाची मला आधीपासून माहिती होती. गांधींवरील २० जानेवारीच्या बॉंब हल्ल्यानंतर बडगे मला भेटला होता. गोडसे, आपटे, करकरे आणि बडगे यांचा या हल्ल्यात भाग होता. गांधींना मारण्याचीच त्यांची योजना होती. आपटे आणि गोडसे गांधींना मारायला पुन्हा जाणार होते असे बडगेने मला सांगितले.''

या भाषणाच्या बातम्या सर्वत्र छापून आल्या. गोपाळ गोडसे, केतकर वगैरेंना तुरुंगात टाकण्यात आले.

२१ नोव्हेंबर १९६६ रोजी न्यायमूर्ती जे. एल. कपूर आयोगाकडे यासंबंधी

चौकशी करण्याचे काम सोपविण्यात आले.

या आयोगाने १०१ साक्षीदार तपासले. १६२ दिवस एकूण तपासणीला लागले.

अहवाल सहा खंडात प्रसिद्ध झाला. (३० सप्टेंबर १९६९)

त्याची रूपरेखा कपूर कमिशन या प्रकरणात देण्यात आली आहे. (६४८-८०३)

निष्कर्ष - १) केतकरांना ऑक्टोबर-नोव्हेंबर १९४७ मध्ये महात्मा गांधी यांच्या जीवाला धोका आहे याची माहिती होती. बडगेने २३ जानेवारी १९४८ रोजी त्यांना नथुरामच्या कटाची कल्पना केतकरांना दिली होती.

२) केतकरांनी कटाची माहिती सरकारी अधिकाऱ्यांना दिली नाही. बाळूकाका कानिटकरांमार्फत मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांच्यापर्यंत ही माहिती सरकारकडे पोचवली नाही.

३) बाळासाहेब खेर यांनी बाळूकाकांनी दिलेल्या माहितीची कल्पना सरदार पटेलांना दिल्याची नोंद कुठेही आढळत नाही. मोरारजींकडून अशी माहिती पटेलांना मिळाली असावी. त्यांनी राज्य सरकारला कळवले होते. मदनलालच्या चौकशीत पोलिसांनी व्यावसायिक कौशल्य दाखविले नाही. मदनलालच्या जबानीचे विश्लेषण केले गेले नाही. काँग्रेस सरकारला त्यावेळी व्यक्तिस्वातंत्र्याबाबत पोलिसांनी हस्तक्षेप करण्याची गरज जाणवलेली नव्हती. एखाद्या व्यक्तीवर कायम पाळत ठेवणे सरकारला शक्य नव्हते.

या पुस्तकाच्या माध्यमातून भारताची फाळणी आणि गांधीजींची शेवटची दोन वर्षे यांच्यावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

भारत, पाकिस्तान आणि बांगलादेश हे एकत्र यावेत हे गांधींचे स्वप्न होते.

भारताला रा. स्व. संघाच्या किंवा हिंदू महासभेच्या हिंदू राष्ट्र या संकल्पनेची गरज नाही. या देशाला पुन्हा फाळणी होऊ नये असे तुषार गांधी स्पष्ट करतात.

तुषार गांधी यांनी गांधी राष्ट्रीय स्मारकात ठेवलेले, गोडसेने वापरलेले ९ मिमीचे बरेटा पिस्तूल हातात घेऊन पाहिले. त्यावेळी त्यांच्या शरीरात प्रचंड क्षोभ उसळला. ते लिहितात, ''त्याक्षणी एखाद्या संघवाल्याचा खूनही मी केला असता.''

हे पुस्तक म्हणजे दीर्घकाल माझ्या मनात दडलेल्या रागाचा उद्रेक आहे, असेही ते म्हणतात.

गांधींच्या विषयी राग किंवा लोभ असणाऱ्या सर्वांनाच हे पुस्तक वाचावेसे वाटेल.

**किंमत : ६९५रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : ४०रु.**

## मेहता पब्लिशिंग हाऊस
## २०१० प्रकाशित झालेल्या पुस्तकांची यादी

| पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| **कादंबरी** | | |
| **प्रस्थान** | रेखा बैजल | १५०/- |
| **द ॲटर्नी :** स्टीव्ह मार्टिनी | अनु. अजित ठाकूर | ३५०/- |
| **क्रायसिस :** रॉबिन कुक | अनु.डॉ. प्रमोद जोगळेकर | ३५०/- |
| **जॅपनीज ऑर्किड :** रेई किमुरा | अनु. स्नेहल जोशी | २००/- |
| **शांताराम :** ग्रेगरी डेव्हिड रॉबर्ट्स | अनु. अपर्णा वेलणकर | ९९०/- |
| **द फकीर :** रुझबेह एन. भरूचा | अनु. सुनीति काणे | १८०/- |
| **वन शॉट :** ली चाइल्ड | अनु. बाळ भागवत | ३४०/- |
| **गर्ल्स ऑफ रियाध :** रजा अल्सानिया | अनु. स्नेहल जोशी | २६०/- |
| **द फर्म :** जॉन ग्रिशॅम | अनु. अनिल काळे | ४४०/- |
| **जिना :** हिंदुस्थान-फाळणी-स्वातंत्र्य जसवंत सिंग | अनु. अशोक पाध्ये | ५००/- |
| **नेक्स्ट :** मायकेल क्रायटन | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ४००/- |
| **अरुणाची गोष्ट :** पिंकी विराणी | अनु. मीना कर्णिक | १८०/- |
| **द बॉय इन द स्ट्राइप्ड पायजमाज् :** जॉन बायेन | अनु. मुक्ता देशपांडे | १२०/- |
| **पिरॅमिड :** टॉम मार्टिन | अनु. उदय भिडे | ३००/- |
| **उद्ध्वस्त** | उमेश कदम | १५०/- |
| **सीविच :** ॲलिस्टर मॅक्लान | अनु. अशोक पाध्ये | २४०/- |
| **आवा मारू :** टायटॅनिक ऑफ जपान : रेई किमुरा | अनु. चारुलता पाटील | २००/- |
| **सूड** | नितीन बापट | ८०/- |
| **आदिपर्व** | डॉ. प्रमिला जरग | ३००/- |
| **माय कझिन रेशेल** : डॅफने द्यू मोरियेर | अनु. स्नेहल जोशी | ३००/- |
| **बर्न्ट शॅडोज :** कमिला शामसी | अनु. रेश्मा कुलकर्णी | ३२०/- |
| **ए थाऊजंड स्प्लेन्डीड सन्स :** खालिद हुसैनी | अनु. मधुकर प्रधान | ३२०/- |
| **कथासंग्रह** | | |
| **कुरुक्षेत्रानंतर :** महाश्वेतादवी | अनु. वर्षा काळे | ६०/- |

| | | |
|---|---|---|
| **भेटीगाठी** | शंकर पाटील | ११०/- |
| **खुश खरेदी** | शंकर पाटील | १००/- |
| **पाऊलवाटा** | शंकर पाटील | १००/- |
| **श्रीगणेशा** | शंकर पाटील | १२०/- |
| **गारवेल** | शंकर पाटील | १३०/- |
| **नष्टनीड :** रवींद्रनाथ टागोर | अनु. नीलिमा भावे | १४०/- |
| **तरुणांनो होशियार!** | निरंजन घाटे | १००/- |
| **ज्याचं करावं भलं...** | निरंजन घाटे | १००/- |
| **रोबॉट फिक्सिंग** | निरंजन घाटे | १३०/- |

## आत्मकथन

| | | |
|---|---|---|
| **कॅच मी इफ यू कॅन :** फ्रँक अबॅग्नेल/स्टॅन रेडिंग | अनु. ज्योत्स्ना लेले | २००/- |
| **मॅन, इंटरप्टेड :** जेम्स बेली | अनु. विदुला टोकेकर | १८०/- |
| **सर्कल ऑफ लाइट :** किरणजीत अहलुवालिया, राहिला गुप्ता | अनु. उषा महाजन | ३५०/- |
| **द रोड ऑफ लॉस्ट इनोसन्स :** सोमाली माम | अनु. भारती पांडे | १६०/- |
| **स्लमगर्ल ड्रीमिंग :** रुबिना अली | अनु. मैत्रेयी जोशी | १२०/- |
| **मना सर्जना** | डॉ. अनिल गांधी | २००/- |
| **उधाण वारा :** तसलिमा नासरिन | अनु. विलास गीते | ४००/- |
| **गो किस द वर्ल्ड :** सुब्रतो बागचा | अनु. सुनीति काणे | १५०/- |
| **पानगळीच्या आठवणी** | शोभा चित्रे | २००/- |
| **द डाइव्हिंग बेल अॅण्ड द बटर फ्लाय** : जीन - डोमिनिक बॉबी | डॉ. धरणीधर रत्नाळीकर | ९०/- |

## चरित्रे

| | | |
|---|---|---|
| **थेंबभर पाणी अनंत आकाश** | सुरेखा शहा | २८०/- |
| **रुसी मोदी :** द मॅन हू ऑल्सो मेड स्टील पार्थ मुखर्जी, ज्योती सबरवाल | अनु. अंजनी नरवणे | २००/- |

## राजकीय

| | | |
|---|---|---|
| **द पार्लमेन्टरी सिस्टिम :** अरुण शौरी | अनु. अशोक पाथरकर | २२०/- |
| **'लेट्स किल गांधी!' :** तुषार अ. गांधी | अनु. अजित ठाकूर | ६९५/- |
| **वाळवीग्रस्त वृक्षाला पोलादी कुंपण वाचवेल का? :** अरुण शौरी | अनु.कॅ.राजा लिमये | ४५०/- |

| | | |
|---|---|---|
| **मार्गदर्शनपर** | | |
| **चार जबरदस्त फंडे** | संजीव परळीकर | ७०/- |
| **व्यक्तिमत्त्व विकसन** | | |
| **जगप्रसिद्ध व्हा!** | डॉ. अरुणा कौलगुड | १८०/- |
| **ललित लेख** | | |
| **जन्मठेप** | गिरिजा कीर | १५०/- |
| **सत्यकथा** | | |
| **कोल्ड स्टील :** टीम बुके, बायरॉन उसी | अनु. सुभाष जोशी | ३००/- |
| **संकलित प्रवचने** | | |
| **मीरेच्या प्रेमतीर्थावर :** ओशो | अनु. स्वाती चांदोरकर | १५०/- |
| **मीरा एक वसंत आहे :** ओशो | अनु. स्वाती चांदोरकर | १५०/- |
| **मीरेची मधुशाला :** ओशो | अनु. स्वाती चांदोरकर | १५०/- |
| **मीरा श्यामरंगी रंगली :** ओशो | अनु. स्वाती चांदोरकर | १५०/- |
| **शिवसूत्र भाग १ :** ओशो | अनु. डॉ. वृषाली पटवर्धन | १५०/- |
| **शिवसूत्र भाग २ :** ओशो | अनु. डॉ. वृषाली पटवर्धन | १५०/- |
| **संकलित व्याख्याने** | | |
| **अ बेटर इंडिया अ बेटर वर्ल्ड :** एन.आर. नारायण मूर्ती | अनु. चित्रा वाळिंबे | २५०/- |
| **पाकशास्त्र** | | |
| **केक्स** | अपर्णा परचुरे | १५०/- |
| **चिकन सूप मालिका** | | |
| **चिकन सूप फॉर द कपल्स सोल :** जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन, मार्क अॅण्ड क्रिसी डोनेली आणि बार्बरा डी एन्जेलिस | अनु. अवंती महाजन | १६०/- |
| **चिकन सूप फॉर द सिस्टर्स सोल :** : जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन, पॅटी आणि नॅन्सी मिचेल, हेदर आणि केटी मॅकनमारा | अनु. सुनीति काणे | २५०/- |
| **चला जाणून घेऊ या! मालिका** | | |
| **प्रार्थना :** जे.पी.वासवानी | अनु. अपर्णा देशपांडे | ४०/- |
| **उच्च रक्तदाब :** डॉ. सावित्री रामय्या | अनु. डॉ. मुग्धा गोखले | ४०/- |
| **हार्ट अटॅक :** डॉ. सावित्री रामय्या | अनु. ज्योतिका चितळे | ५०/- |

| | | |
|---|---|---|
| **पोषक आहार :** डॉ. सावित्री रामय्या | अनु. स्वाती शहा | ४०/- |
| **स्वयंप्रेरणा :** विकास मलकानी | अनु. मीना टाकळकर | ५०/- |
| **आयुर्वेदाद्वारे आहार आणि आरोग्य** | अनु. ज्योतिका चितळे | ५०/- |
| **बद्धकोष्ठता :** डॉ. सावित्री रामय्या | अनु. डॉ. मुग्धा गोखले | ४०/- |
| **रिलॅक्सेशन :** विकास मलकानी | अनु. मीना टाकळकर | ५०/- |
| **शाकाहार :** आर. एन. लखोटिया | अनु. स्वाती शहा | ४०/- |

**नाटक**

| | | |
|---|---|---|
| **कथा अकलेच्या कांद्याची** | शंकर पाटील | ७०/- |

**आरोग्य-माहितीपर**

| | | |
|---|---|---|
| **उष्ण जलोपचार :** डॉ. पॅट्रिक होरे डेव्हिड हार्प | अनु. सुभाष जोशी | १२०/- |
| **अन्नपुराण :** आयुर्वेदिक आधुनिक | डॉ. अरविंद लिमये | ३५०/- |

**वैज्ञानिक लेख**

| | | |
|---|---|---|
| **विज्ञानातील सरस आणि सुरस** | राहुल गोखले | १८०/- |
| **सुगरणीचं विज्ञान** | डॉ. बाळ फोंडके | १८०/- |

**विज्ञानकथासंग्रह**

| | | |
|---|---|---|
| **स्वप्नचौर्य** | निरंजन घाटे | १२०/- |
| **अश्मजीव** | डॉ. संजय ढोले | १९०/- |

## T बुक क्लब १९

सभासद फी ५०रु. आजच सभासद व्हा!

**टी बुक क्लब १९ मधून प्रकाशित झालेली पुस्तके**

| पुस्तकाचे नाव | मूळ लेखक | अनुवाद | किंमत |
|---|---|---|---|
| पिरॅमिड | टॉम मार्टीन | अनु. उदय भिडे | ३०० |
| सीविच | ॲलिस्टर मॅक्लीन | अनु. अशोक पाध्ये | २४० |
| नथिंग टू लूज | ली चाइल्ड | अनु. उदय कुलकर्णी | ३५० |
| डिजिटल फॉर्ट्रेस | डॅन ब्राऊन | अनु. अशोक पाध्ये | ४४० |

**टी बुक क्लब १९ मधून प्रकाशित होणारी पुस्तके**

| | | | |
|---|---|---|---|
| द असोशिएट | जॉन ग्रिशॅम | अनु. अशोक पाथरकर | ३०० |
| द गिफ्ट ऑफ रेन | टॅन ट्वॅन इंग | अनु. अशोक पाथरकर | ४०० |

वाचकांनी आपली सभासद फी (५०रु.) डी.डी. अथवा मनीऑर्डरने 'मेहता पब्लिशिंग हाऊस' येथे पाठवावी.

## MEHTA PUBLISHING HOUSE


Fiction & Non-Fiction Books In English

| | | Price |
|---|---|---|
| An Introduction to Linguistic Theories | S. V. Shastri/ L. M. Goud | 90 |
| Untouchable | Mulk Raj Anand | 60 |
| Two on a Tower | Thomas Hardy | 100 |
| Plenty For All | S. A. Dabholkar | 400 |
| Indian English Poems | Edited by Dr. Shirish Chindhade | 50 |
| Selected English Essays | Edited by Dr. Shirish Chindhade | 50 |
| Glimpses of Changing Banking Scenario | P.N. Joshi | 300 |
| The Breadwinner (Fiction) | Deborah Ellis | 120 |
| Parvana's Journey (Fiction) | Deborah Ellis | 120 |
| Mud city (Fiction) | Deborah Ellis | 120 |
| Salt & Honey (Fiction) | Candi Miller | 200 |
| Call Centre - An inside story (Fiction) | Vikrant Shukla | 250 |
| The Myth Called Wealth (Non Fiction) | Rajesh Wattamwar | 150 |
| Master your Mind (Mental Health Guide) | Dr. Neel Burton | 200 |
| The Meaning of Madness (Mental Health Guide) | Dr. Neel Burton | 225 |
| Plato's Shadow (Philosophy) | Dr. Neel Burton | 250 |
| Cancer Care and Mysteries and Yoga (Health and Medicine) | Dr. Nitin Unkule | 295 |
| Japanese Magnolia (Fiction) | Rei Kimura | 299 |
| Japanese Orchid (Fiction) | Rei Kimura | 249 |
| 50 Years of Silence (Memoir) | Jan Ruff-O'Herne | 275 |
| Awa Maru - Titanic of Japan (Fiction) | Rei Kimura | 149 |
| Speeches that Reshaped the World (Reference) | Alan J. Whiticker | 300 |
| Speeches of War and Peace (Reference) | Larry Buttrose | 300 |
| One Foot Wrong (Fiction) | Sofie Laguna | in print |
| Never to Return (Non Fiction) | Sandy Reid | in print |
| Schapelle (Biography) | Tony Wilson | in print |

## पुस्तक परिचय

### भारतीय लोकशाही प्रणालीचे विकृतीकरण होण्याचा धोका टाळण्यासाठी कुठली पथ्ये पाळायला हवी?

# द पार्लमेन्टरी सिस्टिम




**अरुण शौरी** **अनु. अशोक पाथरकर**

'द पार्लमेंटरी सिस्टिम' हे ख्यातनाम पत्रकार अरुण शौरी यांचे एकविसावे पुस्तक. भारतीय लोकशाहीच्या संदर्भात संसदेच्या कार्यप्रणालीची जी भूमिका अपेक्षित आहे तिचे घटनाकारांना अपेक्षित असलेले आदर्शवादी स्वरूप आणि गेल्या साठ वर्षात, विशेषत: आणीबाणीनंतरच्या काळात तिचे झालेले अवमूल्यन याची सर्वंकष चिकित्सा करणारे हे पुस्तक अरुण शौरी यांच्या मनातील अस्वस्थतेचे प्रतीक आहे.

एक भारतीय नागरिक म्हणून पत्रकार-संपादक म्हणून संसद सदस्य म्हणून आणि लोकशाही प्रणाली हे मूल्य मानणारा विचारवंत म्हणून अरुण शौरी यांना सद्य:कालीन राजकीय वास्तवातले विकृतीकरण आणि भरकटलेपण खटकते, संसदीय प्रणालीबरोबरच नोकरशाही आणि न्यायसंस्था यांनाही त्यामुळे अवकळा आल्याचे दिसून येते आणि या संस्थांचे पावित्र्य आणि महत्त्व पुन:प्रस्थापित होणे गरजेचे आहे असे जाणवते म्हणून ते संभाव्य धोक्याबद्दल इशारा देऊ पाहतात.

अरुण शौरी हे या दृष्टीने भारतीय लोकशाही, संसदीय राज्यप्रणाली, न्यायसंस्था, कार्यक्षम ब्युरॉक्रसी याबद्दल आदरआकांक्षा बाळगणाऱ्या प्रत्येक सुजाण नागरिकाचे प्रतिनिधी आहेत असे वाटते. त्यांनी केलेले भारतीय राज्यप्रणालीच्या समकालीन अधोगतीचे निदान आणि त्या संदर्भात करता येण्यासारखी उपाययोजना यांचे विवेचन मूलगामी आणि 'विधायक' आहे असे म्हणायला हरकत नाही. इंडियन एक्सप्रेस, दि टाइम्स ऑफ इंडिया यांचे संपादक, प्लॅनिंग कमिशनचे सदस्य, वाजपेयी मंत्रीमंडळातले दळणवळण, माहितीतंत्रज्ञान व निर्गुंतवणूक मंत्री म्हणून त्यांनी काम केले. त्यामुळे शासनप्रणालीच्या कामकाजाची त्यांना जवळून माहिती आहे. साहजिकच त्यांचे विचार केवळ ॲकॅडमिक पातळीवरच रेंगाळत राहिलेले नाहीत. ते तसे आदर्शवादी आहेत; परंतु व्यवहाराची जाणही त्यांना आहे. त्यामुळे एक राजकीय विश्लेषक म्हणून त्यांचे स्थान मोठे आहे.

'द पार्लमेंटरी सिस्टिम' मध्ये ते एक अवघड विचारव्यूह अगदी सोप्या रीतीने मांडतात.

या दृष्टीने पुस्तकाची प्रस्तावना वाचण्यासारखी आहे.

त्यांच्या मते भारतात आज दोन पातळ्यांवर दोन प्रकारच्या स्पर्धा चालू आहेत.

एका स्पर्धेत एका बाजूला अमाप ऊर्जा असणारा प्रगतिशील, सर्जनशील समाज आहे तर दुसऱ्या बाजूला भ्रष्टाचाराने आणि अकार्यक्षमतेने पोखरलेला शासनाचा डोलारा आहे.

दुसऱ्या स्पर्धेत एका बाजूला नवा समृद्ध भारत घडविणारे उद्योजक, तंत्रज्ञ आणि मध्यमवर्गीय व्यावसायिक लोक आहेत, तर दुसऱ्या बाजूला आपली सत्ताकेंद्रे टिकवण्यासाठी, जातीयवादाचे विष फैलावत जुन्या परंपरांचे स्तोम माजवणारे

राजकीय लोक आहेत.

या स्पर्धेचे दोन परिणाम संभवतात.

एक, शासन व्यवस्था अधोगतीला जात राहील आणि उत्तर प्रदेश किंवा बिहारसारखी अनागोंदी देशभर निर्माण होऊन भारताच्या आर्थिक प्रगतीचा आलेख घसरणीला लागेल.

दोन, बिघडत चाललेल्या शासनव्यवस्थेमुळे निर्माण होणाऱ्या अडचणींनी संत्रस्त झालेले उद्योजक राज्यकर्त्यांवर दबाव आणून शासनात सुधारणा घडवून आणण्यास भाग पाडतील आणि अर्थव्यवस्थेला गतिमान करतील.

उद्योगक्षेत्रात दररोज नवे नेते उदयाला येत आहेत, ते नवे तंत्रज्ञान आणत आहेत, नवे प्रयोग करीत आहेत. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था झपाट्याने प्रगती करीत आहे. भारत ही आर्थिक महासत्ता होण्याच्या मार्गावर आहे. अनेक उद्योजक दूरदूरच्या देशांमध्ये आपला व्याप वाढवत आहेत. परदेशी कंपन्या काबीज करीत आहेत. विश्वात्मकतेची स्वप्ने बघत आहेत.

सार्वजनिक क्षेत्रात दुय्यम दर्जाचे नोकरशहा आणि गुन्हेगारी पार्श्वभूमी असणारे राजकारणी यांची युती होऊन एकूणच सिस्टिम भ्रष्टाचाराने पोखरली जात आहेत. 'कॉमनवेल्थ गेम'च्या अयोजनातले भ्रष्टाचाराचे भयावह तपशील हे या अभद्र युतीचे एक उदाहरण आहे. 'आदर्श' गृहनिर्माण प्रकल्पात लष्करातील अधिकारी, नोकरशहा आणि राज्यकर्ते यांनी एकत्र येऊन सगळ्या नीतिमूल्यांची पायमल्ली करणे किती सहज जमते ते दाखवून दिले आहे. जातीयवाद, भाषावाद, धर्मपंथ, प्रादेशिक अस्मिता यांच्या भांडवलावर अनेक राजकारण्यांचे गटबाजीचे, दडपशाहीचे, दहशतीचे राजकारण चालू असते. आताच्या निवडणुकीमध्ये उमेदवार किती पैसा ओतू शकतो, कोणत्या जातीची मते मिळवू शकतो याचाही विचार महत्त्वाचा ठरतो. अनेक उमेदवार गुंडांची व माफियांची मदत घेतात. पैसा, जात, गुन्हेगारी यांचा प्रभाव फार जाणवतो.

निवडणुकीच्या या पद्धतीचा परिणाम संसदेच्या स्वरूपावर होतो.

अरुण शौरी संसदीय संरचनेचे काही विशेष नोंदवतात.

१. सध्याच्या संसदीय प्रणालीमुळे व तिच्यातून निर्माण झालेल्या निवडणूक पद्धतीमुळे मतदारांचे विभाजन होते. शंभर कोटी लोकांचा कारभार बघण्याची क्षमता असणारी, सचोटी व निष्ठा असणारी, नि:स्पृह माणसे संसदेत येत नाहीत.

२. शासनाशी संबंधित ज्या समस्यांना आपल्याला तोंड द्यावे लागते, त्यांचे मूळ आपल्या विधिमंडळामध्ये आहे. त्यामुळे विधिमंडळांची भूमिका आणि प्रभाव कमी करण्याचे उपाय शोधायला हवेत.

३. शासनात चारित्र्यवान, नि:स्पृह, जाणकार माणसे येण्यासाठी उपाय योजायला

हवेत.

४. विधिमंडळाच्या तुलनेत प्रशासन जास्त प्रभावी व कार्यक्षम व्हावे.

५. विधिमंडळांशिवाय इतर संस्थांच्या माध्यमातून उत्तरदायित्व (अकाउंटॅबिलिटी) प्रस्थापित करावी.

६. न्यायसंस्थेची भूमिका आणि अधिकार वाढवावे.

७. प्रशासनव्यवस्था, तिचे नियंत्रण करणारी विधिमंडळे, त्यांना असलेला धोका, आपण सार्वभौम असल्याचा दावा लक्षात घेता बेसिक स्ट्रक्चरची संरक्षक भिंत आवश्यक आहे.

८. त्यासाठी विधिमंडळाचे अधिकार व भूमिका कमी कराव्यात. प्रशासनाचे अधिकार वाढवावे, मूलभूत रचनेची तटबंदी व न्यायसंस्थेचे अधिकार अधिक व्यापक करावे. न्यायाधीशांनी आपल्याला देण्यात आलेल्या स्वातंत्र्याचा वापर नि:पक्षपातीपणाने करावा.

अरुण शौरी अशा सुधारणा सुचवतात खऱ्या, पण त्या सुधारणा होणे अवघड असल्याचेही ते मान्य करतात. कारण या सुधारणा करण्यासाठी सध्याच्या राज्यकर्त्यांना प्रवृत्त कसे करावे असा प्रश्न आहे. प्रचलित व्यवस्थेचा फायदा त्यांना होतो, तो फायदा सुखासुखी सोडायला ते कसे तयार होणार? त्यांच्यावर जनता दबाव आणू शकते, पण जनता तेवढी संघटित होऊ शकत नाही. खुल्या समाजामध्ये जोरदार खुली चर्चा होण्याची गरज असते; परंतु ती होऊ शकत नाही. राजकारणी व्यक्ती जी उथळ मते मांडतात तीच वृत्तपत्रात येतात. उद्योगपतींच्या संघटना म्हणजे सत्ताधीशांच्या इव्हेंट मॅनेजर बनल्या आहेत असे शौरी म्हणतात.

प्रशासनाची पातळी सध्या खूपच खालावलेली आहे. प्रभावशाली लोकांनाही त्यामुळे झळ पोचत आहे.

आजवर सत्ताधाऱ्यांना अधिकार व सत्ता यांचा लाभ मिळाला. पण आता त्या गोष्टी त्यांच्या हातातून निसटून चालल्या आहेत. त्या गोष्टी उपेक्षित-वंचितांच्या दबाव गटांच्या हाती जाऊ लागल्या आहेत.

तेव्हा प्रशासन सुधारण्यासाठी वेळ काढा आणि परिस्थिती आटोक्याबाहेर जाऊ देऊ नका असा सल्ला अरुण शौरी देतात.

संरचना, सार्वभौमत्व प्रसारक आणि संकल्पना, असे या पुस्तकाचे तीन मुख्य भाग आहेत.

'संरचना' या भागात प्रथम सध्याची प्रणाली निसर्गनियमाला धरून आहे का असा प्रश्न विचारून तिच्याबद्दलची मिथके स्पष्ट केली आहेत. अनेक शक्य प्रणालींमधून एकच पर्याय निवडता येईल का याविषयी ऊहापोह करण्यात आला आहे.

शासनाच्या प्रमुखाची म्हणजे राष्ट्राध्यक्षाची थेट निवड व्हावी, राष्ट्राध्यक्षाला मंत्रीमंडळात मंत्री म्हणून संसदेबाहेरील व्यक्तीची नेमणूक करण्याची मुभा असावी, राष्ट्राध्यक्षपदाची मुदत ५ वर्षे असावी, एका व्यक्तीला जास्तीत जास्त दोन वेळा राष्ट्राध्यक्ष होता यावे असे शौरी सुचवतात.

न्यायसंस्था, निवडणुका व मतदान, विधिमंडळे, विधिमंडळाचे कामकाज, आमदार-खासदारांची जबाबदारी आणि उत्तरदायित्व, या प्रत्येक बाबतीत काही तरतुदी करण्याची गरज आहे. त्याबद्दलचे विवेचन 'पर्याय' या प्रकरणात आले आहे (पृष्ठ ८३-१००)

इंदिरा गांधी यांनी आणीबाणीच्या काळात संसदेचे अधिकार गुंडाळून ठेवले. त्याबद्दलच्या न्यायालयीन वादावादीचे तपशील 'जागरूक व तत्पर सम्राट' या प्रकरणात आले आहेत. शौरी त्यातील युक्तिवादाचे पितळ उघडे पाडतात.

* *जनता सार्वभौम आहे.*
* *म्हणून संसद सार्वभौम आहे*
* *म्हणून संसद सदस्य सार्वभौम आहेत.*
* *म्हणून संसद सदस्यांपैकी बहुमत आहे, तो गट सार्वभौम आहे.*
* *म्हणून त्या गटाचा नेता -म्हणजेच पंतप्रधान - सार्वभौम आहे.*
* *म्हणून त्या नेत्याला न्यायालयीन चौकशीला तोंड द्यावे लागणे हे हास्यास्पद आहे.*
* *याच कारणाने त्या नेत्याला विरोध करणारा हा सार्वभौम जनतेच्या प्रगतिपथावरील अडथळा ठरतो.*

* *जनतेच्या प्रगतिसाठी हा अडथळा दूर करणे आवश्यक आहे.*

राज्यसभेतील चर्चेनंतर ४२व्या घटना दुरुस्तीने ९ नोव्हेंबर १९७६ रोजी वरील विधेयक संसदेने स्वीकृत केले.

सामान्य माणसाच्या संदर्भात लोकशाहीत काही मिथके गृहीत धरली जातात. उदाहरणार्थ,

१. सामान्य माणूस जे काही करतो ते व्यक्ती ह्या नात्याने करतो.

२. सामान्य माणूस हा चांगला माहीतगार असतो. त्याला जे करायचे असते ते तो विविध विकल्पांचा विचार करून करतो.

३. सर्वांचे कल्याण होईल असाच मार्ग तो निवडतो. स्वत:च्या हिताचा मार्ग निवडला तरी एखाद्या अदृश्य हाताने सामुदायिक हित साधले जाते.

अरुण शौरी ही मिथके कशी चुकीची आहेत याकडे लक्ष वेधतात.

लोकशाही पद्धतीत मतदारांना निर्णयाचा अधिकार देताना, त्यांची किती सहजपणे दिशाभूल करता येते हेही लक्षात घ्यायला हवे. राज्यकर्ते या गोष्टीचा फायदा घेऊन

निवडून येतात. बहुसंख्य लोक विखुरलेले, असंघटित आणि खोट्या आश्वासनांना व भूलथापांना सहजपणे बळी पडणारे असतात. मतदान करताना ते मुस्लिम, दलित, अनुसूचित अशा भूमिकेतून गटाचा विचार करतात. मतदार म्हणून आपल्याला असणाऱ्या हक्काची जबाबदारी ते ओळखतात असे नाही.

निवडणुकीच्या सध्याच्या पद्धतीत बरेच उमेदवार अत्यल्प मताने निवडून येतात. एकूण झालेल्या मतदानाच्या १५-२० टक्के किंवा लोकसंख्येच्या ५-१० टक्के ते मिळवून ते निवडून येत असतील तर संसदेला 'प्रातिनिधिक' कसे मानता येईल? लोकसभेत ३९ पक्ष आणि मंत्रीमंडळात १४ पक्ष असतील तर सध्याची संसदीय प्रणाली देशाला मजबूत, एकसंध व परिणामकारक शासन देऊ शकेल का असा प्रश्न ते विचारतात वेगवेगळ्या पक्षांच्या आघाड्यांमुळे निर्णयप्रक्रियेत अनिष्ट सौदेबाजी होते. नाही त्या तडजोडी केल्या जातात. आम्ही सार्वभौम हा दावा त्यामुळे फोल ठरतो.

लोकप्रतिनिधींनी आपले कर्तव्य व जबाबदारी नि:स्पृहपणे पार पाडायला हवी. आर्थिक व इतर प्रलोभनांना बळी पडता कामा नये. अनाठायी तडजोडी करता कामा नयेत.

लोकसभेतील कामकाजाचे नियम प्रामाणिकपणे पाळायला हवेत. प्रश्नोत्तराच्या तासाचे पावित्र्य अबाधित ठेवायला हवे. सभागृहात शासकीय भागावर अतिक्रमण करता कामा नये. घोषणाबाजी करून कामात अडथळे आणणे किंवा काम बंद पाडणे टाळायला हवे.

सर्व काही व्यक्तीवर अवलंबून असते. व्यक्तीने आपले आचरण विवेकपूर्ण आणि शालीन ठेवले पाहिजे. राष्ट्र उभे राहते ते नागरिकाचे गुण, सार्वजनिक भावना आणि विवेकबुद्धी यांच्या जोरावर. जेव्हा प्रामाणिक व निष्ठावंतांना देशोधडीला लावले जाते, लबाड संधिसाधूंना मिरवले जाते तेव्हा राष्ट्र रसातळाला जाते.

सर्वसामान्य कार्यकर्त्यांनीही मूल्यभान ठेवून चारित्र्याची जपणूक केली पाहिजे. मोहाला बळी पडण्यास नकार दिला पाहिजे. साधनशुचिता हेच कार्यकर्त्यांचे खरे सामर्थ्य असते.

शासनव्यवस्थेने भ्रष्टाचारमुक्त, कार्यक्षम, लोकाभिमुख कारभार केला पाहिजे.


संसदीय लोकशाही प्रणालीची पथ्ये काटेकोरपणे पण विधायक वृत्तीने पाळली तरच नागरिकांचे कल्याण होईल. आपल्या या संस्थांचे विकृतीकरण होऊ देता कामा नये असा अरुण शौरींचा आग्रही दृष्टिकोन आहे.

**किंमत : २२०रु.   सभासदांना : सवलतीत   पोस्टेज : २५रु.**

## पुस्तक परिचय

**जन्मठेपेची शिक्षा भोगणाऱ्या**
**सुशिक्षित तरुणांच्या**
**अंतर्मुख करणाऱ्या कहाण्या**

# जन्मठेप




**गिरिजा कीर**

गिरिजा कीर यांनी ऐन पंचविशीत मुंबईतील झोपडपट्ट्यांमध्ये जाऊन तेथील मुलांसाठी व उन्मार्गी स्त्रियांसाठी, कामगार महिलांसाठी समाजकार्य हाती घेतले होते. त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवले होते. पुढे साठीत आल्यावर नेरळ-माथेरान परिसरातील आदिवासी मुलांच्या प्रबोधनासाठी त्यांनी एक प्रकल्प हाती घेतला. शाळकरी वयात मुरुडला सानेगुरुजींचे भाषण ऐकण्याचा योग त्यांना लाभला आणि त्यांच्या शब्दांतून अग्नीचे स्फुल्लिंग बाहेर पडत आहेत, असे त्यांना वाटले. अपार करुणेतून जन्माला आलेले गुरुजींचे शब्द अंगावर रोमांच उभे करणारे, एखाद्या मेलेल्या माणसालाही संजीवनी देणारे आहेत, असे जाणवले. एक दैवत म्हणून त्यांच्यापुढे गुरुजी कायम आदर्श राहिले. गुरुजींचा साधेपणा, गुरुजींचे लेखन, गुरुजींचे कथाकथन आणि वक्तृत्व, गुरुजींची समाजसेवा, रंजल्यागांजल्यांबद्दलचा करुणा भाव या सर्वांचा ठसा आयुष्यभर त्यांच्यासमोर राहिला. पुढे ताराबाई मोडक, अनुताई वाघ यांचा लोभ त्यांना लाभला. त्यातून समाजसेवेचा वसा त्यांना कायम खुणावत राहिला. झोपडपट्टीतील मुले, आदिवासी मुले यांच्यासाठी काम करता करता जन्मठेपेची शिक्षा झालेल्या, कारावासात खितपत पडलेल्या गुन्हेगारांकडे त्यांचे लक्ष गेले.

*''तुमचे 'लावण्यखुणा' हे पुस्तक वाचून हे पत्र लिहावेसे वाटले. आपल्या लेखनातून आपले हृदय मातेचे आहे असे जाणवले. माझ्या मातेच्या जागी मी आपल्याला मानतो.''* असे पत्र एका कैद्याकडून येरवडा तुरुंगातून आले तेव्हा गिरिजा कीर यांना ''एका कैद्याला आपल्याशी नाते जोडावेसे वाटते हे आपल्या पुस्तकाचे, आपल्या लेखनाचे यश'' वाटले. एक लेखिका म्हणून त्या गुन्हेगाराच्या मनात आपले जे चित्र असेल त्याला झळ पोचता कामा नये, त्याची जगण्याची उमेद वाढायला हवी असा विचार त्यांच्या मनात आला.

तुरुंगातील कैद्याकडून आलेल्या पत्रामुळे घरच्या मंडळींना वाटणारी धाकधूक स्पष्ट दिसून आल्याने गिरिजा कीर यांना प्रश्न पडला, अशा पत्रातील भावनाविवशतेला प्रतिसाद कसा द्यायचा? पत्रलेखकाचे वय, व्यक्तिमत्त्व, स्वभावप्रकृती याची कल्पना नसताना त्याला चिरंजीव म्हणून स्वीकारायचे, मातेच्या भूमिकेत जायचे हे कितपत उचित ठरेल? तेव्हा त्यांनी त्या बाबीला स्पर्शही न करता ''श्री. सुहास, कारागृहातून पाठवलेलं आपलं पत्र मिळालं. आनंद झाला. पुस्तकं सर्वदूर पोचतात ही केवढीतरी समाधानाची बाब आहे... हे पुस्तक वाचून अनेकांची पत्रं आली... सोबत मी माझं दुसरं पुस्तक पाठवत आहे... आपण कारागृहात कसे आहात? किती दिवस आहात? तिथला दिनक्रम? आवडत असेल तर कळवा.''

त्या पत्राचे उत्तर येते. त्याची सुरुवातच असते ती स्फोटक स्पष्ट. ''मी दोन खून केलेयत. चुकून नाही. ठरवून. प्लॅन करूनच. तरीही हे वाचा... त्यात एक तरुण

स्त्री आहे. पण हा प्रेमाचा त्रिकोण किंवा एकतर्फी प्रेम असा प्रकार नाही. सातत्यानं मराठी मुलानं ठरवून घेतलेला अपमानाचा सूड - मी पश्चात्तापदग्ध आहे. स्वत:चा नाश करून घेतला म्हणून. संतापाच्या आहारी जाऊन दोन जीव संपवले म्हणून... मला समजून घ्या. मला न्याय द्या. पत्र पाठवा... मी कुणी असाच लोफर, रस्त्यावरचा नव्हे. चांगल्या घरातला चांगल्या संस्कारातला आहे.''

या पत्राने गिरिजा कीर यांची गुन्हेगारी, गुन्हेगार, तुरुंग या सर्व प्रकाराची ओळख होते.

सुशिक्षित गुन्हेगार, त्यांना चेतविणारी माणसे, तिथले व्यवहार, याबाबतची समाजाची भूमिका यांची चिंता वाटते.

येरवडा जेलमध्ये जाऊन त्या सुहास जोशी याची भेट घेतात. सुहासबरोबर असणाऱ्या संतोष भिंताडे, संतोष शिंदे, संजय कांबळे, कुमार शिंदे, नीलेश जोशी वगैरे सुशिक्षित पण शिक्षा भोगणाऱ्या तरुणांचा विश्वास संपादन करतात. त्यासाठी तुरुंगाधिकाऱ्यांपुढे एक प्रोजेक्ट सादर करतात आणि ''बंद्यांचे हृदयपरिवर्तन करण्यासाठी समुपदेशन तसेच मुलाखती घेण्याची, संशोधनात्मक लेखनासाठी बंद्यांना आणि अधिकाऱ्यांना भेटण्याची परवानगी'' मिळवतात. (४/९/२००४)

या प्रकल्पाच्या निमित्ताने येरवडा जेल, कल्याण आधारवाडी जेल आणि गोव्यातील आग्वाद जेल यांना त्या भेटी देतात. सायकिॲट्रिस्ट, क्रिमिनॉलॉजिस्ट वगैरेंशी चर्चा करतात. हे सुशिक्षित तरुण तसे जन्मजात सराईत गुन्हेगार नसतात. काही विशिष्ट प्रसंगामुळे ते संतापाच्या किंवा भावनेच्या आवेगात काहीतरी करू पाहतात, त्यातून कोणाची तरी हत्या होते. त्यामुळे जन्मठेपेसारखी शिक्षा त्यांना सुनावली जाते आणि त्यांचे संपूर्ण तारुण्य कारागृहात कोमेजून जाते.'' ही मुले वाईट नाहीत. काहीतरी चूक करतात आणि शिक्षेला पात्र ठरतात.'' असे तुरुंगाधिकारी उद्धव कांबळे, बी. डी. पिचड वगैरे आवर्जून सांगतात.

सातत्याने दहा वर्षे गिरिजा कीर येरवडा जेलला रक्षाबंधनाच्या दिवशी भेट देऊन तेथील बंद्यांना राख्या बांधतात. सर्वांना ओळखतात. त्यांना गोष्टी सांगतात. गाणी सांगतात. त्यांची मनोगते ऐकून घेतात.

सात तरुण बंद्यांना गिरिजा कीर यांनी आपली मुले मानले. त्यांचे मातृत्व स्वीकारले. त्यांजकडे आत्मीयतेने बघून त्यांना माणूस म्हणून जगण्याची संधी दिली. मानवतेच्या प्रेरणेने या तरुणांना प्रेम देऊन, त्यांनी जीवनाभिमुख व्हावे, चांगुलपणावर विश्वास ठेवावा, त्यांना पश्चात्ताप झाल्यावर त्यांचे पुनर्वसन व्हावे या दिशेने प्रयत्न केला.

गिरिजा कीर यांनी या सर्व तरुण बंद्यांना आपापल्या आयुष्याबद्दल, अपराधाबद्दल लिहायला प्रोत्साहन दिले. पत्ररूपाने, आपल्या मनातील खळबळ व्यक्त करण्यास

प्रवृत्त केले.

जन्मठेपेची शिक्षा व्हावी असे भयंकर गुन्हे या तरुणांकडून घडले, न्यायालयाने त्यांना दोषी ठरवले. काही जणांना आपल्या कृत्याबद्दल पश्चात्ताप झाला. काही जणांना आपल्याला दिलेली शिक्षा अनाठायी, चुकीची आहे असे कायम वाटत राहिले.

बलात्काराच्या आरोपावरून एका विद्यार्थीप्रिय विवाहित शिक्षकाला कारावास भोगावा लागला. त्याचीही हकीकत या पुस्तकात आली आहे. सुप्रीम कोर्टाच्या न्यायाधीशांनी या प्रकरणात ''मुलगी अल्पवयीन असेल आणि तिने आपल्यावर अमुक माणसाने बलात्कार केला असे सांगितले तर कुठल्याही इतर पुराव्याची गरज नाही, तर मुलीचे म्हणणे ग्राह्य मानून आरोपीला सजा द्यावी'' या तरतुदीचा आधार घेऊन सेशन्स कोर्टाने सुनावलेल्या जन्मठेपेऐवजी हायकोर्टाने दिलेली सात वर्षांची शिक्षा कायम केली. (पृष्ठ ९४) न केलेल्या गुन्ह्याबद्दल आपल्याला सजा मिळाली ही खंत त्या व्यक्तीच्या मनात खदखदत आहे. तरीही तो पत्रात लिहितो, ''माझा परमेश्वरावर एकमेव भरोसा आहे. माझ्यासाठी तो जे भविष्य निर्माण करील ते माझ्या हिताचेच असे समजून मी वागतो. कर नाही त्याला डर कशाला या उक्तीनुसार आणि न्यायदेवतेवर भरवसा ठेवून मी केससाठी कोणत्याही अवैध मार्गाचा अवलंब केला नाही. मिळाली ती सजा निमूटपणे भोगतो आहे.'' (९५)

काहीही गुन्हा न करता कारावासात खितपत पडलेला नीलेश जोशी हा दुसरा एक तरुण, त्याचीही केस उद्विग्न करणारी आहे.

कॅनडातील एका कंपनीत जॉब मिळाल्याने पासपोर्ट, व्हिसा वगैरे मिळवून विमानाचे तिकीट काढायच्या तयारीत असलेल्या नीलेशला एके रात्री आपल्या चौथ्या मजल्यावरच्या फ्लॅटवर गेल्यावर, तो उघडा दिसतो. आत त्याचा भाऊ एका कोपऱ्यात बसलेला दिसतो. खोलीभर रक्ताचे ओहळ दिसतात... तो आतल्या खोलीत जाऊन बघतो. एक माणूस रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसतो. नीलेश त्याला हलवून तो जिवंत आहे की नाही हे बघतो. लगेच पोलिसांना फोन करतो. पोलीस येतात. ते भावाशी बोलतात आणि नीलेशलाच चौकीवर नेतात. रात्रभर त्याला नाना प्रश्न विचारतात. मारहाण करतात. दुसऱ्या दिवशी कोर्टात घेऊन जातात. आपल्याला अटक करण्यात आली आहे हे नीलेशला तेव्हा कळते. पोलीस कस्टडीत पुढचे काही दिवस त्याला मारहाण होते. कोऱ्या कागदावर सही कर म्हणून दमदाटी केली जाते. वर्षभरानंतर केस चालू होते. एकजण कोर्टातून बाहेर जाताना त्याला सांगतो, तुझ्या भावाने एक लाख देण्याचे कबूल केले होते. पण पन्नास हजारच दिले. या सर्व प्रकरणामागे आपला भाऊ आहे हे त्यावेळी नीलेशला कळते... नीलेशला सजा होते. त्याचा भाऊ पुण्यातील प्रॉपर्टी विकून लग्न करतो आणि पुणे

सोडून जातो. त्याचा नंतर काहीच ठावठिकाणा नीलेशला लागत नाही. नीलेश येरवड्याच्या जेलमध्ये आहे.

लॉ करण्यासाठी संतोष भिंताडे जळगावहून पुण्यात येतो. बहिणीकडे राहतो. बाजूच्या कॉलनीतला एक मुलगा बहिणीच्या कॉलनीतल्या एका मुलीची नेहमी छेडछाड करीत असे. तिच्याशी संतोषचा तस काही संबंध नव्हता, परंतु आपल्या कॉलनीतल्या मुलीबाबत असे घडू नये या विचाराने तो त्या मुलाला जाब विचारायला जातो. दोघांची बोलाचाली होते. त्यात त्या युवकाचा मृत्यू होतो. संतोष स्वत: होऊन पोलीस चौकीवर जातो... खटला होतो. मुलीची साक्ष होते. तो गुंड युवक त्रास देत असे हे ती सांगते. पण संतोषला जन्मठेपेची शिक्षा होते. सुप्रीम कोर्ट त्याचे अपील फेटाळून लावते. संतोषच्या घरातील माणसे त्याच्याशी फटकून वागतात. ''ती मुलगी आपली कोण होती? कशासाठी तुझा जीव तू धोक्यात घातला?'' असे ते म्हणतात.

संजय कांबळेने पत्रकारितेचा कोर्स केला. एका सामाजिक संस्थेत खजिनदार म्हणून नोकरी मिळवली. एकदा पंचाबरोबर त्याची बाचाबाची झाली. चौघांनी त्याच्या बायकोला दम दिला. संजय खंजीर घेऊन घराबाहेर पडला तेव्हा त्या चौघांनी त्याच्यावर हल्ला केला. संजयने एकाच्या पोटात खंजीर खुपसला... त्याला फाशीची शिक्षा सुनावली जाते. राष्ट्रपतींकडून ती जन्मठेपेची केली जाते.

गिरिजा कीर यांना तो म्हणतो, ''इथं तुमची खूप पुस्तकं आहेत. मी सगळी वाचली आहेत. तुम्हाला पाहण्याची खूप उत्सुकता होती.''

नाट्यवेडा संतोष शिंदे विवाहित. सुखी संसार. बाळंतपणासाठी बायको माहेरी जाते. तेव्हा संतोषच्या जीवनात सुनीता ससाणे ही तरुणी येते. ती पुढे लग्नाची गळ घालते. संतोष हैराण होतो. मित्राच्या मदतीने तो तिला कारमधून फिरायला नेतो. स्कार्फने तिचा गळा आवळतो. ती तडफडून मरते, अशी हकीकत संतोषचे वडील सांगतात. (७७) तर संतोष पत्रातून आपली माहिती कळवतो. त्या पत्रात तो लिहितो, ''सुनीताने माझ्याविरुद्ध पोलीस चौकीवर तक्रार नोंदवली. पोलिसांनी व सुनीताच्या आईने माझ्या वडिलांना शिवीगाळ केली. तिला अद्दल घडवावी म्हणून मी मित्राच्या घरी जाऊन चाकू घेतला. सुनीता पोलीस चौकीतून घरी परतत होती तेव्हा तिच्या पाठीत चाकूने वार केले व पळ काढला. सात-आठ दिवसांनी तिचे निधन झाल्याचे कळले. मीही टिक-२० घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला पण पोलिसांनी मला अटक करून माझ्यावर गुन्हा दाखल केला. मला जन्मठेपेची शिक्षा झाली.'' (८२)

या संतोषने जेलमध्ये राहून विपश्यना केली. नंतर समाजशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास आणि इंग्लिश या चार विषयात बी.ए. केले. डीटीपीचा कोर्स पूर्ण केला. समाजशास्त्रात एम.ए. केले. अनेक एकांकिका बसवून सादर केल्या.

''सुनीतावर माझे प्रेम होते. माझ्या हातून तिचा घात कसा झाला हे अजूनही समजत नाही. त्यावेळी मी राग कंट्रोल केला असता तर आज कारागृहात नसतो.''

जन्मठेपेच्या कैद्यांच्या पत्रांवर या पुस्तकात भर दिलेला आहे. त्या पत्रातील भाषा, भावना, खंत-वेदना या सर्व मनाला भिडतात.

''कैद्यांचे मनोविश्लेषण करणे, त्यांची मानसिकता बदलणे, आपल्याविषयी विश्वास निर्माण करणे आणि त्यांना जीवनाभिमुख करणे'' या दृष्टीने हे लेखन करण्यात आले आहे.

जबरदस्त इच्छाशक्ती आणि दु:खितांच्या मनावर फुंकर घालण्याची वृत्ती हेच आपले प्रमुख संदर्भ असे त्या म्हणतात.

दहा वर्षांच्या काळात या प्रकल्पावर काम केल्यावर सुशिक्षित, सुसंस्कृत तरुण गुन्हेगारीकडे का वळतात याबद्दल त्यांचे विचारमंथन काही सार-निष्कर्षापर्यंत येते. या मुलांच्या संदर्भात काही निरीक्षणे हाती लागतात.

१. या मुलांना जगायचे आहे. जबाबदार नागरिक म्हणून जगायचे आहे.
२. अविवेकाने घडलेल्या चुका त्यांना मान्य आहेत. पश्चात्ताप वाटतो.
३. चित्रपटातून होणारी गुन्हेगारीची आणि ग्लॅमरची भलावण भ्रामक असते हे त्यांना जाणवते आहे.
४. घरची सामान्य स्थिती, ओढाताण, स्वप्नरंजन- गुन्हेगारीला प्रवृत्त करते.
५. आसपासचे चंगळवादी जीवन, त्याचे आकर्षण गुन्हेगारीकडे नेते.
६. घरच्यांचे फाजील लाड आणि भविष्याविषयीच्या अतिरंजित अपेक्षा गोत्यात आणतात.
७. मूल्यविचारांचा ऱ्हास. शिक्षणाचा एकांगीपण, पुस्तकी ज्ञानाच्या मर्यादा.
८. वाढत्या वयातले एकाकीपण, कर्तव्यशून्यता, आळस.
९. अतिसंवेदनशीलता, अहंकेंद्रितपणा
१०. अश्रद्ध, दिशाहीन जीवन.

आज अवतीभवती काळाबाजार करणारे, भेसळ करणारे, शोषण करणारे, दुसऱ्याला नाडणारे, भ्रष्टाचार करणारे, गुंडगिरी करणारे लोक उजळ माथ्याने वावरत आहेत. त्यांना कोणी वाळीत टाकत नाही. ज्यांच्या गुन्ह्यामागे काही प्रासंगिक कारण आहे, आपली शिक्षा ज्यांनी पुरेपूर भोगली आहे, त्यांना समाजाने पुन्हा सरळ सन्मानाचे जीवन देण्याची गरज आहे. त्यासाठी क्षमाशील, समंजस दृष्टी हवी.

गिरिजा कीर यांनी या प्रकल्पाद्वारे कारावासात खितपत पडलेल्या काही कैद्यांना बोलते केले, लिहिण्यास प्रवृत्त केले, समजावून घेतले - हे त्यांचे योगदान निश्चितच दखलपात्र आहे.

**किंमत : १५०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : २५रु.**

# पुरस्कार



*** कवी ग्रेस यांना 'प्रिय जीए सन्मान' प्रदान**

''जी. ए. कुलकर्णी माझे पाठराखे आहेत. त्यांच्या नावाचा सन्मान म्हणजे माझ्या आयुष्यातील पहिला आणि शेवटचा एकमेवाद्वितीय वाङ्मयीन सन्मान आहे. प्रत्येकाने स्वत:साठी असा एक 'जीए' शोधावा,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ कवी ग्रेस यांनी केले. माझ्या कवितेसाठी मी आणि केवळ मीच हुतात्मा होईन, रसिकांना हुतात्मा होऊ देणार नाही, असेही त्यांनी या वेळी सांगितले.

आशय सांस्कृतिक, जी. ए. कुटुंबीय आणि स्क्रीन सिटीतर्फे आयोजित 'प्रिय जीए महोत्सवात' ग्रेस यांना ज्येष्ठ प्रकाशक रामदास भटकळ यांच्या हस्ते 'प्रिय जी.ए. सन्मान' प्रदान करण्यात आला. मानपत्र, मानचिन्ह आणि पंधरा हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप होते. या वेळी 'जीएं'च्या छायाचित्रातील काळ्या रंगांच्या चष्म्यापासून ते कलावंताचे दु:ख त्याची 'क्रिएटिव्हिटी' स्वत:सह इतर कवींच्या कविता, ईश्वराकडील मागणे... अशा विविध विषयांना स्पर्श करणाऱ्या ग्रेस यांच्या मुक्तचिंतनाला रसिकांनी उस्फूर्त दाद दिली.

कविता पूर्ण असते किंवा अपूर्ण, हे कवितेचे दोनच प्रकार आहेत, असे सांगून ग्रेस म्हणाले, ''मी कवितेतून खोड्या होऊ देत नाही आणि करतही नाही; पण 'भाववाचक' ही माझ्या कवितेची खोड आहे. माझ्या कवितेचा मी प्रचारक नाही आणि प्रियकरही नाही. प्रार्थनावादी असल्याने ईश्वराजवळ माझे मागणे आहे की, 'माझ्या कवितेवर आणि सभ्यतेवर या जगात कोणलाही मात करू देऊ नकोस.' हीच माझ्या आयुष्यातील एकमेव प्रार्थना आहे.''

भटकळ म्हणाले, ''इमाने इतबारे लेखन करणे हे 'जीएं'चे व्रत होते. कविता हा वाङ्मयप्रकार त्यांना आवडत होता आणि तो अवघड आहे, हेही ते ओळखून होते. त्यांची आणि ग्रेस यांची मैत्री साहित्यातून फुललेली होती.'' या वेळी 'जीएं'च्या भगिनी नंदा पैठणकर, 'आशय'चे वीरेंद्र चित्राव, सतीश जकातदार, 'स्क्रीन सिटी'चे डॉ. नितीन ढेपे उपस्थित होते. सुप्रिया चित्राव यांनी सूत्रसंचालन केले, तर संदेश कुलकर्णी यांनी 'जीएं'च्या पत्रांचे अभिवाचन केले. 'जीएंची पत्रवेळा' या पुस्तकाचे प्रकाशनही झाले.

''मुळात मी कशावरच जय मिळवणार नाही. मग त्या भावना असो, विचार असो अथवा विकार, पण तुम्ही दिलेली दुर्बोधतेची शाल मी माझ्या अखेरपर्यंत घेऊन जाणार आहे. हाडांची आणि पेशींची वल्कले मी पांघरून बसेन, पण ती शाल पांघरणार नाही, मरणाकडे जाताना कुठलेही इंद्रिय मागे ठेवायचे नाही या कुळातला मी एक आहे,' असेही ते म्हणाले.

*** उत्कृष्ट वाङ्मयनिर्मितीचे राज्य सरकारचे पुरस्कार**

राज्य सरकारचे २०१० साठीचे उत्कृष्ट वाङ्मयनिर्मितीचे पुरस्कार जाहीर झाले असून, काव्यनिर्मितीसाठीचा २० हजार रुपयांचा कवी केशवसुत पुरस्कार कवयित्री नीरजा यांना 'निरर्थकाचे पक्षी' या काव्यसंग्रहासाठी, नाट्यलेखनाचा राम गणेश गडकरी पुरस्कार गो. पु. देशपांडे यांना 'शेवटचा दिस' या नाटकासाठी, कादंबरीलेखनाचा ह. ना. आपटे पुरस्कार राजन खान यांना 'रस अनौरस'साठी जाहीर झाला आहे.

पुरस्कारांची घोषणा सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे करण्यात आली. राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष मधू मंगेश कर्णिक यांच्या अध्यक्षतेखालील परीक्षण समितीने ७६ पुस्तकांची निवड केली.

पुरस्कारांची नावे आणि साहित्यकृती पुढीलप्रमाणे :

वामन निंबाळकर (वाहत्या जखमांचा प्रदेश),
गोविंद काजरेकर (उरल्यासुरल्या जगण्याचे रिमिक्स),
प्रज्ञा दया पवार (आरपार लयीत प्राणांतिक),
श्याम मनोहर (सन्मान हौस),
अमेय दक्षिणदत्ता (द फिअर फॅक्टर),
सरदार जाधव (दान),
धम्मपाल रत्नाकर (विसकट),
अनंत सामंत (एक शहराचे शूटिंग),
आसाराम लोमटे (आलोक),
प्रज्ञा दया पवार, भालचंद्र देशपांडे (कार्यकर्ता),
कविता महाजन (ग्राफिटी वॉल),
मंगला गोडबोले (पण बोलणार आहे),
स्नेहा शिनखेडे (काळजातले दिवे),
बाळकृष्ण शिंदे (अमावस्येचा चंद्र आणि इतर एकांकिका),
डॉ. विठ्ठल गाड (देवकीनंदन गोपाळा व इतर एकांकिका),
भिवा परब, अजित पाटील (हुब्लकवाडीत ऐश्वर्या),
शीलवंत वाढवे (हास्यरसायन),
नंदा खरे (कहाणी मानव प्राण्याची),

दिलीप तिवारी (दखल),

चित्रा नित्सुरे (नोबेल विज्ञावती),

ऊर्मिला चाकूरकर (सृजन सोहळा),

वीणा गवाणकर (रॉझलिंड फ्रँकलिन),

आनंद ठाकूर, मेहबूब सय्यद (दगडावरची पेरणी),

अलका गोडे (धाकट्या नजरेतून),

डॉ. सुधीर रसाळ (वाङ्मयीन संस्कृती),

डॉ. राजन गवस (रोकडे पाझर),

डॉ. अंजली जोशी (संगीत शारदा : एक वाङ्मयीन घटना),

शिवसांब कापसे (जगदीश कदम यांची कविता),

महादेव वाघमारे, गौतम पाटील व डॉ. अनिल (महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास १८९१ ते १९९४),

डॉ. ग. का. माने व डॉ. जी. एस. महाडिक (शिवकालीन किल्ल्यांचा समग्र अभ्यास),

अच्युत गोडबोले (अर्थात),

डॉ. मुक्ता जहागिरदार (आर्थिक चिकित्सा),

करुणा गोखले (बाईमाणूस),

डॉ. सुरेखा सावंत (डॉ. भाऊ दाजी लाड यांचे राजकीय व सामाजिक कार्य),

के. रं. शिरवाडकर (आपले विचारविश्व),

सुचिता पडळकर (शिक्षणप्रवाहाच्या उगमापाशी),

श्रीमती सुमती जोशी (उत्क्रांती),

शैलेश माळोदे (नॅनो टॅक्नॉलॉजी, अतिसूक्ष्म महाप्रचंड),

विजयसिंह घाडगे, श्रीमती मीना कर्णिक, मधुकर मंडलेकर (मात अंधारावर),

डॉ. स्वाती कर्वे, दिलीप सुरवाडे (महात्मा फुले-शैक्षणिक विचार व कार्य),

डॉ. साहेब खंदारे (शुद्धजातक भाग १),

डॉ. प्रकाश खांडगे (खंडोबाचे जागरण),

डॉ. अशोक रानडे (मला भावलेले संगीतकार),

डॉ. यू. डी. चव्हाण व जे. व्ही. पाटील (ज्वारी प्रक्रिया),

डॉ. ना. पु. दक्षिणकर (शहामृग व इमूची व्यापारी शेती),

भीष्मराज बाम (विजयाचे मानसशास्त्र),

रमेश देसाई (तिसरा ध्रुव), अभिजित घोरपडे (ग्लोबल वार्मिंग),

डॉ. न. गो. राजूरकर (प्रतिबिंब),

विश्राम गुप्ते (परीकथा आणि वास्तव),

केशव वसेकर (हिरवा ऋतू),

अप्पा महाजन (बिस्किटचा बंगला),
शंकर कऱ्हाडे (मार्टिन ल्यूथर किंग),
ज्ञानदा आसोलकर (वॉल्ट डिस्ने - स्वप्नांचा किमयागार),
मालविका देखणे (पर्यावरण कथा),
आनंद घैसास (दुर्बिणी आणि वेधशाळा),
नाथा चितळे, ह. शि. खरात (जंगल मंगल कथा),
डॉ. सतीश साळुंके (रमाची गोष्ट),
अनिल अवचट (वनात... जनात),
अरुंधती महाम्बरे (बूम बूम बैल आणि जंमत गोष्टी)
शरयू सोनावणे (प्राचीन लोककथांचा खजिना),
डॉ. श. रा. राणे (नागा-जोगा),
डॉ. भगवान अंजनीकर (चरित्र स्मरण),
डॉ. द. दि. पुंडे (गंमत शब्दांची)

*** गुलजार यांना 'कला अकादमीचा जीवनगौरव' पुरस्कार**

गीतरचना आणि कल्पक चित्रपट दिग्दर्शनाने भारतीय रसिकांच्या हृदयात स्थान निर्माण केलेल्या गीतकार गुलजार यांना रामपुरे कला अकादमीच्या 'जीवनगौरव' पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

चित्रकार जफर नदाफ व रोहन पोरे यांना कलागौरव पुरस्काराने गौरवण्यात आले.

सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. इरेश स्वामी, भगवान रामपुरे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

गुलजार यांनी एकाहून एक सरस गीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

कलागौरव पुरस्काराने मला विशेष आनंद झाल्याची भावना चित्रकार जफर नदाफ यांनी व्यक्त केली.

हा पुरस्कार म्हणजे एक टॉनिक असून त्यामुळे माझ्या रंगरेषा अधिक सशक्त होतील आणि कलेला बळ मिळेल, असे रोहन पोरे सत्काराला उत्तर देताना म्हणाले.

*** उज्ज्वला केळकर यांना पुरस्कार**

पंकस ॲकॅदमी - पंजाब कला साहित्य अकादमी जालंदर ही संस्था गेली १३ वर्षे समाज, साहित्य, कला शिक्षण, पत्रकारितेशी संबंधित विभिन्न क्षेत्रातील व्यक्तींचा गौरव करत असते. यंदाचा चौदावा ॲकॅडमी ॲवार्ड वितरण सोहळा १३ नोव्हेंबर २०१० रोजी जालंधरला संपन्न झाला. सौ. उज्ज्वला केळकर यांना 'विशिष्ट

अकादमी सन्मान’ देऊन गौरवण्यात आले. पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश इ. हिंदी भाषिक प्रदेशांबरोबरच अरुणाचल प्रदेश, मिझोराम, मणीपूर, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश इ. हिंदी राज्यभाषा नसलेल्या १६ प्रांतातील व्यक्तींची निवड करण्यात आली होती.

सौ. उज्ज्वला केळकर यांची आत्तापर्यंत ३७ पुस्तके प्रकाशित झालेली आहेत.




त्यात बालवाङ्मय, कथा, कविता, अनुवाद (लघुकथा, कथा, कादंबऱ्या) यांचा समावेश आहे.

### * डॉ. अरुणा ढेरे यांना डॉ. लाभसेटवार साहित्य सन्मान पुरस्कार-२०११

डॉ. अनंत व लता लाभसेटवार प्रन्यास नागपूर आणि डॉ. लाभसेटवार प्रतिष्ठान, अमेरिका यांच्या संयुक्त विद्यमाने प्रदान करण्यात येणारा सन २०११ चा डॉ. लाभसेटवार साहित्य सन्मान पुरस्कार मराठीतील ख्यातनाम साहित्यिक व लोकसाहित्याच्या अभ्यासक डॉ. अरुणा ढेरे यांना जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार एक लाख रुपयांचा आहे.

डॉ. अरुणा ढेरे या चतुरस्त्र साहित्यिक आहेत. कविता, कथा, कादंबरिका, ललित लेख, समीक्षा, लोकसाहित्य, संपादन, अनुवाद, बालसाहित्य, पटकथा व संवादलेखन अशा विविध साहित्य प्रकारात त्यांनी लेखन केले आहे. कवयित्री म्हणून मराठीत त्यांचा मोठा चाहता वर्ग आहे. सन १९८७ पासून काव्यलेखन करणाऱ्या डॉ. अरुणा ढेरे यांचे सहा काव्य संग्रह प्रकाशित असून ‘मंत्राक्षर’, ‘निरंजन’ व ‘निळ्या पारदर्शक अंधारात’ ला विशेष वाचक पसंती लाभली. ‘कृष्णकिनारा’ हा त्यांचा कथासंग्रह विशेष गाजला.

'अज्ञात झऱ्यावर रात्री', 'मन केले ग्वाही', 'पावसानंतरचं ऊन' हे उल्लेखनीय कथासंग्रह होत. प्रतिष्ठेचा प्रश्न हा त्यांचा भाषांतरित कथांचा संग्रह प्रकाशित झाला आहे. त्यांनी विपुल ललित लेख लिहिले असून त्यांचे अकरा संग्रह प्रकाशित आहेत.

*** डॉ. यू. म. पठाण यांना उत्तुंग पुरस्कार**

उत्तुंग सांस्कृतिक परिवार ट्रस्टतर्फे देण्यात येणारा पुरस्कार संत साहित्याचे अभ्यासक डॉ. यू. म. पठाण यांना घोषित करण्यात आला आहे.

२५ हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल आणि श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. मराठी भाषेतील संशोधन, साहित्यनिर्मिती, समाजप्रबोधन आणि सांस्कृतिक यामध्ये गेल्या अर्धशतकात केलेल्या कार्याच्या सन्मानार्थ हा पुरस्कार देण्यात आला आहे.

प्रसिद्ध गायिका आशाताई आणि माधव या खाडिलकर दाम्पत्याचा हा ट्रस्ट आहे. यापूर्वी बाबासाहेब पुरंदरे, डॉ. शिवाजीराव भोसले, राम शेवाळकर यांना हा पुरस्कार देण्यात आला होता.

*** ज्योत्स्ना कदम, बांदेकर व शेणई दमाणी साहित्य पुरस्काराचे मानकरी**

भैरूरतन दमाणी साहित्य पुरस्कार ज्योत्स्ना कदम (ठाणे), प्रवीण बांदेकर (सावंतवाडी) व संतोष शेणई (पुणे) यांच्या साहित्यकृतींना देण्यात आले. याशिवाय ज्येष्ठ कवयित्री विजया जहागीरदार व साहित्य समीक्षक प्रा. निशिकांत ठकार यांचा साहित्य विशेष गौरव सन्मान केला गेला.

ज्योत्स्ना कदम यांचे 'सर आणि मी' हे आत्मकथन (राजहंस प्रकाशन), प्रवीण बांदेकर यांची 'चाळेगत' ही कादंबरी (शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर) व संतोष शेणई यांचा 'घटका पळाने' हा काव्यसंग्रह (पद्मगंधा प्रकाशन, पुणे) यांना दमाणी साहित्य पुरस्कार देण्यात आले. प्रत्येकी २५ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

विजया जहागीरदार व प्रा. निशिकांत ठकार यांना देण्यात आलेल्या साहित्यविशेष गौरव सन्मानाचे स्वरूप प्रत्येकी ११ हजार रुपये व सन्मानचिन्ह असे आहे. उत्तम कांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्कार वितरण समारंभ संपन्न झाला.

*** 'विमुक्ती' आत्मकथेला चार पुरस्कार**

मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केलेल्या दीपा महानवर यांच्या 'विमुक्ती' आत्मकथेस कराडच्या आहिल्यादेवी सामाजिक व शैक्षणिक प्रतिष्ठानचा 'साहित्यरत्न' पुरस्कार भारती विद्यापीठाचे उपाध्यक्ष डॉ. इंद्रजीत यशवंतराव मोहिते व श्रीराम सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन संजीवराजे नाईकनिंबाळकर यांच्या शुभहस्ते

देण्यात आला. त्याप्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण काकडे, नोंदणी उपमहानिरीक्षक अंकुश देवगुंडे, कथाकार प्रा. रवींद्र कोकरे आदी मान्यवर उपस्थित होते.

अहमदनगर येथील आठव्या ग्रामीण साहित्य संमेलनात 'विमुक्ती'ला 'शब्दगंध साहित्य पुरस्कार' प्राचार्य शिवाजीराव देवळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्याप्रसंगी संमेलनाध्यक्ष प्रकाश घोडके, शब्दगंध साहित्य परिषदेचे सुनील गोसावी उपस्थित होते.

सोमेश्वर वाचनालय व साखर कारखाना यांच्या विद्यमाने आयोजित साहित्य



उजवीकडून: मा. संजीवराजे नाईक निंबाळकर, प्रा.रविंद्र कोकरे, दिपा महानवर, सुरेश शेंडगे, डॉ. इंद्रजीत मोहिते, अंकुश देवगुंडे, प्रवीण काकडे

संमेलनात 'विमुक्ती' या पुस्तकाला 'साहित्य साधना' पुरस्कार पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन प्रा. दिगंबर दुर्गाडे यांच्या हस्ते देण्यात आला. त्याप्रसंगी सोमेश्वर साखर कारखान्याचे ज्येष्ठ संचालक पुरुषोत्तम जगताप, सचिव प्रा. हनुमंत माने आदी मान्यवर उपस्थित होते.

तसेच संगमनेर इतिहास संशोधन मंडळातर्फे कवी अनंत फंदी राज्यस्तरीय 'साहित्य पुरस्कार' ९ जानेवारीला देण्यात आला.

*** गदिमा पुरस्कार**

ज्येष्ठ लेखक मधु मंगेश कर्णिक यांना यंदाचा गदिमा पुरस्कार देण्यात आला आहे. प्रसिद्ध गीतकार, 'गीतरामायण'कार ग. दि. माडगूळकर यांच्या स्मरणार्थ हा पुरस्कार दिला जातो.

गदिमांच्या पत्नी विद्याताईंच्या स्मरणार्थ असलेला गृहिणी सखी सचिव पुरस्कार कृष्णाबाई नारायण सुर्वे यांना देण्यात आला.

गदिमांचा स्नेह निर्व्याजपणे जपणाऱ्या त्यांच्या एका स्नेह्याला गदिमा स्नेहबंध पुरस्कार दिला जातो. यंदा तो विख्यात अर्थतज्ज्ञ, साहित्यिक डॉ. वसंतराव पटवर्धन यांना आणि नव्या उभारीच्या प्रतिभावंत कलाकारांना दिला जाणारा चैत्रबन पुरस्कार यंदा प्रसिद्ध अभिनेते आणि कवी किशोर कदम उर्फ सौमित्र यांना दिला गेला.

कोल्हापूर येथील उषाराजे हायस्कूलची विद्यार्थिनी गौरी नितीन पुजारी हिने मराठी विषयात शंभरपैकी ९८ गुण मिळविल्याने तिलाही पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

### * मनोहरपंत कुलकर्णी - जीवनगौरव पुरस्कार

''सध्या रंगभूमीवर विविध विषयांची नाटके येत आहेत. मात्र त्याहीपेक्षा वेगळे विषय मराठी रंगभूमीने हाताळण्याची गरज आहे. तरच मालिका पाहणारा प्रेक्षक पुन्हा नाटकांकडे वळेल,'' असे मत ज्येष्ठ रंगकर्मी मनोहरपंत कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

अखिल भारतीय नाट्य परिषदेतर्फे, रंगभूमी दिनानिमित्त कुलकर्णी यांना संगीत संयोजक, गायक अशोक हांडे व ज्येष्ठ रंगकर्मी श्रीकांत मोघे यांच्या हस्ते 'जीवनगौरव' पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचे स्वरूप शाल, श्रीफळ, २५०० रु. व मानपत्र असे आहे.

हांडे म्हणाले की, मराठी माणसाने शिस्तीने व्यवसाय कसा करावा, व्यवस्थापन कसे असावे याचा नाट्यक्षेत्रातला आदर्श मनोहरपंतांनी घालून दिला. पुण्यात कलेची जबरदस्त साधना केली जाते, पण त्याच्या जोडीला व्यावसायिकता येथे रुजवण्याची गरज आहे.

मोघे म्हणाले की, मनोहरपंत म्हणजे मराठी नाट्यसृष्टीचा चालता-बोलता इतिहास आहे.

नाट्यपरिषदेतर्फे लक्ष्मीनारायण दाम्पत्य पुरस्कार देऊन सिंधुताई नाईक व कृष्णकांत नाईक यांचा गौरव करण्यात आला.

कांता नाईक, सरोज टिल्लू, पार्वती शेंडकर, सुषमा फाटक, सुशीला साठे यांना माता जानकी पुरस्कार आणि भारती गोसावी यांना प्रपंचलक्ष्मी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

### * उत्तम कांबळे यांना महाजन स्मृती पत्रकारिता पुरस्कार

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाशी संलग्न असलेल्या उस्मानाबाद जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने प्रमोद महाजन स्मृती राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार या वर्षीपासून सुरू करण्यात आला आहे.

२०१० या वर्षीचा पहिला राज्यस्तरीय पुरस्कार 'सकाळ' माध्यम समूहाचे

मुख्य संपादक उत्तम कांबळे यांना जाहीर करण्यात आला. ५१ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

जिल्हास्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार कळंब येथील पत्रकार सतीश टोणगे यांना जाहीर करण्यात आला आहे. पाच हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

### * मानसी खांडेकर, सावनी कुलकर्णी यांना कलागौरव पुरस्कार

अनंतरंग आर्ट फाउंडेशनतर्फे मानसी खांडेकर व सावनी कुलकर्णी-दातार यांना 'कलागौरव पुरस्कार - २०१०' देण्यात आला. अ. म. भिडे यांचे पुत्र विश्वजित भिडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा पुरस्कार दिला जातो.

''भारतीय संगीत हृदयाला भिडणारे आहे. ती हृदयाची भाषा आहे. त्याची शक्ती अलौकिक आहे,'' असे मत ज्येष्ठ गायिका-अभिनेत्री कीर्ती शिलेदार यांनी व्यक्त केले.

भिडे कुटुंबीयांनी व्याधिग्रस्त विश्वजितला गाणी ऐकविली. अंथरुणावर असताना काही न कळणारा विश्वजित भावगीते, भक्तिगीत ऐकून उत्साही झाला होता. त्याला संगीतात अपूर्व रस निर्माण झाला होता. भारतीय संगीताची अलौकिक शक्ती यावरून दिसून येते. ज्याला उत्तम सूर ऐकायचे असतात तो संगीतात कधी भेदभाव करीत नाही.

'कलागौरव पुरस्कार' आपल्याला मिळाला याचा आनंद होत असल्याचे सावनी कुलकर्णी यांनी सांगितले. घर व संसाराचा प्रपंच सांभाळून आपण संगीत क्षेत्रात कार्य करीत असल्याचे मानसी खांडेकर यांनी सांगितले.

### * चित्रपट कथेला तीन लाखांचा पुरस्कार

कोणताही चित्रपट पूर्ण झाल्यानंतर तो राष्ट्रीय, तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर गौरविला जातो. त्यातील दिग्दर्शक आणि कलावंतांचा सन्मान केला जातो; परंतु उमेश कुलकर्णी आणि गिरीश कुलकर्णी यांना चित्रपट बनविण्यापूर्वीच स्क्रिप्ट विकसित करण्यासाठी पुरस्कार प्राप्त झाला आहे. 'एनएफडीसी'तर्फे गोव्यात चित्रपट महोत्सवादरम्यान 'फिल्म बजार'चे आयोजन केले जाते. यात 'को-प्रॉडक्शन मार्केट' विभागात भारतातील निर्माते-दिग्दर्शकांनी स्क्रिप्ट सादर केल्या होत्या. त्यामध्ये 'वळू' आणि 'विहीर' फेम उमेश कुलकर्णी आणि गिरीश कुलकर्णी यांना आपले स्क्रिप्ट विकसित करण्यासाठी तीन लाख रुपयांचे 'ह्यूबर्ट बाल्स ॲवॉर्ड' प्राप्त झाले आहे.

याबाबत उमेश कुलकर्णी म्हणाले, ''अशा प्रकारची स्पर्धा असते हे ठाऊक नव्हते. आम्ही आपले स्क्रिप्ट दिले होते. त्यांनतर 'विहीर' चित्रपटाचे स्क्रीनिंग तेथे होते म्हणून गेलो. भारतातून पंचवीस-तीस कथा आल्या होत्या. त्यामध्ये आमची

कथा निवडली गेल्यामुळे आमचा आत्मविश्वास वाढलेला आहे. देविषा मूव्हीज या बॅनरखाली अभिजित घोलप या कथेवरील चित्रपटाची निर्मिती करणार आहे.

* **डॉ. अशोक कामत यांना 'शिवसमर्थ पुरस्कार'**

संतवाङ्मयाच्या अभ्यासकाला पुण्यातील समर्थ व्यासपीठाच्या वतीने देण्यात येणारा शिवसमर्थ पुरस्कार यावर्षी संत साहित्याचे अभ्यासक डॉ. अशोक कामत यांना ५ डिसेंबर रोजी स्वामी गोविंददेव गिरी यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ पांडुरंग बलकवडे आणि सुनील चिंचोळकर उपस्थित होते.

स्वामी समर्थांच्या आत्माराम या ग्रंथावर सुनील चिंचोळकर यांचे निरूपण झाले.

* **लता मंगेशकर यांना 'गिमा'चा जीवनगौरव**

गानसम्राज्ञी भारतरत्न लता मंगेशकर यांना 'गिमा'चा (ग्लोबल इंडियन म्युझिक) जीवनगौरव पुरस्कार अंधरी येथील यशराज स्टुडिओत ता. १० नोव्हेंबर रोजी प्रदान केला गेला. 'विझक्राफ्ट' कंपनीतर्फे दरवर्षी संगीत क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांना अशा प्रकारचा पुरस्कार दिला जातो. संगीतक्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल लतादीदींना जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले.

* **ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉ. शेंडे यांना विश्वरत्न पुरस्कार प्रदान**

''शाश्वत विकासाच्या नावाखाली आम्ही नैसर्गिक भांडवल आणि साधनसंपत्ती यांचा ऱ्हास करीत आहोत,'' अशी खंत ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ आणि संयुक्त राष्ट्रसंघाच्या ओझोन कृती विभागाचे प्रमुख डॉ. राजेंद्र शेंडे यांनी व्यक्त केली.

'विश्वमाता फाउंडेशन'तर्फे 'वनराई'चे अध्यक्ष मोहन धारिया यांच्या हस्ते डॉ. शेंडे यांना 'विश्वरत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आला. लायन्स इंटरनॅशनलचे आंतरराष्ट्रीय संचालक नरेंद्र भंडारी, स्थायी समिती अध्यक्ष अरविंद शिंदे, पोलिस उपायुक्त ज्ञानेश्वर फडतरे, विष्णुपंत कोठे, फाउंडेशनचे अध्यक्ष शिवाजी घाडगे आणि पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष के. डी. पवार या वेळी उपस्थित होते.

डॉ. शेंडे म्हणाले, ''निसर्गाच्या भांडवलावर आणि संपत्तीवर आपण रुपयाचा




न्यूयॉर्कमधल्या एका प्रतिष्ठित, धनाढ्य, जपानी उद्योजकाला जगाच्या दुसऱ्या टोकावरून धमक्यांच्या ई-मेल्स येऊ लागतात... त्याचे एक कौटुंबिक रहस्य उघड करणाऱ्या धमक्या... रहस्य... जॅपनीज आर्किडचं...

**जॅपनीज ऑर्किड**

**रेई किमुरा** अनु. स्नेहल जोशी

**२००रु.**
पोस्टेज २५रु.

शिक्का लावत नाही तोपर्यंत निसर्ग आपल्याला काय आणि किती देतो याची कल्पना येणार नाही. आपल्याला नळाद्वारे पाणी मिळते हा शाश्वत विकास झाला. पण, नैसर्गिक ओढे, नाले आम्ही व्यक्तिगत स्वार्थासाठी बुजवून टाकले. झाडे, जमीन, प्राणी, पक्षी आणि कीटक यांचा ६० टक्के ऱ्हास माणसाने केला आहे. अशा वेळी सामान्य माणसाच्या असामान्य कृतीतून आपल्या संदेश मिळतो.''

धारिया म्हणाले, ''कारखानदारी आणि उद्योजकतेच्या माध्यमातून आपण दूषित वायू वातावरणामध्ये सोडून जागतिक तापमानवाढीस कारणीभूत ठरत आहोत. ही परिस्थिती सुधारण्यासाठी डॉ. शेंडे काम करीत आहेत. जीवनामध्ये आपण ध्येय ठेवून वाटचाल केली पाहिजे. वनराई, बंधारे कार्यकम हा केवळ पाणी अडविण्याचा नाही तर स्त्रीमुक्तीचा आहे अशी खेड्यातील महिलांची भावना आहे. त्यांच्या डोळ्यांतील आनंदामध्ये मला परमेश्वराचे दर्शन घडते.''

*** चंद्रमोहन कुलकर्णी व राहुल देशपांडे यांना गुणवत्ता पुरस्कार**

''कोणतीही कला जोपासण्यामध्ये कलाकाराचे संवेदनशील मन महत्त्वाची भूमिका बजावत असते. कलासाधना करताना बुद्धीपेक्षा भावनेला जास्त महत्त्व दिले जाते– कला व व्यवसाय यांचा योग्य समन्वय राखता आला पाहिजे,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ संगीतकार, गायक पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी व्यक्त केले.



पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी

रोटरी क्लब ऑफ पुणे मॉडेल कॉलनीतर्फे प्रसिद्ध चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी आणि युवा गायक राहुल देशपांडे यांना विशेष व्यावसायिक गुणवत्ता पुरस्कार देण्यात आला.

रंगरेषांच्या दुनियेतील जादूगार, अशा शब्दांत गौरव करून चंद्रमोहन कुलकर्णी यांच्याविषयी बोलताना मंगेशकर म्हणाले, ''चित्रकाराला कोणताच विषय वर्ज्य नसतो. कुलकर्णींनीही आपल्या रंगांच्या दुनियेतून विविधांगी साहित्य स्पर्शिले आहे. जाहिरात, कलादिग्दर्शन या माध्यमांतून त्यांची कला उत्तरोत्तर वृद्धिंगत पावलेली आहे. देशातच नाही तर परदेशातही त्यांच्या या कलेची पताका पोचली आहे.''

मंगेशकर म्हणाले, ''सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून रोटरीने राबवलेले

विविध उपक्रम अतिशय स्तुत्य व प्रेरणादायी आहेत. थेंबे थेंबे तळे साचे, अशा प्रकारचे हे काम असून त्याचा लाभ येत्या पिढीला निश्चितच होईल. राहुलचे गायन म्हणजे आजोबांच्या गायकीचे प्रतिरूप असून, या कलाकाराने केलेली संगीत रंगभूमीची साधना अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते.''

राहुल देशपांडे आणि चंद्रमोहन कुलकर्णी यांना या वेळी आपले मनोगत व्यक्त केले. रोटरीचे अध्यक्ष अविनाश नवाथे यांनी क्लबविषयी माहिती सांगितली.

*** जयप्रकाश जगताप यांना चित्रकार गौरव पुरस्कार**

''कला महाविद्यालयांची संख्या वाढली असली तरी कला विद्या लयाला गेली आहे,'' अशी खंत प्रसिद्ध चित्रकार आणि कला शिक्षक जयप्रकाश जगताप यांनी व्यक्त केली. शास्त्रीय गायकांप्रमाणे नवोदित चित्रकारांनीही रियाज करावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

चित्रकार व्ही. एस. कुलकर्णी प्रतिष्ठानतर्फे चित्रकार गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. १५ हजार रुपये, स्मृतिचिन्ह, शाल आणि श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

या वेळी विद्यार्थी साहाय्यक समिती, वंचित विकास संस्था आणि प्रेरणा वनिता मंडळ या संस्थांना प्रत्येकी दहा हजार रुपयांचा कृतज्ञता निधी प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ चित्रकार व्ही. एस. कुलकर्णी, रवींद्र नामजोशी, वंचित विकास संस्थेच्या मीना कुर्लेकर आणि प्रेरणा वनिता मंडळाच्या अनुराधा पटवर्धन या प्रसंगी उपस्थित होत्या.

जगताप म्हणाले, ''माझे आजोबा गुरुवर्य बाबूराव जगताप यांना चित्रकार व्हायचे होते. ते जे. जे. कला महाविद्यालयात शिकत होते. मात्र ते शिक्षण त्यांना अर्धवट सोडावे लागले. त्यांचे स्वप्न माझ्या माध्यमातून पूर्ण झाले. घरातून पाठिंबा, शालेय आणि महाविद्यालयीन काळातील डी.एस. खटावकर, दिवाकर डेंगळे या कलाशिक्षकांचे प्रोत्साहन यामुळे माझ्यातील चित्रकार घडला. विद्यार्थ्यांना शिकवताना मीही शिकत गेलो. विद्यार्थ्यांच्या अडचणी, त्यांचे प्रश्न मला खाद्य पुरवत गेले. कला शिक्षक म्हणून काम करताना माझ्यातील चित्रकारदेखील कायम कार्यरत राहिला.''

सुरेशचंद्र पाध्ये म्हणाले, ''चित्रकला ही सर्व कलांचे सचित्र दर्शन घडविणारी कला आहे. व्यक्ती तितक्या प्रकृती असे म्हटले जाते, तसे व्यक्ती तितकी चित्रे हे दर्शन घडते. चित्रांच्या माध्यमातून माणसे एकत्र येऊ शकतात.''

कुलकर्णी यांनी 'सत्तांतर' (ट्रान्सफर ऑफ पॉवर) या भव्य चित्राच्या संसदेमध्ये झालेल्या अनावरणाची माहिती दिली. ते म्हणाले, ''या चित्राला मिळालेल्या पाच लाख रुपयांच्या माध्यमातून प्रतिष्ठान सुरू करण्याचा निर्णय घेतला. कलाशाखेची पदविका, पदवी घेलेल्या विद्यार्थ्यांना प्रदर्शनाचा अनुभव देण्यासाठी कलादालन उपलब्ध करून देण्यात आले.'' साहित्य संमेलन आणि नाट्य संमेलनाच्या धर्तीवर

चित्रकारांचे संमेलन का भरवू नये, असा सवाल करून ते म्हणाले, ''चित्रकाराला मान आणि प्रसिद्धी मिळत नाही. आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळालेले चित्रकार असूनही सरकारतर्फे 'पद्म' पुरस्कारासाठी चित्रकाराचे नाव सुचविले जात नाही.''

*** न्यूयॉर्क महोत्सवात 'विहीर' सर्वोत्कृष्ट**

उमेश कुलकर्णी दिग्दर्शित 'विहीर' या चित्रपटाने न्यूयॉर्क येथील आंतरराष्ट्रीय महोत्सवात सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार मिळविला. प्रसिद्ध लेखक सलमान रश्दी यांच्या हस्ते हा पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते मोहन आगाशे यांनी स्वीकारला. ए. बी. कॉर्पची निर्मिती असलेल्या 'विहीर' या चित्रपटाने अनेक महोत्सवांत विविध प्रकारची पारितोषिके मिळविलेली आहेत. महिंद्रा इंडो अमेरिकन आर्ट कौन्सिलतर्फे हा महोत्सव ९ ते १५ नोव्हेंबरपर्यंत आयोजित करण्यात आला होता. त्यात विविध देशांतील चित्रपटरसिकांचा सहभाग होता. 'विहीर'ला या महोत्सवात तीन नामांकने प्राप्त झाली होती. त्यामध्ये सर्वोत्कृष्ट पटकथा, दिग्दर्शन आणि चित्रपट यांचा समावेश होता.

*** भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार**

भि. ग. रोहमारे ट्रस्टतर्फे १९८९ पासून महाराष्ट्र पातळीवर ग्रामीण साहित्यातील कवितासंग्रह, कादंबरी, कथासंग्रह व समीक्षा प्रकारातील ग्रंथांना पुरस्कार देण्यात येतात. २००९ या वर्षातील पुढील ग्रंथांना हे पुरस्कार ७ डिसेंबरला देण्यात आले.

१. मी कात टाकली - जोतिराम फडतरे (सांगोला) - ग्रामीण कादंबरी - रजत प्रकाशन - औरंगाबाद.

२. संकट चौथ - मधुकर देशपांडे (पुणे) - कथासंग्रह - जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद.

३. अ) या शतकाचा सात-बाराच होईल कोरा - शंकरराव दिघे (लोणी) - कवितासंग्रह - ग्रंथाली प्रकाशन, मुंबई

ब) होऊ दे रे आबादानी - श्रीराम गव्हाणे (नांदेड) - कवितासंग्रह - बळीवंश प्रकाशन, नांदेड.

४. ग्रामीण साहित्यातील स्त्रीचित्रण - बाबुराव उपाध्ये (श्रीरामपूर) - समीक्षा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

प्रत्येकी रोख रुपये २१०१/- स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. ट्रस्टकडे आलेल्या एकूण ६० साहित्यकृतीतून निवड करण्याचे कार्य डॉ. भीमराव वाकचौरे, डॉ. गणेश देशमुख व प्रा. रायभान दवंगे यांच्या निवड समितीने केले. कादंबरीमध्ये कापूसकाळ (कैलास दौंड), यमू (विजया ब्राम्हणकर), कवितेमध्ये भूईभोग (संदीप जगताप), कथेमध्ये चिरखण (रामचंद्र नलावडे), अबोध

(पांडुरंग सहस्त्रबुद्धे), नागनाथ कोत्तापल्ले, साहित्य व समीक्षा (शंकर राऊत), आणि दया पवारांची कविता (अनंत सूर) यांचा उल्लेखनीय म्हणून निर्देश केला.

*** गोविंद काजरेकर यांना विशाखा काव्य पुरस्कार**

यशंवतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या वतीने कुसुमाग्रजांच्या गौरवार्थ दिला जाणारा 'विशाखा काव्य पुरस्कार' सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडीच्या गोविंद काजरेकर यांना त्यांच्या 'उरल्यासुरल्या जगण्याचं रिमिक्स' या काव्यसंग्रहासाठी जाहीर झाला. हा पुरस्कार डॉ. आ. ह. साळुंखे यांच्या हस्ते वितरित करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप पाच हजार रुपये, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र असे आहे.

*** डॉ. अशोक केळकर यांना साहित्य अकादमी पुरस्कार**

साहित्य क्षेत्रात अतिशय मानाचा समजला जाणारा साहित्य अकादमी पुरस्कार यंदा ज्येष्ठ भाषावैज्ञानिक, समीक्षक डॉ. अशोक केळकर यांच्यासह विविध भारतीय भाषांतील २० साहित्यिकांना जाहीर झाला. डॉ. केळकर यांना समीक्षेतील योगदानाबाबत हा पुरस्कार देण्यात येणार आहे.

''साहित्य अकादमी पुरस्कार मला जाहीर झाला हा माझ्यासाठी आनंदाचा क्षण आहे. पण, यापेक्षा जास्त आनंद आहे तो 'भाषा आणि साहित्य हे दोन्ही निकटचे विषय आहेत' हे यानिमित्ताने लोकांना समजेल. हे समजणे मी अधिक महत्त्वाचे मानतो.'' असे डॉ. केळकर यांनी सांगितले

साहित्य अकादमीतर्फे दिल्या जाणाऱ्या हा पुरस्कारात डॉ. केळकर (मराठी) यांच्या सह कवी अरुण साखरदांडे (कोकणी), कवी मिथिला प्रसाद त्रिपाठी (संस्कृत), समीक्षक रहमत तारिकेरे (कन्नड), लघुकथाकार उदय प्रकाश (हिंदी), कादंबरीकार धीरेंद्र मेहता (गुजराथी), ॲरोबिंदो कुझीर (बोडो), गोपीनारायण प्रधान (नेपाळी), वनिता (पंजाबी), मंगत बादल (राजस्थानी), लक्ष्मण दुबे (संधी), बनी बासू (बंगाली), इजदी डेव्हिड (इंग्लिश), एम. बोरकान्या (मणिपुरी), मनोज (डोग्री), नानजी नदन (तमीळ), केशदा महंत (आसामी), बासिर बाणीर (काश्मीर), पैठणी पटनाईक (ओरिया), भोगला सोरेन (संताली) यांचा समावेश आहे. ❐


## सभासदांना सूचना

आमच्या प्रिय वाचकांनी, तसेच सभासदांनी वर्गणीचे नूतनीकरण करावे.
कृपया वर्गणीत वाढ झालेली आहे,
हे लक्षात ठेवून वर्गणीची पूर्ण रक्कम पाठवावी.
पुस्तक खरेदीस येताना मेंबरकार्ड जरूर आणावे,
ही नम्र विनंती.

# वाचकांचा प्रतिसाद



श्री. सुनील मेहता यांस,

सस्नेह नमस्कार

सर्वप्रथम नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

मेहता मराठी ग्रंथजगत दीपावली अंक आठवणीने पाठवल्याबद्दल मन:पूर्वक धन्यवाद. 'दिवस कॉलेजचे...' मधील सर्वच लेख वाचनीय आहेत.

एकूणच सर्व अंक आवडला.

पुनश्च धन्यवाद!

उल्का राऊत
दादर, मुंबई.

---

संपादक,
मेहता मराठी ग्रंथजगत

आपल्या दिवाळी अंकात एक योग अकल्पितपणे जुळून आला आहे. मराठी मनात आणि मराठी साहित्य जगतातही दिवाळी इतकेच औत्सुक्य असते दिवाळी पाठोपाठच येणाऱ्या साहित्य संमेलनाचे. आता येऊ घातलेल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष उत्तमराव आहेत. ते ज्यांच्याकडून ही सूत्रे स्वीकारणार आहेत ते द. भि. कुलकर्णी या दोघांचेही आपल्या जीवनाकडे मागे वळून पाहणारे लेख या अंकात आहेत. हे कसे नकळत का होईना, चांगले जमून आले आहे आणि या दोघांचेही लेख आवर्जून वाचावेत असेच आहेत.

आपण म्हणता त्याप्रमाणे कॉलेज आणि त्या वेळेचे वय हा आयुष्यातला महत्त्वाचा टप्पा असतो. पण यासाठी आपण ज्यांचे ज्यांचे लेख मागवले आहेत त्या सर्वांनीच ते खूपच गांभीर्याने घेतले आहे. यामुळे या टप्प्यावरून ते पुढे कसकसे गेलेत हे चांगले कळते पण त्यात कॉलेज एन्जॉय करणे, कॉलेज लाईफ म्हणून काही असणे आणि ते हातचे न राखता सांगणे हे मात्र काहीसे राहून गेल्यासारखे वाटते. (कदाचित त्या नुसत्या कवी-कल्पनाच?)

या व्यतिरिक्त अंकात जे इतर लेख आहेत त्यात विशेषत: डॉ. भवान महाजन यांचा लेख सूर गवसलेला वाटला.

चौदा कोटी ग्रंथ आणि संदर्भ असणाऱ्या जगातील सर्वात मोठ्या ग्रंथालयाचे भव्य प्रवेशद्वार अंकाच्या मुखपृष्ठासाठी सजवणे हे केवळ वेगळेपण नाही तर योग्य वेगळेपण आहे.

अनिल बळेल
पुणे

डॉ. निर्मला सारडा,

मेहता मराठी ग्रंथजगत या दिवाळी अंकातील 'मजेमजेचे ते दिवस' हा आपला लेख वाचला. तो खूप आवडला. 'अध्यापक आणि प्राध्यापक उत्तम शिकवणारे भेटले की आपल्याला त्या विषयांची गोडी लागते.' हे आपले विधान खूप महत्त्वपूर्ण आहे. मलाही असे शिक्षक व प्राध्यापक भेटल्याने मी एम.ए.(इंग्लिश) पूर्ण करून ज्यु. कॉलेजमध्ये शिक्षक झालो. नंतर मी आवडीखातर एम.ए.(मराठी) पूर्ण केले. (वीस वर्षांनंतर) मला हरिवंशराय बच्चन यांच्या विषयी खूप आदर व प्रेम वाटते. समविचारांनी भारावून 'शिक्षक' या नात्याने मी आपल्याला पत्र पाठवून माझ्या मनीचा आनंद व्यक्त करीत आहे. धन्यवाद!

हरीष लक्ष्मण काटकर
सांगली ४१६ ४१६.

मा. संपादक

स.न.वि.वि

आपला दीपावली विशेषांक वाचनात आला. फारच आवडला. त्यातील शिकनीस यांच्या 'वलय रुईया कॉलेजच्या वातावरणाचे' या लेखातील वर्णन भूतकाळाची सफर घडवून आणते. सर्व काही जसेच्या तसे डोळ्यासमोर उभे करते. त्यावेळच्या शिक्षक व विद्यार्थ्यांमधील स्वच्छ आणि सुंदर नाते मनाला भिडते.

असेच चांगले साहित्य वाचण्यास मिळावे ही अपेक्षा!

डॉ. विजया जोशी
vijayajoshi@gmail.com

नमस्कार,

मी आपल्या प्रकाशनाचे 'पीस ऑफ केक' हे अनुवादित पुस्तक वाचले. शोभना शिकनीस यांनी हा अनुवाद अतिशय सुरेख आणि मूळ पुस्तकाशी प्रामाणिक असा केलेला आहे. आमच्यासारख्या वाचकांना ही मेजवानीच आहे. त्याबद्दल आपले आभार. नवीन अनुवादाच्या प्रतीक्षेत.

नीलिमा देशपांडे
neelima.deshpande1@gmail.com

मा. संपादक

स.न.वि.वि

मेहता मराठी ग्रंथजगतचा दीपावली अंक मिळाला 'वलय रुईया कॉलेजच्या वातावरणाचे' मधील आत्मविश्वास वाढवणाऱ्या घरेलू वातावरणाचे चित्रण जास्त आवडले. अर्थात इतर लेखही उत्कृष्ट आहेत पण त्यांचा लेख अधिक आवडण्याचे कारण म्हणजे मी सुद्धा रुईया कॉलेजमध्ये सध्या टी. वाय. बी. ए. च्या वर्गात आहे. माझ्या घरापासून अगदी पाच मिनिटाच्या अंतरावर असणाऱ्या सोमय्या महाविद्यालयात प्रवेश घेण्याचा दबाव माझ्यावर होता. फॉर्म सुद्धा भरला होता. पण शेवटी नियतीनं माझ्या मनाचा कौल जाणला. सोमय्या आधी रुईयाला नंबर लागला. आमच्या वेळी प्रवेश प्रक्रिया थेट फॉर्म व टक्क्यांवर अवलंबून होती.

आज मुंबईतल्या महाविद्यालयात जाणाऱ्या प्रत्येक तरुणाचं एकदातरी रुईया महाविद्यालयात फिरून तरी यावं हे स्वप्न असतं. अगदी खेड्यांतून सुद्धा आलेले विद्यार्थीही इथे येऊन आपलं स्वतंत्र अस्तित्व विसरून त्या अथांगाचा एक भाग होऊन जातात कारण या अथांगाला निश्चितच तळ आहे पण याची व्याप्ती केवळ मुंबईपुरतीच मर्यादित न राहता भारतात आणि परदेशात सुद्धा पसरली आहे.

उच्चविद्याविभूषित प्राध्यापकांची परंपरा आजही महाविद्यालयाने जपली आहे. विद्यार्थ्यांना शिकवताना कट्ट्यावरील भाषेचा वापर होतो. हास्यविनोद करत शिकवणाऱ्या मराठी विभाग प्रमुख प्रा. लीना केदारे यांचं एकही लेक्चर बंक करावं असं वाटत नाही. सामाजिक प्रश्नाची अचूक जाण आणि त्याबद्दलचं समाजप्रबोधन सुद्धा तितकंच महत्त्वाचं असतं.

तेव्हा खाकी युनिफॉर्ममध्ये असणारे शिपाई आता आकाशी रंगाच्या युनिफॉर्ममध्ये असतात. आजूबाजूच्या उडप्यांच्या हॉटेलची चव सुद्धा तीच आहे.

एकंदरीत काय तर अमृतमहोत्सवी वर्षाकडे वाटचाल करणाऱ्या या महाविद्यालयाने परंपरा आणि आधुनिक विचार यांची सुरेख सांगड घातली आहे.

कौस्तुभ सदरे (टी.वाय.बी.ए.)

९९६९५०६८२३

❐


**द फकीर**

**अनु. सुनीति काणे**

फक्त तुम्हाला कसं जगायचं एवढंच तो शिकवत नाही...
तर मरण कसं स्वीकारायचं हेही तो शिकवतो.
अशी अजब विनोदबुद्धी असलेल्या फकीराचा
जीवनप्रवास तुमचं आयुष्य बदलू शकेल.

**१८०रु. पोस्टेज २५रु.**




## मेहता पब्लिशिंग हाऊस

# २००९ मध्ये प्रकाशित झालेल्या पुस्तकांची यादी

| पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| **कादंबरी** | | |
| **द डेमन इन द फ्रीझर :** रिचर्ड प्रेस्टन | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | २२०/- |
| **पीस ऑफ केक :** स्वाती कौशल | अनु. शोभना शिकनीस | २००/- |
| **ब्युटी क्वीन :** इरा त्रिवेदी | अनु. अपर्णा वेलणकर | २२०/- |
| **द सिमीऑन चेंबर :** स्टीव्ह मार्टिनी | अनु. जयवंत चुनेकर | २५०/- |
| **शांतिदूत :** नॅन्सी यी फान | अनु. मंजूषा आमडेकर | १५०/- |
| **फॉल्स इम्प्रेशन :** जेफ्री आर्चर | अनु. सुधाकर लवाटे | २८०/- |
| **स्लमडॉग मिलेनिअर :** विकास स्वरूप | अनु. वन्दना अत्रे | २००/- |
| **मिराज :** बंडुला चंद्ररत्ना | अनु. सुनंदा अमरापूरकर | १३०/- |
| **ॲन आय फॉर ॲन आय** : बंडुला चंद्ररत्ना | अनु. सुनंदा अमरापूरकर | १२०/- |
| **वेस्टेड :** मार्क जॉन्सन | अनु. स्नेहल जोशी | २५०/- |
| **द अफगाण :** फ्रेडरिक फॉर्सिथ | अनु. बाळ भागवत | २००/- |
| **जिगर** : 'अग्री' श्रीधर | अनु. उमा कुलकर्णी | ६०/- |
| **द व्हाईट टायगर** : अरविंद अडिगा | अनु. लीना सोहोनी | २००/- |
| **द रनअवे ज्यूरी** : जॉन ग्रिशॅम | अनु. अनिल काळे | ३५०/- |
| **मार्कर** : रॉबिन कुक | अनु. अनिल काळे | ३५०/- |
| **एन्जल्स ॲण्ड डेमन्स** : डॅन ब्राऊन | अनु. बाळ भागवत | ३२०/- |
| **माय नेम इज सल्मा** : फादिया फकीर | अनु. स्नेहल जोशी | २००/- |
| **ॲंबिग्युअस लॉस** : डॉ. पॉलिन बॉस | अनु. सुनंदा अमरापूरकर | १२०/- |
| **फॅमिली** (होम) : मंजू कपूर | अनु. सुनंदा अमरापूरकर | २७०/- |
| **शूट टू किल** : स्कॉट ग्रॅहॅम | अनु. डॉ. देवदत्त केतकर | १५०/- |
| **शापित वास्तू** : नॅथनिल हॉथॉर्न | अनु. शंकर पाटील | २५०/- |
| **बकुळा** : सुधा मूर्ती | अनु. लीना सोहोनी | १२०/- |
| **जमेका इन** : डॅफने दयू मोरियेर | अनु. स्नेहल जोशी | २२०/- |
| **हिरॉईन ऑफ द डेझर्ट** : डोन्या अल्-नहि | अनु. शोभना शिकनीस | १५०/- |
| **जॅपनिज मॅग्नेलिया :** रेई किमुरा | अनु. निर्मला मोने | २००/- |
| **अदान ॲण्ड ईव्हा :** अयान हिरसी अली ॲना ग्रे | अनु. उज्ज्वला गोखले | ५०/- |

| | | |
|---|---|---|
| **डिसेप्शन पॉईंट :** डॅन ब्राऊन | अनु. अशोक पाध्ये | ५००/- |
| **अमिना :** मोहम्मद उमर | अनु. उदय भिडे | २२०/- |
| **वन नाईट @ द कॉल सेंटर** : चेतन भगत | अनु. सुप्रिया वकील | २२०/- |
| **द थ्री मिस्टेक्स ऑफ माय लाईफ** चेतन भगत | अनु. सुप्रिया वकील | २२०/- |
| **आवरण :** डॉ.एस.एल. भैरप्पा | अनु. उमा कुलकर्णी | २५०/- |
| **अनादि-अनंत :** आद्य रंगाचार्य (श्रीरंग) | अनु. उषा देसाई/ अविनाश देसाई | १२०/- |
| **द सटन बग :** ॲलिस्टर मॅक्लीन | अनु. अशोक पाध्ये | २८०/- |
| **द नंबर वन लेडिज डिटेक्टिव्ह एजन्सी** अलेक्झांडर मॅक्काल स्मिथ | अनु. नीला चांदोरकर | २००/- |
| **शल्य** | मालती जोशी | ८०/- |
| **पितृऋण :** सुधा मूर्ती | अनु. मंदाकिनी कट्टी | ७०/- |
| **एनस्लेव्ह्ड :** राहिला गुप्ता | अनु. सुनीति काणे | ३००/- |
| **शिंडलर्स लिस्ट :** थॉमस केनेली | अनु. संजय दाबके | ३००/- |

## कथासंग्रह

| | | |
|---|---|---|
| **चिताक** | महादेव मोरे | १५०/- |
| **प्रकाशाची झाडे** | वसु भगत | २००/- |
| **सामान्यांतले असामान्य :** सुधा मूर्ती | अनु. उमा कुलकर्णी | १३०/- |
| **आकाशवेध** | गिरिजा कीर | १३०/- |
| **आपण माणसात जमा नाही** | राजन गवस | १५०/- |
| **केवळ मैत्रीसाठी...** | उमेश कदम | १३०/- |
| **आंधळी कोशिंबीर** : चेतन जोशी | अनु. सुभाष जोशी | २४०/- |
| **वसुदेवे नेला कृष्ण** | शुभदा गोगटे | १८०/- |
| **अस्मानी** | शुभदा गोगटे | १८०/- |
| **घर** | शुभदा गोगटे | १६०/- |
| **सतीचं वाण** | व. कृ. जोशी | १५०/- |
| **गुन्हा कबूल!** | व. कृ. जोशी | ११०/- |
| **पाठलाग** | व. कृ. जोशी | १४०/- |
| **विज्ञान पोलीसकथा** | व. कृ. जोशी | १२०/- |
| **कॅट ओ नाईन टेल्स :** जेफ्री आर्चर | अनु. लीना सोहोनी | २००/- |
| **कर्णपिशाच्च** | डॉ. बाळ फोंडके | २२०/- |

## आत्मकथन

| | | |
|---|---|---|
| **इन द नेम ऑफ ऑनर :** मुख्तार माई | अनु. उल्का राऊत | ८०/- |
| **मेरा परिवार :** नटालिया फ्लौमर | अनु. विमल लिमये | १२०/- |
| **इट्स नॉट अबाउट द बाइक :** लान्स आर्मस्ट्राँग, | अनु. अंजनी नरवणे | २४०/- |
| **विमुक्ती** | दिपा महानवर | २२०/- |
| **माय फॅमिली इज ऑल आय हॅव :** हेलन-ॲलीस डिअर | अनु. चित्रा वाळिंबे | २२०/- |
| **द डायरी ऑफ मेरी बर्ग :** एस. एल. श्नायडरमन | अनु. शोभना शिकनीस | १८०/- |
| **अ वुमन्स करेज :** जॅकलिन गोल्ड | अनु. प्रशांत तळणीकर | २२०/- |
| **''मी अनीता राकेश सांगतेय...'' :** अनीता राकेश | अनु. रजनी भागवत | १६०/- |

## व्यक्तिचरित्रे

| | | |
|---|---|---|
| **नवभारताचे शिल्पकार :** वीर संघवी | अनु. सुप्रिया वकील | १००/- |
| **प्रतिकूलतेवर मात :** ए. जी. कृष्णमूर्ती | अनु. सुप्रिया वकील | ७०/- |
| **क्रांतिसूर्य** | विश्वास पाटील | १३०/- |

## ललित गद्य - पद्य

| | | |
|---|---|---|
| **पॉपकॉर्न** | सुप्रिया वकील | ८०/- |

## अनुभवकथन

| | | |
|---|---|---|
| **बाळमासा :** लिन कॉक्स | अनु. विदुला टोकेकर | ८०/- |
| **ॲज आय सी... नेतृत्व आणि प्रशासन :** किरण बेदी | अनु. माधुरी शानभाग | १८०/- |
| **ॲज आय सी ... स्त्रियांचे सक्षमीकरण :** किरण बेदी | अनु. माधुरी शानभाग | १२०/- |
| **ॲज आय सी... भारतीय पोलीस सेवा :** किरण बेदी | अनु. माधुरी शानभाग | १३०/- |
| **इट हॅपन्ड् इन इंडिया :** किशोर बियाणी, दीपायन बैश्य | अनु. उषा महाजन | १८०/- |
| **कटिंग फ्री :** सलमा अहमद | अनु. सुप्रिया वकील | २६०/- |
| **त्यांच्या सिंड्रोमची कथा** | कल्पना चारुदत्त | १३०/- |
| **इराणमधून सुटका :** सुझान आझादी, ॲंजेला फेरान्ते | अनु. विदुला टोकेकर | २५०/- |

## अनुवादित वैचारिक

| | | |
|---|---|---|
| **ऐका संतांनो :** ओशो | अनु. प्रज्ञा ओक | १२०/- |
| **साद घालतो कबीर** : ओशो | अनु. मीना टाकळकर | २२०/- |

## व्यक्तिमत्त्व विकसन

| | | |
|---|---|---|
| **चॅम्पियन व्हा!** | डॉ. रमा मराठे | २२०/- |

## चिकन सूप मालिका

| | | |
|---|---|---|
| **चिकन सूप फॉर द टीनएज सोल :** जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन, किम्बर्ली किर्बर्जर | अनु. सुप्रिया वकील | १६०/- |
| **चिकन सूप फॉर द मदर्स सोल :** जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन, जेनिफर रीड हॉथॉर्न, मॅर्सी शिमॉफ | अनु. सुप्रिया वकील | २००/- |
| **चिकन सूप फॉर द सोल ॲट वर्क :** जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन, मार्टीन रूट, मायदा रॉजरसन, टीम क्लूस | अनु. श्यामला घारपुरे | १६०/- |

## संदर्भ ग्रंथ

| | | |
|---|---|---|
| **मराठी भाषा उद्गम व विकास** | कृ. पां. कुलकर्णी | ३२०/- |

## मार्गदर्शनपर

| | | |
|---|---|---|
| **केल्याने होत आहे रे...** | संजीव परळीकर | ६०/- |
| **विक्रीकौशल्य शिका** | संजीव परळीकर | ५०/- |
| **हे वयच वेडं असतं !** | शुभांगी खासनीस<br>केतकी काळे/प्रसन्न रबडे | २००/- |
| **मनगंगेच्या काठावरती** | डॉ. रमा मराठे | १२०/- |
| **व्हाय मेन डोन्ट लिसन ॲण्ड विमेन कान्ट रीड मॅप्स :** बार्बरा आणि ॲलन पीस | अनु. शुभदा विद्वांस | १२०/- |
| **प्रिझनर्स ऑफ अवर थॉट्स :** ॲलेक्स पॅटाकोस | अनु. डॉ. विजया बापट | १४०/- |
| **अर्थाच्या शोधात :** व्हिक्टर फ्रॅन्कल | अनु. डॉ. विजया बापट | १३०/- |
| **सुखद बालसंगोपन** | डॉ. रत्नावली दातार | ६०/- |

## वैज्ञानिक

| | | |
|---|---|---|
| **खेळणी विज्ञानाची** | डी. एस. इटोकर | ८०/- |

# श्रद्धांजली

*** युवा प्रकाशक निषाद देशमुख यांचा अपघाती मृत्यू**

पुस्तक प्रकाशन क्षेत्रात स्वत:ची वेगळी ओळख निर्माण करणारे नाशिक येथील गौतमी प्रकाशनचे संचालक निषाद देशमुख (वय ३८) यांचा दि. २९ नोव्हेंबर रोजी मुंबई-आग्रा महामार्गावर वाडीवऱ्हेजवळील अपघातात मृत्यू झाला.

निषाद यांच्या पश्चात वडील रमेश देशमुख, आई सरिता, एक भाऊ, पत्नी व दोन मुलगे आहेत.

प्रकाशन व्यवसायासदंर्भात आयोजित एका चर्चासत्रासाठी देशमुख हे दिल्ली येथे गेले होते. तेथून २८ नोव्हेंबर रोजी ते मुंबई विमानतळावर उतरले. के. के. ट्रॅव्हलच्या कारमधून ते नाशिककडे येत असताना पहाटे ३ वाजता वाडीवऱ्हेजवळ रस्त्यावर उभ्या असलेल्या ट्रकला कार धडकली. या अपघातात देशमुख यांचा जागीच मृत्यू झाला.

प्रकाशनासह इतरही वेगवेगळ्या संस्थांशी त्यांचा संबंध राहिला. १९९१ वर्षी नाशिकमध्ये कलेच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीच्या प्रचारार्थ कार्यरत 'स्पीक मॅके' संस्थेची शाखा सुरू करण्यात पुढाकार होता. पं. जसराज, हरिप्रसाद चौरासिया, प्रभा अत्रे, गंगूबाई हनगल आदींचे कार्यक्रम त्यांनी शाळा-महाविद्यालयांमध्ये आयोजित केले. १९८८ मध्ये देशमुख यांनी 'करिअर कन्सल्टंट' म्हणून सुरुवात केली. प्रा. मिलिंद वाघ लिखित 'इंडस्ट्रियल सायकॉलॉजी-सोशिऑलॉजी' या पुस्तकाच्या माध्यमातून सुरू झालेला त्यांचा 'करिअर पब्लिकेशन'चा प्रवास पुढे अधिकच बहरला. प्रकाशन व्यवसायात त्यांनी राबविलेल्या नवनवीन कल्पनांची दखल घेऊन ब्रिटिश कौन्सिलने त्यांना 'यंग पब्लिशिंग आंत्रप्रुनरशिप अॅवॉर्ड' ने गौरविले. हा पुरस्कार मिळविणारे ते महाराष्ट्रातील पहिलेच प्रकाशक ठरले. करिअर कन्सल्टंटच्या विविध परीक्षाविषयक मार्गदर्शन केंद्रांमध्ये प्रा. मिलिंद वाघ यांच्यासह सक्रिय योगदान देतानाच देशमुख यांनी वेदांची ओळख, सुलभ ज्ञानेश्वरी, दिनरंग, भाषा घडताना, शब्दगन्ध आदी वेगळ्या विषयांवरील पुस्तके प्रकाशित केली आहेत.

*** शाहीर विठ्ठल उमप**

आपल्या खड्या आवाजाने अवघ्या महाराष्ट्राला 'जागे' करणाऱ्या लोकशाहीर विठ्ठल उमप यांचे २६ नोव्हेंबर रोजी नागपूर येथे दीक्षाभूमीवर निधन झाले. 'लॉर्ड बुद्धा' वाहिनीच्या लोकार्पण सोहळ्यासाठी ते दीक्षाभूमीवर आले होते. घोषणा देत असताना त्यांचा श्वास भरून आला. भोवळ आल्याने ते तिथेच व्यासपीठावर पडले. हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांचे निधन झाले.

पोवाडे, भारुडे, नाटके यांच्या माध्यमातून मराठमोळ्या रसिकांवर मोहिनी घालणाऱ्या विठ्ठल उमप यांनी अखेरच्या क्षणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना साष्टांग नमस्कार केला. त्यानंतर सुरमणी प्रभाकर धाकडे यांची गळाभेट घेऊन त्यांनी 'जय भीम' आणि 'जय बुद्धा' असे जोरदार नारे दिले. त्यानंतर आसनस्थ होण्यापूर्वीच भोवळ येऊन ते कोसळले. त्यांना मोकळा श्वास देऊन शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न करण्यात आला, तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले; परंतु तोपर्यंत त्यांची प्राणज्योत मालवली.

विठ्ठल उमप यांच्या निधनामुळे लोकरंगनायक काळाच्या पडद्याआड गेला आहे; अखेरच्या श्वासापर्यंत त्यांनी रंगभूमीची सेवा केली, अशी भावना मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केली.

*** ज्येष्ठ नाट्यलेखक वसंत जाधव**

ज्येष्ठ नाट्यलेखक वसंत जाधव (वय ८०) यांचे २२ नोव्हेंबर रोजी मुंबई येथे निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुलगे, मुलगी, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

वसंत जाधव यांनी 'देवता', 'नवा संस्कार', 'रामची ताई', 'दैवत', 'बेबीचे लग्न', 'गौरीशंकर', 'सौभाग्य', 'दानाचं दान', 'निर्णय', 'नाथ माझा जगन्नाथ', 'रात्र जागते चंद्रासाठी', 'नाटक एका नाटकाचे', 'मैत्रीण माझ्या मित्राची', पुरुषपात्र विरहित 'पंख तुटलेले पक्षी' २० नाटके व १२ एकांकिका रंगभूमीवर आणल्या. नाट्यसंमेलनाच्या तयारीसाठी घरचे कार्य समजून ते झटत. वसंत जाधव यांना अनेक पारितोषिकेही मिळाली होती.

*** कवी वामन निंबाळकर**

'गावकुसाबाहेरची कविता', 'महायुद्ध' आणि 'वाहत्या जखमांचा प्रदेश', 'तू आग होतास तू पाणी होतास', 'बाबासाहेब अगणित दिव्य डोक्यात घेऊन मिरवणारा' तसेच 'तू झोपलेल्यांची जाग होतीस', असे क्रांतिप्रवण संदेश देणारे ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत, साहित्यिक, समीक्षक आणि कवी प्रा. वामन सुदामा निंबाळकर (वय ६७) यांचे दि. ३ डिसेंबर रोजी हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले.

बुलडाणा जिल्ह्यातील लांजूड या गावचे असलेले प्रा. निंबाळकर यांचा जन्म १३ मार्च १९४३ रोजी झाला. त्यांचे शिक्षण औरंगाबादेत झाले. औरंगाबाद आणि नागपूर ही त्यांची कर्मभूमी ठरली. डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, कायदा आणि इतिहास इत्यादी सर्वच बाबींवर निंबाळकर यांनी आपल्या साहित्यातून प्रकाश टाकला. औरंगाबादेत दलित पँथरच्या स्थापनेनंतर नामांतर आंदोलन, मागासवर्गीयांसाठी शिष्यवृत्ती आंदोलन, मागास जाती-जमातील भटके आणि अल्पसंख्याकांना पडीत जमीनवाटप कार्यक्रम राबवला. आतापर्यंत त्यांनी ५६ पुस्तकांचे लेखन केले. प्रबोधन प्रकाशनाद्वारे 'आजचे प्रबोधन' साप्ताहिक सुरू केले. प्रबोधन प्रकाशनतर्फे लोककवी वामनदादा कर्डक यांच्या 'वाटचाल', कवी यशवंत मनोहर यांच्या 'उत्थानगुंफा'चे प्रकाशन केले. विदर्भ साहित्य संघातर्फे घेण्यात येणाऱ्या विदर्भपातळीवरील साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष होते. डर्बन येथे झालेल्या दलित मानवाधिकार परिषदेत ते सहभागी झाले होते.

*** ज्येष्ठ साहित्यिक सुभाष भेंडे**

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुभाष भेंडे (वय ७४) यांचे २० डिसेंबर रोजी 'ब्रेन हॅमरेज'मुळे साहित्य सहवास येथील निवासस्थानी निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, मुलगी असा परिवार आहे.

डॉ. भेंडे हे मूळचे गोव्याचे. त्यांचा जन्म गोव्यातील बोरी गावात १४ ऑक्टोबर १९३६ रोजी झाला. वयाच्या पाचव्या वर्षी केपे हे मूळगाव सोडून ते सांगलीत शिक्षणासाठी गेले. त्यांचे शिक्षण सांगली व पुण्यात झाले. गोवा मुक्ती संग्रामानंतर प्रकाशझोतात आलेल्या साहित्यिकांपैकी ते एक होते. अर्थशास्त्रासारख्या किचकट व रुक्ष विषयात त्यांनी वयाच्या २६व्या वर्षी डॉक्टरेट संपादन केली. गोवा, मुंबईतील कीर्ती महाविद्यालयात अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्ळणून त्यांनी अनेक वर्षे काम केले. ते विद्यार्थीप्रिय प्राध्यापक होते. 'जोगीण' ही त्यांची कादंबरी सर्वाधिक गाजली. या कांदबरीचा हिंदी भाषेत 'भिक्षुणी' या नावाने अनुवाद झाला. 'जोगीण'च्या तीन आवृत्त्या निघाल्या आहेत. डॉ. भेंडे यांनी विनोदी साहित्यातही आपला ठसा उमटवला. खुसखुशीत विषयांवर लिहिण्यात त्यांचा हातखंडा होता. त्यांच्या नर्मविनोदी शैलीतील लिखाणाला वाचकांची उत्स्फर्त दाद मिळाली. त्यांनी प्रवासवर्णनेही लिहिली. कराड येथे २००३ मध्ये झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे तसेच वळवई येथील २१व्या गोमंत मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते.

**डॉ. भेंडे यांची साहित्यसंपदा**

अर्थशास्त्रावर अकरावी बी. ए., बी.कॉम. साठी इंग्रजी व मराठी पाठ्यपुस्तके

कादंबरी : 'आमचे गोय अमका जाय', अदेशी, जोगीण, अंधारवाटा, पैलतीरी,

उद्ध्वस्त, बोन्साय, चकवा, किनारा, होमकुंड

विनोदी साहित्य : स्वर्ग दोन बोटं, कागदी बाण, स्मितकथा, हसवेगिरी, हास परिहास, फूल ना फुलाची पाकळी, जित्याची खोड, खुसखुशीत, दिलखुलास, लोटांगण, नेपोलियन नंतर तुम्हीच, द्राक्ष आणि रुद्राक्ष, जेथे जातो तेथे, सुरस आणि चमत्कारिक, पितळी दरवाजा (गोमा गणेश)

नाटक : मार्ग सुखाचा

प्रवास वर्णन : चषक गुलाब (युरोप प्रवास), गड्या आपुला गाव बरा (अमेरिका प्रवास)

हिंदी भाषेत अनुवाद झालेले साहित्य : भिक्षुणी (जोगीण), अनजानी राहे (अधांर वाटा), कुछ तो वजह है (अदेशी)

पुरस्कार : गोवा कला अकादमी, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे सन्मान.

*** ज्ञानेश्वर नाडकर्णी**

ज्येष्ठ कला व नाट्य समीक्षक ज्ञानेश्वर नाडकर्णी (वय ८२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे मुलगा डॉ. अमूल्य नाडकर्णी, चित्रा आणि सुप्रिया या दोन मुली असा परिवार आहे. (२३ डिसेंबर)ला दुपारी बाणेर येथील निवासस्थानी त्यांचे निधन झाले.

नाडकर्णी यांचा जन्म २१ मे १९२८ रोजी झाला. मराठी व इंग्रजी भाषेतून कलासमीक्षेच्या क्षेत्रात त्यांनी पन्नासहून अधिक वर्षे कामगिरी केली. कला व नाट्य क्षेत्रातील आस्वादपर समीक्षक म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांची अनेक पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

अलीकडेच त्यांना फ्रेंच सरकारतर्फे 'अक्षरांचे शिलेदार' हा किताब बहाल करण्यात आला होता.

नाडकर्णी यांनी समीक्षक या नात्याने नियतकालिकांत जसे विपुल लिखाण केले; तसेच साहित्याच्या विविध प्रकारांतही त्यांच्या पुस्तकांनी आगळे स्थान मिळवले. पाऊस, भरती, चिद्घोष, प्रस्थान हे कथासंग्रह, दोन बहिणी, कोंडी, नजरबंदी, वलयांकित या कादंबऱ्या आदींबरोबरच विख्यात चित्रकार एम. एफ. हुसेन यांच्यावरील 'अनवाणी' तसेच पिकासो, गायतोंडे, डी. डी. दलाल व हिचकॉक यांच्यावरील चरित्रग्रंथांचे लेखनही त्यांनी केले. अश्वत्थाची सळसळ, अभिनय, प्रतिभेच्या पाऊलवाटा, प्रोग्रेसिव्ह आर्टिस्ट्स ग्रुप आदी समीक्षा ग्रंथांची त्यांनी निर्मिती केली. 'विलायती वारी' हे प्रवासवर्णनात्मक पुस्तक त्यांनी लिहिले. बालगंधर्वांवरील इंग्रजी चरित्राचे लेखन करून त्यांनी मराठीतील या बुजुर्ग कलावंताची जागतिक पटावर ओळख करून दिली.

❒

# बालनगरी

## मेहता पब्लिशिंग हाऊस

### आमचे आकर्षक बालसाहित्य

**चित्रमय रंगतदार कथा**

| | | |
|---|---|---|
| **चतुर बोकोबा आणि इतर कथा** | वृषाली पटवर्धन | ३० |
| **नशीबवान शेखर आणि इतर कथा** | वृषाली पटवर्धन | ३० |
| **लोखंड खाणारे उंदीर आणि इतर कथा** | वृषाली पटवर्धन | ३० |
| **सुंठ बिस्किटाचा माणूस आणि इतर कथा** | चारुता पुराणिक | ३० |
| **हस्तिदंती छडी आणि गोष्टी देशोदेशीच्या** | चारुता पुराणिक | ३० |
| **लैलाचा दिवा आणि गोष्टी देशोदेशीच्या** | चारुता पुराणिक | ३० |
| **सूर्याची चोरी आणि गोष्टी देशोदेशीच्या** | चारुता पुराणिक | ३० |

*(फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स पुरस्कार २००८)*
*('राजहंस प्रकाशन' पुरस्कार)*
*(अ.भा.म.प्रकाशक संघ-उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार २००६-०७)*

| | | |
|---|---|---|
| **निद्राराणी आणि इतर कथा** | विजया देशपांडे | ३० |
| **जादूचं खीरपात्र आणि इतर कथा** | अरुंधती पंडित | ३० |
| **टिंबक टू आणि इतर कथा** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **गम्मत गोष्टी** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **धमाल गोष्टी** | मंजूषा आमडेकर | ५० |
| **मजेदार लोककथा** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **आदर्श लोककथा** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **राजाचं गुपित आणि इतर कथा** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **ढुम ढुम ढुमाक ढुम आणि इतर कथा** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **सोन्याचा पाऊस आणि मजेदार गोष्टी** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **ड्रॅगनचं घर आणि मजेदार गोष्टी** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **बुडबुड्यांचे विमान आणि इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३० |
| **चालणारा हिमपुतळा आणि इतर गोष्टी** | अर्चना ओक | ५० |
| **छोटुसा पांढरा ससुकला आणि इतर गोष्टी** | अर्चना ओक | ५० |
| **छोटू किल्लीवाला उंदीर आणि इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३० |

| | | |
|---|---|---|
| **गंपू चिंपू आणि इतर कथा** | उमा खरे | ३० |
| **मैत्रीचे मोल आणि इतर कथा** | उमा खरे | ३० |
| **सिंड्रेला आणि इतर कथा** | उमा खरे | आ.सं. |
| **घारीची चलाखी आणि मस्त मस्त गोष्टी** | उमा खरे | ३० |
| **गर्विष्ठ घोडा आणि मस्त मस्त गोष्टी** | उमा खरे | ३० |
| **बदकाचे बूट आणि गम्मत गोष्टी** | उज्ज्वला केळकर | ३० |
| **गर्विष्ठ सूर्यफूल आणि गम्मत गोष्टी** | उज्ज्वला केळकर | ३० |
| **बंटू बसला ढगात आणि इतर कथा** | राजीव तांबे | ५० |
| **बंटूचा टिकटिक मित्र आणि इतर कथा** | राजीव तांबे | ५० |
| **घड्याळातील कोकिळा आणि गडबड गोष्टी** | निर्मला मोने | ३० |
| **अस्वलाची शेपटी आणि गडबड गोष्टी** | निर्मला मोने | ३० |
| **खट्याळ खलाशी आणि गडबड गोष्टी** | निर्मला मोने | ३० |
| **जादूचं बटण आणि इतर गोष्टी** | निर्मला मोने | ३० |
| **जादूचं रबर आणि इतर गोष्टी** | निर्मला मोने | ३० |
| **जादूचं तळं आणि इतर गोष्टी** | निर्मला मोने | ३० |
| **गोष्टी पानोपानी** | ईशान पुणेकर | ३० |
| **गोष्टी मनोमनी** | ईशान पुणेकर | ३० |
| **गोष्टी कानोकानी** | ईशान पुणेकर | ३० |
| **जादूचा अंगरखा आणि मजेदार गोष्टी** | संस्मिता गुप्ते | ५० |
| **पिनू-चिनूची चतुराई आणि मजेदार गोष्टी** | संस्मिता गुप्ते | ५० |
| **पतंगाची करामत आणि मजेदार गोष्टी** | संस्मिता गुप्ते | ५० |
| **चालणारे बूट आणि मजेदार गोष्टी** | संस्मिता गुप्ते | ५० |

**आजीनं सांगितलेल्या चातुर्यकथा**

| | | |
|---|---|---|
| **हितोपदेश : बोधप्रद कथा** | मोहन वेल्हाळ | ३० |
| **हितोपदेश : मनोरंजक कथा** | मोहन वेल्हाळ | ३० |
| **हितोपदेश : प्रेरक कथा** | मोहन वेल्हाळ | ३० |
| **हितोपदेश : रोचक कथा** | मोहन वेल्हाळ | ३० |
| **जातक कथा : मनोरंजक** | निर्मला सारडा | ३० |
| **जातक कथा : प्रेरक** | निर्मला सारडा | ३० |
| **जातक कथा : रोचक** | निर्मला सारडा | ३० |
| **जातक कथा : शिक्षाप्रद** | निर्मला सारडा | ३० |
| **शेखचिल्लीचे किस्से** | निर्मला सारडा | २५ |
| **मन्नो** | मंजूषा आमडेकर | २५ |
| **मोठ्यांच्या छोट्या गोष्टी** | माधव मोर्डेकर | ३० |

| | | |
|---|---|---|
| **रमज्या गमज्या आणि जम्मत गोष्टी** | अरुंधती महाम्बरे | ३० |
| **ठकुबाई ठेंगे आणि जम्मत गोष्टी** | अरुंधती महाम्बरे | ३० |
| **बुटुकबैंगण विसरभोळे आणि जम्मत गोष्टी** | अरुंधती महाम्बरे | ३० |

**फ्रँकलिन मालिका** मूळ लेखिका : **पोलेत बूर्ज्वा**

| | | |
|---|---|---|
| **फ्रँकलिन आणि दंतपरी** | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| **फ्रँकलिन थाप मारतो** | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| **फ्रँकलिन आणि अंधारगुडुप** | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| **फ्रँकलिनची दादागिरी** | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| **फ्रँकलिन हरवतो** | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| **फ्रँकलिनचा पसारा** | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| **फ्रँकलिन आणि फुटबॉल स्पर्धा** | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| **फ्रँकलिन आणि पाळीव प्राणी** | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| **चल, आटप लवकर, फ्रँकलिन** | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| **फ्रँकलिनचा नवा मित्र** | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| **फ्रँकलिनचं पांघरूण** | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| **फ्रँकलिन आणि रात्रीची धमाल** | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| **फ्रँकलिन शाळेत जातो** | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| **फ्रँकलिनचा वाईट दिवस** | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| **फ्रँकलिन सायकल चालवतो** | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| **फ्रँकलिन आणि हरवलेला कॅमेरा** | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| **फ्रँकलिन आणि वादळी पाऊस** | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| **शाळेच्या नाटकात फ्रँकलिन** | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |
| **फ्रँकलिन आणि सण** | अनु. मंजूषा आमडेकर | ५० |

**तेनालीराम मालिका**

| | | |
|---|---|---|
| **बुद्धिमान तेनालीराम** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **जगावेगळा तेनालीराम** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **चतुर तेनालीराम** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **न्यायप्रिय तेनालीराम** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **समयसूचक तेनालीराम** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **लाडका तेनालीराम** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **प्रसंगावधानी तेनालीराम** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **निर्भय तेनालीराम** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **राज्याचे भूषण तेनालीराम** | मंजूषा आमडेकर | ३० |

| | | |
|---|---|---|
| **हजरजबाबी तेनालीराम** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **हुशार तेनालीराम** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **विनोदवीर तेनालीराम** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **मजेदार तेनालीराम** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **परोपकारी तेनालीराम** | मंजूषा आमडेकर | ३० |

**बिरबल मालिका**

| | | |
|---|---|---|
| **विनोदवीर बिरबल** | निर्मला सारडा | ३० |
| **लाजवाब बिरबल** | निर्मला सारडा | ३० |
| **बुद्धिमान बिरबल** | निर्मला सारडा | ३० |
| **चतुर बिरबल** | निर्मला सारडा | ३० |

**ससोबा-हसोबा मालिका**

| | | |
|---|---|---|
| **शेपटीवालं झाड आणि इतर कथा** | राजीव तांबे | ५० |
| **ससुल्या आणि इतर कथा** | राजीव तांबे | ५० |
| **शूर ससोबा आणि इतर कथा** | राजीव तांबे | ५० |
| **चला चहा पिऊया आणि इतर कथा** | राजीव तांबे | ५० |
| **छत्रीची जादू आणि इतर कथा** *(महाराष्ट्र राज्य पुरस्कार २००८-०९)* | राजीव तांबे | ३० |
| **झॅकपॅक शोध आणि इतर कथा** | राजीव तांबे | ३० |

**गुरुशिष्य कथा**

| | | |
|---|---|---|
| **कसोटी आणि इतर कथा** | शरद दळवी | ३० |
| **सत्त्वपरीक्षा आणि इतर कथा** | शरद दळवी | ३० |

**जंगल कथा**

| | | |
|---|---|---|
| **इमानी मित्र आणि इतर गोष्टी** | शरद दळवी | ३० |
| **पंचरंगी खार आणि इतर गोष्टी** | शरद दळवी | ३० |

**जंगल जंमत मालिका**

| | | |
|---|---|---|
| **जांभळे आंबे आणि जंमत गोष्टी** | वैशाली कार्लेकर | ३० |
| **फट्फजिती आणि जंमत गोष्टी** | वैशाली कार्लेकर | ३० |
| **गाढवाचं गाणं आणि जंमत गोष्टी** | निर्मला मोने | ३० |
| **सिंहाचं उड्डाण आणि जंमत गोष्टी** | निर्मला मोने | ३० |
| **सोनेरी चोच आणि जंमत गोष्टी** | निर्मला मोने | ३० |
| **पिंटू पेलिकन आणि जंमत गोष्टी** | निर्मला मोने | ३० |
| **तल्लख मोती आणि जंमत गोष्टी** | निर्मला मोने | ३० |
| **लालतोंडी चोर आणि जंमत गोष्टी** | निर्मला मोने | ३० |

| | | |
|---|---|---|
| **उंटाची मान आणि जंमत गोष्टी** | निर्मला मोने | ३० |
| **बुम बुम बैल आणि जम्मत गोष्टी** *(महाराष्ट्र राज्य पुरस्कार २००९-१०)* | अरुंधती महाम्बरे | ५० |
| **तीन छोटे मासे आणि जम्मत गोष्टी** | अरुंधती महाम्बरे | ५० |

**छोटुश्या बब्बडच्या गमतीदार गोष्टी**

| | | |
|---|---|---|
| **चंपी मालीश आणि था..था..था!** | राजीव तांबे | ३० |
| **दांडोबा राक्षस आणि गुळगुळीत मावशी** | राजीव तांबे | ३० |
| **गुळाची ढेप आणि सरबत** | राजीव तांबे | ३० |
| **सू सुटका आणि रंगीत डोंगर** | राजीव तांबे | ३० |

**बोधकथा**

| | | |
|---|---|---|
| **महाकवि कालिदास आणि बोधकथा** | शरद दळवी | ३० |
| **मोह आणि बोधकथा** | शरद दळवी | ३० |
| **न्याय आणि बोधकथा** | शरद दळवी | ३० |

**चातुर्यकथा**

| | | |
|---|---|---|
| **बुद्धिरामाचा न्याय आणि चातुर्यकथा** | शरद दळवी | ३० |
| **प्रधानाची निवड आणि चातुर्यकथा** | शरद दळवी | ३० |

**विज्ञान नवलाई**

| | | |
|---|---|---|
| **अंतराळ** | डॉ. बाळ फोंडके | ३० |
| **आपले पूर्वज** | डॉ. बाळ फोंडके | ३० |
| **भूगोल** | डॉ. बाळ फोंडके | ३० |
| **खगोल** | डॉ. बाळ फोंडके | ३० |
| **पशू-पक्षी** | डॉ. बाळ फोंडके | ३० |
| **प्राणिजगत** | डॉ. बाळ फोंडके | ३० |

**कुमार साहित्य**

| | | |
|---|---|---|
| **प्रल्हाद** | संपादक : अनंत पै | २५ |
| **कर्ण** | संपादक : अनंत पै | २५ |
| **चाणक्य** | संपादक : अनंत पै | २५ |
| **खरा मित्र आणि इतर गोष्टी** | शरद दळवी | ३० |
| **एकमेका साह्य करु आणि इतर गोष्टी** | शरद दळवी | ३० |
| **आजीचं घर आणि इतर गोष्टी** | शरद दळवी | ३० |
| **पत्राचा प्रवास आणि इतर गोष्टी** | शकुन्तला फडणीस | ३० |
| **पैज जिंकली छोट्यानं आणि इतर गोष्टी** | शकुन्तला फडणीस | ३० |

| | | |
|---|---|---|
| **आजीचा धडा आणि इतर गोष्टी** | शकुन्तला फडणीस | ३० |

**सीक्रेट सेव्हन मालिका** मूळ लेखिका : **एनिड ब्लायटन**

| | | |
|---|---|---|
| **द सीक्रेट सेव्हन** | प्रियंका कुलकर्णी | ८० |
| **सीक्रेट सेव्हनची साहसी मोहीम** | प्रियंका कुलकर्णी | ८० |
| **शाब्बास, सीक्रेट सेव्हन** | प्रियंका कुलकर्णी | ८० |
| **रहस्याच्या मागावर सीक्रेट सेव्हन** | प्रियंका कुलकर्णी | ८० |
| **आगे बढो, सीक्रेट सेव्हन** | प्रियंका कुलकर्णी | ८० |
| **सीक्रेट सेव्हनची यशस्वी कामगिरी** | प्रियंका कुलकर्णी | ८० |
| **सीक्रेट सेव्हनची सरशी** | प्रियंका कुलकर्णी | ८० |
| **सीक्रेट सेव्हन झिंदाबाद** | प्रियंका कुलकर्णी | ८० |
| **सीक्रेट सेव्हन आणि रहस्य** | प्रियंका कुलकर्णी | ८० |
| **सीक्रेट सेव्हन समोर कोडं** | प्रियंका कुलकर्णी | ८० |
| **सीक्रेट सेव्हनची आतषबाजी** | प्रियंका कुलकर्णी | ८० |
| **'गुणवान' सीक्रेट सेव्हन** | प्रियंका कुलकर्णी | ८० |
| **सीक्रेट सेव्हनला धक्का** | प्रियंका कुलकर्णी | ८० |
| **सावधान! सीक्रेट सेव्हन** | प्रियंका कुलकर्णी | ८० |
| **सीक्रेट सेव्हनची गम्मत जम्मत** | प्रियंका कुलकर्णी | ८० |

**युद्ध चित्रकथा**

| | | |
|---|---|---|
| **दहशतीचे बेट** (इवो जिमाची लढाई) | अनु. प्रा. प्रसाद बर्वे | ६० |
| **साम्राज्याचा पाडाव** (मिडवेची लढाई) | अनु. निर्मला मोने | ६० |

**संस्कारक्षम कथा / कविता**

| | | |
|---|---|---|
| **सूर्यास्त** | वि.स. खांडेकर | ३० |
| **यज्ञकुंड** | वि.स. खांडेकर | ३० |
| **मध्यरात्र** | वि.स. खांडेकर | ५० |
| **घरटे** | वि.स. खांडेकर | ४० |
| **अस्थी** | वि.स. खांडेकर | ४० |
| **सैनिक हो...तुमच्यासाठी** | आनंद यादव | ३० |

**हॅरी पॉटर मालिका** मूळ लेखिका : **जे.के. रोलिंग**

| | | |
|---|---|---|
| **हॅरी पॉटर आणि परीस** | बाळ उर्ध्वरेषे | १९५ |
| **हॅरी पॉटर आणि रहस्यमय तळघर** | मंजूषा आमडेकर | १९५ |
| **हॅरी पॉटर आणि अझ्कबानचा कैदी** | प्रियंका कुलकर्णी | १९५ |
| **हॅरी पॉटर आणि अग्निचषक** | मंजूषा आमडेकर | ३२५ |

# ससुल्ला

इवलुला ससुल्ला
कापसासारखा मऊ
लालबुंद गाजराचा
लागतो त्याला खाऊ


लांब लांब कान त्याचे
मिचिमिची डोळे
जरा खुट्टं झालं की
तुरुतुरु पळे

मऊमऊ गवतावरती
खुशीत हिंडते स्वारी
त्यांच्यासंगे खेळायला
आवडे मला भारी

**मीरा सिरसमकर**
डी-१२, पाटील रिजन्सी, एरंडवणे,
पुणे ४११००४
मो. ९२२६१९६३७१



# ओळखा पाहू



इंग्रजी मध्ये लेखन करणारे द ग्रेट मराठा रायटर

विजेत्यास रु. १०१ चे रोख पारितोषिक दिले जाईल.

आपली उत्तरे दिनांक १५फेब्रुवारी २०११ पर्यंत आम्हाला मिळायला हवीत. बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी एकाची ड्रॉ पद्धतीने निवड करण्यात येईल. निकाल मार्च २०११च्या अंकात जाहीर होईल.

**उत्तरे पाठविण्याचा पत्ता :**

मेहता पब्लिशिंग हाऊस, माडीवाले कॉलनी, १९४१ सदाशिव पेठ, पुणे-४११ ०३०.

'ऑक्टोबर' अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर

जागतिक नेमबाजी स्पर्धेत सुवर्णपदक मिळवलेली नेमबाज - तेजस्विनी सावंत

स्पर्धेचे विजेते **- अरगडे अलिशा- नाशिक**

रजनी दैठणकर - ठाणे, शंकर चिमोटे - नागपूर, प्रमोद मांडे, भीमराव गुंडे - सोलापूर, महानंदा व्यवहार, अरविंद भोळे - औरंगाबाद, संजय इंगळे, वसंत गायधनी - नाशिक, सुप्रिया राजे - सिंधुदुर्ग, श्रीनिवास कुरणे, श्रीकांत खंडकर - कोल्हापूर, रविकिरण मुंडकर, उमेश मुंडकर, विनायक पवार, सय्यद मुक्रमअली - नांदेड, आशा आठले - इन्दौर, अर्चित असनारे - अकोला, रमेश थेटे, विजय परांजपे, शि. वा. आठवले, रा.द.ढुमणे, अशोक सूर्यवंशी - पुणे, सपना जाधव, सतिश बांद्रे - रत्नागिरी, मीना गुप्ता - धुळे, चिन्मय कुलकर्णी, तनया कुलकर्णी - सांगली, चंद्रकांत अंबाडे - भुसावळ, सुरेश पिरकर - मुंबई, मिलिंद संकपाळ - ठाणे, रविंद्र सराफ - रावेर

**प्रायोजक**

श्री.राजू जगदीशचंद्र मेहता, मे. हिराचंद नानचंद अँड कंपनी,

**साडी आडतीचे व लुंगीचे होलसेल व्यापारी**

टिळक चौक, मालेगाव, **जि.नाशिक.**

**सूचना -** प्रायोजकांच्या पत्त्यावर उत्तरे पाठवू नका.

# मेहता मराठी ग्रंथजगत

**एप्रिल २००९ पासून वर्गणीदारांसाठी पुस्तक खरेदीवर सवलत**

**एक वर्षाला २०% तीन वर्षांना २५% पाच वर्षांना ३०%**

**एक वर्षाची वर्गणी १५०रु.**

**तीन वर्षांची वर्गणी ३५०रु.**

**पाच वर्षांची वर्गणी ५००रु.**

**तीन किंवा पाच वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट**

३ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'चतुर बोकोबा' आणि 'नशीबवान शेखर'**
लेखिका : वृषाली पटवर्धन
प्रत्येकी ३० रु. ची
पुस्तके भेट!


पोस्टेज २०रु.

५ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'शिवणकला-एक छंद'**
(सलवार कमीज । स्कर्ट-ब्लाऊज
इव्हिनिंग गाऊन्स । मिडी)
लेखिका : हेमा कळके
हे ८० रु. चे
पुस्तक भेट!
पोस्टेज २०रु.










**भेट पुस्तके प्रती शिल्लक असेपर्यंतच**

**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

**वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टने वरील पत्त्यावर पाठवावी.**

RNI NO-MAHMAR/2000/2739 Licence to post WITHOUT PREPAYMENT/
Regd.No.:L2/RNP/PNW/M/184/09-2011/ L.NO.LWP-50/Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 Feb. 2011

न
वी
न

# स्पर्श

त्यांनी स्पर्श किती प्रकारचे असतात, याविषयी सांगितले आहे. यात शारीरिक स्पर्शाबरोबरच मनावर मोरपिसासारख्या अलगद उमटत असणाऱ्या स्पर्शांचेही वर्णन केले आहे. परीक्षेसाठी बाहेर पडताना आजी-आजोबांनी सुरकुतलेल्या हातांनी दिलेल्या आशीर्वादाच्या स्पर्शाच्या बळाविषयी लेखिका सांगते; त्याप्रमाणेच पावलांना होणाऱ्या गवताच्या पात्यांचा मुलायम स्पर्शही सुखावून जातो. प्रत्येक स्पर्श दुसऱ्याहून कसा वेगळा तेही लेखिका सांगते. त्या स्पर्शांचे अर्थ सांगते.




बाळाच्या गालांचा स्पर्श सृजनाचा; तर रात्रीच्या अंधारात होणारा थंडगार स्पर्श अंगावर भीतीचा काटा फुलविणारा, असे अनेक अर्थ आणि स्पर्शांच्या छटा उलगडून सांगितल्यानंतर लेखिका अखेर मृत्यूसमयीच्या थंड स्पर्शापर्यंत येते आणि आयुष्यभर हवाहवासा वाटणारा आणि नवरसांच्या विविध संवेदना जागवणारा आपल्या माणसांचा स्पर्श मृत्यूसमयी मात्र नकोसा होतो, हे भीषण वास्तव मांडून जाते. लेखिकेला वाटते, की आपल्या अनुभवांची भर घालून मुलांना अनुभवांची शिदोरी देणे हे प्रत्येकाचे कर्तव्यच आहे. कारण बाहेर मिळणाऱ्या अनुभवांची अनेक उत्तरे या शिदोरीतही असतात. एकूणच, मनाच्या तरल अवस्थेत सांगोपांग विचार करून मांडलेले विचार या ललित लेखनात आहेत.

**लेखक – डॉ. विनीता परांजपे । किंमत – ₹ ३००/– । पोस्टेज – ₹ ३०/–**

**मेहता पब्लिशिंग हाऊस**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे – ३०. फोन – (०२०) २४४७६९२४

प्रति, ____________________

____________________

____________________

____________________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.